



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार ३१ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





## राज्यात 14 ठिकाणी भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेची युती तुटली

# अनेक महापालिकांमध्ये फाटाफूट

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील आगामी महानगरपालिका निवडणुकांमुळे राजकीय वातावरण चांगलेच ढवळून निघाले आहे. आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस असल्याने सर्वच पक्षांमध्ये जोरदार हालचाली पाहायला मिळाल्या. काही इच्छुकांना पक्षाकडून उमेदवारी मिळाल्याने आनंदाचे वातावरण होते, तर अनेक पदाधिका-यांना ऐनवेळी तिकीट नाकारण्यात आल्याने नाराजी व्यक्त होत आहे. अनेक ठिकाणी पक्षाशी दीर्घकाळ निष्ठा राखणा-या कार्यकर्त्यांना डावलण्यात आल्याचा आरोप होत असून काही ठिकाणी पक्षांतर करणा-या आयाराम नेत्यांना तिकीट देण्यात आल्याने अंतर्गत असंतोष



उफाळून आला आहे.

महायुतीमधील जागावाटपावरून भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत मोठी रस्सीखेच पाहायला मिळाली. काही महानगरपालिकांमध्ये भाजपला अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळत असल्याने पक्षाने आक्रमक भूमिका घेतली. तर काही ठिकाणी शिंदे गटाने युती करण्यास स्पष्ट नकार दिला. स्थानिक राजकीय गणिते आणि परिस्थिती लक्षात घेता दोन्ही पक्षांनी काही ठिकाणी स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यातील एकूण १४ महानगरपालिकांमध्ये भाजप आणि शिंदे गटातील युती तुटली आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, नांदेड, अमरावती, मालेगाव, अकोला, मीरा-भाईंदर, नवी मुंबई, (पान २ वर)

### भाजपला बालेकिल्ल्यातच खिंडार!

## नागपूरमध्ये एकसोबत 42 कार्यकर्त्यांचा राजीनामा

**नागपूर/प्रतिनिधी :** महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारी न मिळाल्याने पार्टी विथ डिफ्रन्स असे बिरुद मिरविणा-या भारतीय जनता पक्षातील नाराजी उघडपणे समोर आली. अनेकांनी पक्षावरील नाराजीतून पद किंवा पक्ष सदस्यत्वाचा राजिनामा दिला. पक्षनेत्यांकडून नाराजांची समजूत घालण्याचे प्रयत्न सुरू होते.भाजपने यादी जाहीर न करता थेट उमेदवारांना



एबी फार्मचे वाटप केले. त्यात डावलल्या गेल्यामुळे अनेक जण नाराज झाले. त्यातूनच काहींनी पक्ष सदस्यत्वाचा राजिनामा दिला. भाजपचा बालेकिल्ला असलेल्या प्रभाग १६-ड चे अध्यक्ष गजानन निशितकर यांनी पक्षाने बाहेरच्या प्रभागातील उमेदवाराला तिकीट दिल्याची नाराजी व्यक्त करत पद व सदस्यत्वाचा राजिनामा दिला. त्याबाबत त्यांनी शहराध्यक्ष (पान २ वर)

# बंगालमधील घुसखोरी संपवणार; प्रत्येकाला शोधून काढणार :शाह

*कोलकाता/वृत्तसंस्था-* पश्चिम बंगालच्या दौ-यावर असलेल्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी कोलकात्यात पत्रकार परिषद घेउन तृणमूल काँग्रेस सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. गेल्या १५ वर्षांत बंगाल भीती, भ्रष्टाचार आणि घुसखोरीचा बळी ठरल्याचे त्यांनी यावेळी म्हटले. २०२६ मध्ये भाजपाचे सरकार आल्यास घुसखोरी संपवणार, घुसखोरांना शोधून बाहेर काढले जाईल, विकासाला गती दिली जाईल आणि बंगालचा सांस्कृतिक वारसा पुनरुज्जीवित केला जाईल, असा दावा शाह यांनी केला.

गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, बंगालच्या सीमेवरून होणारी घुसखोरी हा केवळ राज्याचाच नाही, तर संपूर्ण देशाच्या सुरक्षेशी संबंधित विषय आहे. देशाची संस्कृती आणि सुरक्षा वाचवण्यासाठी बंगालच्या सीमा सील



करणारे सरकार आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. हे काम टीएमसी करू शकत नाही, तर केवळ भाजपाच करू शकते.

दरम्यान, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कोलकाता येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेला चोख प्रत्युत्तर दिलं आहे. निवडणुका जवळ आल्या की दुर्योधन आणि दुशासन बंगालमध्ये येतात असं म्हणत ममता यांनी खोचक टोला लगावला. तसेच अमित शाह यांनी केलेले सर्व आरोप त्यांनी फेटाळून लावले. ममता बॅनर्जी यांनी आरोप केला की, केंद्र सरकार मतदार यादीतून १.५ कोटी नावे वगळली जातील असा दावा करत आहे. ही संपूर्ण प्रक्रिया राजकीय फायद्यासाठी घाईघाईने केली जात आहे. मुख्यमंत्री बॅनर्जी यांनी प्रश्न उपस्थित केला की, जर बंगालमध्ये दहशतवाद असेल, तर काश्मीरमधील पहलगामसारख्या घटनांची जबाबदारी कोण घेणार? त्यांनी दिल्लीत घडलेल्या घटनांचा उल्लेख करत केंद्राकडे उत्तर मागितले.

## उत्तराखंडमध्ये बस दरीत कोसळली;

# 7 ठार, 12 जण जखमी

**डेहराडून /वृत्तसंस्था :** उत्तराखंडमधील अल्मोडा जिल्ह्यातील सल्ट भिकियासैन परिसरात मंगळवारी सकाळी एक भीषण अपघात झाला. भिकियासैन-विनायक रस्त्यावर द्वारहाटहून रामनगरकडे जाणा-या एका प्रवासी बसवरील चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे बस खोल दरीत कोसळली. या अपघातात सात प्रवाशांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये चार पुरुष आणि तीन महिलांचा समावेश आहे. तर १२ प्रवासी जखमी झाले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, या अपघातात सात प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. तर अपघातात अनेक प्रवासी गंभीर जखमी झाल्याची शक्यता आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस, प्रशासन, एसडीआरएफ आणि आपत्ती व्यवस्थापन पथकं घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी बचावकार्य करायला सुरुवात केली. परंतु बस खोल दरीत कोसळल्यामुळे बचावकार्यात अडचण येत होती. अपघातग्रस्त बस ही रामनगर येथील कुमाउं मोटर ओनर्स युनियन



(केएमओयू) लिमिटेडची आहे. ही बस सोमवारी सकाळी ११ वाजता रामनगरहून द्वारहाट नोबाडाच्या दिशेने जात होती. मंगळवारी सकाळी ६.३० वाजता द्वारहाट नोबाडावरून बस रामनगरसाठी निघाली होती. मात्र, सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास सैलापाणी बंदजवळ चालकाचे (पान २ वर)

## नववर्षात 8 वा वेतन आयोग लागू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने ८ व्या वेतन आयोगाला अधिकृत मंजुरी दिली असून या आयोगाच्या अध्यक्षपदी निवृत्त न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, केंद्र सरकारी कर्मचारी आणि निवृत्ती वेतनधारकांना (पेन्शनर्स) तात्काळ वाढीव पगार मिळणार




नाही, हे आता स्पष्ट झाले आहे. आयोगाच्या शिफारसी लागू होण्यासाठी अजून वेळ लागणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने ८ व्या वेतन आयोगाला मंजुरी दिल्यानंतर लाखो कर्मचा-यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. मात्र, अनेक दिवसांपासून पगारवाढीची अपेक्षा असलेल्या कर्मचा-यांना लगेचच त्याचा फायदा मिळणार नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. हा आयोग केंद्र सरकारी कर्मचा-यांचे वेतन, भत्ते आणि पेन्शन यांचा सखोल आढावा घेउन सरकारला शिफारसी सादर करणार आहे. वेतन आयोगाच्या शिफारसी साधारणपणे दर दहा वर्षांनी लागू केल्या जातात. सरकारच्या अधिसूचनेनुसार, ८ व्या वेतन आयोगाच्या शिफारसी १ जानेवारी २०२६ पासून लागू होण्याची अपेक्षा आहे. मात्र, आयोगाला आपला अहवाल सादर करण्यासाठी सुमारे १८ महिने दिले गेले आहेत. याचा अर्थ असा की १ जानेवारी (पान २ वर)

## आईवर अंत्यसंस्कार सुरू असतानाच एबी फार्म मिळाला

### अंत्यविधीनंतर अर्ज भरला

**नागपूर/प्रतिनिधी : :** शिवसेनेच्या शिंदे गटातील योगेश गोन्नाडे नागपूर महापालिकेतील उमेदवारीसाठी आग्रही होते. परंतु आईचा सोमवारी मृत्यू झाला. मंगळवारी आईच्या अंत्यसंस्काराची तयारी सुरू असतांना स्मशानघाटावर त्यांचा पक्षाकडून एबी फार्म पोहचला. त्यानंतर अंत्यविधीकरून ते उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पोहचले. या घटनेबाबत आपण जाणून घेउया. वस्तलाबाई नामदेवराव गोन्नाडे (८७) असे दगावलेल्या आईचे नाव आहे. त्या चंद्रपूरातील छत्रपती शिवाजी महाराज शिक्षण संस्थेच्या पदाधिकारी राहिल्या



आहेत. वस्तलाबाईचा सोमवारी मृत्यू झाला. त्यापूर्वीपर्यंत योगेश हे नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम धावपळ करत होते. परंतु आईच्या मृत्यूनंतर अत्यंत कठीण आणि भावनिक प्रसंगातून शिवसेना (शिंदे गट)चे स्थानिक नेते योगेश गोन्नाडे यांना जावे लागले.आई मृत्यूशय्येवर असताना पक्षाकडून उमेदवारी मिळवण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया पूर्ण करणे शक्य होणार नाही, (पान २ वर)

# पातूर शेतशिवारातील बनावट दारूचा महाकाय कारखाना उद्ध्वस्त

## ‘रॉकेट देशी-संत्रा’च्या ६५ हजार बाटल्या जप्त



**अकोला/प्रतिनिधीः-** नववर्षाचा जल्लोष आणि आगामी महानगरपालिका निवडणुकांचा गैरफायदा घेत नागरिकांच्या जीवाशी खेळणारा बनावट दारूचा काळा उद्योग राज्य उत्पादन शुल्क विभागाने उघडकीस आणत पातूर तालुक्यातील चिंचखेड शिवारात सुरू असलेला मोठा कारखाना उद्ध्वस्त केला. या धडक कारवाईत बनावट देशी दारूच्या तब्बल ६५० बॉक्समधील सुमारे ६५ हजार सिलबंद बाटल्या, मद्यनिर्मितीचे साहित्य व वाहने असा ३२ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईमुळे संपूर्ण अकोला जिल्ह्यातील अवैध दारू माफियांचे धाबे दणाणले आहेत. राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी अवैध मद्यनिर्मिती व विक्रीविरोधात कडक भूमिका घेत कारवाईचे स्पष्ट आदेश दिले होते. त्यानुसार सह आयुक्त (अंमलबजावणी) अमरावती विभाग डॉ. प्रसाद सुर्वे यांच्या आदेशान्वये आणि अधीक्षक सीमा झावरे यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला विभागाच्या भरारी पथकाने ही मोहीम यशस्वी केली. २१ डिसेंबर रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे चिंचखेड येथील शेतशिवारातील एका अस्थायी शेडवर छापा टाकण्यात आला असता येथे खुल्या मैदानात, यंत्रणा उभी करून मोठ्या प्रमाणात बनावट देशी दारू तयार केली जात असल्याचे उघड झाले.

या छाप्यादरम्यान ९० मिली क्षमतेच्या बाटल्यांनी भरलेले ३५० खोक्यांमधील सुमारे ३५ हजार सिलबंद बाटल्या, मद्यनिर्मितीसाठी वापरण्यात येणारे २०० लिटर क्षमतेचे ३५ प्लास्टिक ड्रम, रसायने, रिकाम्या बाटल्या, पॅकिंग साहित्य, तसेच मोटारसायकल, ट्रॅक्टर व ढोली असा २० लाख ३२ हजार ११० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी जवान सुभाष गावंडे यांनी फिर्याद दिली असून तपास निरीक्षक महेंद्र सोनार करीत आहेत. तर याच कारवाईदरम्यान मिळालेल्या अधिक माहितीच्या आधारे चिंचखेड येथील किसान पोल्ट्री फार्मवरील कुलूपबंद खोलीवर छापा टाकण्यात आला. येथे अवैध विक्रीसाठी साठवून ठेवलेल्या ‘रॉकेट देशी दारू – संत्रा’ या बनावट ब्रँडच्या ३०० खोक्यांमधील सुमारे ३० हजार बाटल्या जप्त करण्यात आल्या. या मुद्देमालाची किंमत १२ लाख १ हजार ५०० रुपये आहे. या प्रकरणी जवान आकाश बरडे यांनी फिर्याद दिली असून तपास दुय्यम निरीक्षक भरतकुमार धुरट (भरारी पथक, अकोला) करीत आहेत. (पान २ वर)

### अवैध धंद्यांचे जूने केंद्र ?

हा परिसर यापूर्वीही अवैध कारवायांसाठी कुप्रसिद्ध राहिला आहे. गेल्या ८ ते १० वर्षांपूर्वी याच भागात गोवंश हाडांचा मोठा साठा आढळून आला होता. तर सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार हा बनावट दारूचा गोरखधंदा हा जवळपास गेल्या आठ महिन्यांपासून सुरू होता. जंगल परिसराचा फायदा घेत पातूरमधून अकोला, वाशिम, बार्शिटाकळी, बाळापूर, हिंगोली आदी भागात नेटवर्क उभारण्यात आले होते. पातूर परिसरात या दारूची मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याने कारखान्याबाबत चर्चा रंगल्या होत्या. तर नुकत्याच पार पडलेल्या नगर परिषद निवडणुकीत या ठिकाणाहून निर्माण झालेल्या अवैध देशी दारूची मोठ्या प्रमाणात विक्री करीत डिलिव्हरी देण्यात आली असल्याची माहिती आहे. परिणामी, अवैध धंद्याचे जुने केंद्र असलेल्या या परिसरात बनावट दारूचा हा महाकाय कारखाना उघडकीस आल्याने संपूर्ण परिसराची सखोल झडती घेतल्यास आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### आरोपी पसार; माफिया साखळी उघड होण्याची शक्यता

कारवाईची चाहूल लागताच संशयित आरोपी जंगल परिसराचा फायदा घेऊन पसार झाले. मात्र, उत्पादन शुल्क विभागाने वाहनांची मालकी, जागेचे कागदपत्रे व आर्थिक व्यवहार तपासण्यास सुरुवात केली असून या प्रकरणातून जिल्हा व जिल्ह्याबाहेरील अवैध दारू माफियांची साखळी उघड होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.या कारवाईत निरीक्षक प्रमोद कांबळे यांच्यासह भरारी पथकातील विशाल बांवलकर, सुभाष गावंडे, योगेश सरप, रमाकांत मुंडे, आकाश बरडे, जयंत शेगोकार, चालक नरेश कास्देकर, प्रविण गजभार, राजेश खिराडे तसेच महिला जवान गीता भास्कर व वैष्णवी मोहन यांनी सहभाग घेतला.

# 31 डिसेंबर आणि गांधी जिल्ह्यात देशी दारूचा महापूर

### विदेशी पडली मागे

**वर्धा/प्रतिनिधी :** ३१ डिसेंबर म्हणजे सरत्या वर्षाचा शेवटचा दिवस. तसेच मध्यरात्री नव्या वर्षाची सुरवात. हा समा बांधण्यास युवा वर्ग आघाडीवर असतो. तसेच अन्य हौशी पण जय्यत तयारीस लागले असतात. त्यात मद्याचा महापूर ओघाने आलाच. दारूबंदी असलेल्या गांधी म्हणजेच वर्धा जिल्ह्यात दारूची होणारी विक्री नवी नाही. वर्षभर दारू पकडल्याच्या बातम्या पोलीस विभाग तत्परतेने पाठवीत असतोच. पण ३१ डिसेंबर ही कत्ल की रात म्हणून विशेष निगराणी ठेवल्या जाते. तसाच तगडा बंदोबस्त ठेवून पोलीस खाते वाच ठेवून आहे.

विशेष म्हणजे गत तीन चार दिवसातच मोठ्या प्रमाणात दारू पकडण्यात आली आहे. गंमतीची बाब म्हणजे यात देशी दारूचा साठा मोठ्या प्रमाणात सापडला. देशीने विदेशीवर



केलेली ही मात अनेकांच्या भुवया उंचावणारी ठरते. विदेशी दारूचा पण साठा पकडल्या गेला आहे. मुद्देमालसाह कोट्यावधी रुपयाची दारू जप्त करण्यात आली आहे.

सिंदी मेघे येथील फ्रेंड्स कालोनीत छापा टाकून टॅंगो पंच ही देशी तसेच एकूण १३ लाख रुपयाची दारू जप्त करण्यात आली आहे. आरोपी नौशाद उर्फ अच्चू शहा हा मात्र पसार झाला. पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या पथकाने ही कारवाई केली. हिंगणघाट येथे कबीर वार्डात टाकलेल्या छाप्यात देशी दारूचा मोठा साठा सापडला आहे.

हिंगणघाट येथील एका दुकानात आकाश गवळी, बाबी जीवणे हे दारू साठा बाळगून असल्याचे दिसून आले. त्यात देशी दारूचे सुपर संत्रा, टॅंगो पंच, कोकण प्रीमियम, भिंगरी, राकेट संत्रा हे ब्रँड आढळून (पान २ वर)

### विदर्भ गारठला

**नागपूर :** काश्मिरात ४० दिवसांच्या कडाक्याच्या थंडीचा कालावधी म्हणजेच चिलाई कलानला २१ डिसेंबरपासून सुरुवात झाली आहे. या नैसर्गिक बदलाचा थेट परिणाम म्हणजे उत्तर भारतातून गार वारे वाहून महाराष्ट्रातही थंडीची लाट आली आहे. तसे यावर्षीच्या डिसेंबर महिन्यात सर्वाधिक थंड दिवसाची नोंद करण्यात आली. पहिल्या आठवड्यापासून थंडीचा प्रकोप (पान २ वर)










# यवतमाळ जिल्ह्यात गुन्हेगारीला लगाम

## २०२५ वर्ष कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने ठरले निर्णायक

**यवतमाळ/प्रतिनिधीः-**

यवतमाळ जिल्ह्यात सन २०२५ हे वर्ष कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने निर्णायक ठरले असून, गुन्हेगारीच्या विविध प्रकारांमध्ये लक्षणीय घट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिस अधीक्षकांनी आयोजित पत्रकार परिषदेत जिल्ह्याचा वार्षिक गुन्हेगारी आढावा सादर करताना ही माहिती दिली.सन २०२४ मध्ये जिल्ह्यातील एकूण गुन्ह्यांचे प्रलंबित प्रमाण २३ टक्के होते. मात्र २०२५ मध्ये पोलिसांच्या प्रभावी कामगिरीमुळे हे प्रमाण थेट ७ टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. शरीराविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये तब्बल १९.६० टक्के घट नोंदविण्यात आली असून, महिलांच्या सुरक्षेसाठी राबविण्यात आलेल्या 'ऑपरेशन प्रस्थान'मुळे बलात्कार, विनयभंग यांसारख्या गंभीर गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण मिळाले आहे.

कम्युनिटी पोलिसिंग, प्रतिबंधात्मक उपाययोजना, तडीपार कारवाई तसेच एमपीडीए अंतर्गत करण्यात आलेल्या कारवाईमुळे खुनाचा प्रयत्न व दुखापतीसंबंधी गुन्ह्यांमध्येही घट झाली आहे. मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ९ टक्क्यांनी घट झाल्याची नोंद पोलिसांनी दिली.

फूट पेट्रोलिंग, रात्रगस्त आणि सराईत गुन्हेगारांवर लक्ष केंद्रीत केलेल्या मोहिमांमुळे जबरी चोरीसारख्या स्ट्रीट क्राइममध्ये ४१ गुन्ह्यांची घट झाली आहे. चोरी व घरफोडीचे प्रकारही कमी झाले असून, सायबर गुन्ह्यांबाबत राबविण्यात आलेल्या जनजागृती मोहिमांमुळे फसवणुकीच्या घटनांवर आळा बसला आहे.

संघटित गुन्हेगारी विरोधात कठोर पावले उचलत पोलिसांनी मोक्का अंतर्गत ३१ आरोपींविरुद्ध कारवाई केली. तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १११ व ११२ अंतर्गत चार टोळ्यांमधील २५ आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले. एमपीडीए अंतर्गत २७ प्रस्ताव तयार करण्यात आले असून, मपोका व अन्य कायद्यांखाली एकूण ४६ जणांना जिल्ह्याबाहेर हद्दपार करण्यात आले आहे.

अंमली पदार्थविरोधी कारवाईत ५२ आरोपींना अटक करून गांजा व एमडी अंमली पदार्थ असा सुमारे ४८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. शस्त्र अधिनियमांतर्गत अवैध अग्निशस्त्रांवर मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यात आली असून, अवैध गुटखा व वाळू तस्करीविरोधातही कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

हरविलेल्या व्यक्तींच्या शोध मोहिमेत पोलिसांना उल्लेखनीय यश मिळाले आहे. २०२४ अखेर प्रलंबित आणि २०२५ मध्ये नव्याने नोंदविण्यात आलेल्या अशा एकूण ३०३५ व्यक्तींपैकी २३९६ जणांचा शोध घेण्यात आला असून, वर्षअखेर केवळ ६३९ प्रकरणे प्रलंबित आहेत.

विशेष मोहिमा, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि नागरिकांच्या सहकार्यामुळे २०२५ मध्ये यवतमाळ जिल्ह्यात गुन्हेगारीवर ठोस नियंत्रण मिळाल्याचे या अहवालातून स्पष्ट झाले आहे. महिलांची सुरक्षा, संघटित गुन्हेगारी विरोधातील कठोर भूमिका आणि मानवी दृष्टिकोनातून केलेली कामगिरी यामुळे यवतमाळ पोलिसांची कार्यक्षमता अधोरेखित झाली आहे, असे पोलिस प्रशासनाने नमूद केले. .

## १ व १० वरिल उर्वरित

### अनेक महापालिकांमध्ये

धुळे, उल्हासनगर, सांगली, छत्रपती संभाजीनगर आणि जालना या महापालिकांमध्ये दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार आहेत. त्यामुळे या शहरांमध्ये तिरंगी किंवा बहुरंगी लढती रंगण्याची शक्यता आहे.

### *नागपूरमध्ये एकसोबत*

दयाशंकर तिवारी यांना पत्रदेखील पाठविले. बजाजनगर, लक्ष्मीनगर, देवनगर, सुरेंद्रनगर, विकासनगर, विवेकानंदनगर मधील अनेक कार्यकर्त्यांमध्येदेखील नाराजीचा सूर आहे. त्यांनीदेखील पक्षाच्या पदांचे राजिनामे दिले आहेत. त्याचप्रमाणे माजी महापौर अर्चना डेहनकर यांचे पती विनायक डेहनकर यांनीदेखील तिकीट न मिळाल्याने पक्ष सदस्यत्वाचा राजिनामा दिला आहे.

### उत्तराखंडमध्ये बस दरीत

बसवरील नियंत्रण सुटल्यामुळे बस दरीत कोसळली. या अपघातात चालक आणि वाहक जखमी झाले नाहीत.

**मुख्यमंत्री धामी यांनी दुःख व्यक्त केले**

मुख्यमंत्री धामी यांनी एक्सवर पोस्ट करत अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले. अल्मोडा येथील भिकियासैन-विनायक महामार्गावर भिकियासैनहून रामनगरला जाणा-या बसच्या अपघातामुळे दुःख झाले. या अपघातात अनेकांचा मृत्यू झाला. तर बरेच जण जखमी आहेत. जिल्हा प्रशासन जखमी प्रवाशांना तत्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करत आहे. गंभीर जखमींना चांगल्या उपचारांसाठी उच्च वैद्यकीय केंद्रांमध्ये पाठवले आहे.

### नववर्षात ८ वा वेतन

२०२६ पासून लगेच पगार वाढणार नाही. तोपर्यंत ७ व्या वेतन आयोगाचीच व्यवस्था लागू राहील. कर्मचारी आणि पेन्शनर्सना सध्याचा महागाई भत्ता आणि इतर भत्तेच मिळत राहतील. कर्मचा-यांसाठी दिलासादायक बाब म्हणजे, वेतन आयोग लागू होण्याची प्रभावी तारीख १ जानेवारी २०२६ हीच मानली जाणार आहे. याचा अर्थ, शिफारसी स्वीकारल्यानंतर ज्या तारखेपासून नवीन पगार लागू होईल, त्या तारखेपासून मागे जाउन १ जानेवारी २०२६ पासूनचे संपूर्ण एरियर कर्मचा-यांना आणि पेन्शनर्सना मिळेल. मागील वेतन आयोगांमध्येही अशीच पद्धत अवलंबण्यात आली होती, त्यामुळे एकरकमी मोठी रक्कम मिळण्याची शक्यता आहे.

### आईवर अंत्यसंस्कार सुरू असतानाच

अशी मानसिकता झाल्याने त्यांनी उमेदवारीची अपेक्षाच सोडून दिली होती. मात्र या दुःखद प्रसंगात शिवसेनेने आपल्या एकनिष्ठ कार्यकर्त्याची आठवण ठेवत मानवी संवेदनशीलतेचा परिचय दिला. योगेश गोन्नाडे यांच्या आईचे अंत्यसंस्कार सुरू असतानाच, थेट स्मशानभूमीत पक्षाच्या प्रतिनिधींनी जाउन त्यांना उमेदवारीसाठी आवश्यक असलेला एबी फार्म दिला. हा क्षण केवळ राजकीयच नव्हे, तर भावनिकदृष्ट्याही अत्यंत हृदयस्पर्शी ठरला.

### ३१ डिसेंबर आणि गांधी

आलेत. ओमप्रकाश नागपुरे, अमर लाखे, धर्मेंद्र अकाली, रोशन शिंबोळकर, दीपक जंगले, पवन पन्नासे, मुकेश ढोके, प्रफुल्ल पुनवटकर, हर्षल सोनटक्के, रितेश कु-हाडकर, राहूल लुटे या स्थानिक गुन्हे शाखेच्या चमुने ही कारवाई फत्ते केली आहे.

### विदर्भ गारठला

वाढला आहे. दुसरा व चौथा आठवडा तर प्रचंड थंडीचा ठरला. विशेष म्हणजे येत्या जानेवारीमध्येही तापमान सरासरीच्या खाली राहील असा अंदाज हवामानतज्ज्ञांनी व्यक्तकेला आहे.सध्या काश्मिरसह उत्तर भारतामध्ये जबरदस्त थंड लाटेची स्थिती आहे. काश्मिरमध्ये तापमान मायनसवर असून पंजाबची काही शहरे सतत ५ अंशांच्या खाली आहेत. उत्तर व पूर्वोत्तर राज्यात धुक्याची चादर पसरली आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहणा-या वा-याने विदर्भाची शहरे गारठली आहेत, ज्यामध्ये नागपूरचाही समावेश आहे.

### पातूर शेतशिवारातील बनावट दारूचा

याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ अंतर्गत कलम १५ (१)(ई), ८१, ८३ व १०८ अन्वये गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. जप्त वाहने आणि घटनास्थळाची जागा नेमकी कोणाच्या मालकीची आहे, याची खातरजमा करण्यासाठी महसूल विभाग व प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून माहिती मागविण्यात आली असल्याची माहिती यावेळी अधीक्षक सीमा झावरे यांनी दिली.

### ८७ जागांसाठी ७१५ उमेदवारांनी

सात केंद्रांवर उमेदवारांची गर्दी उसळली होती. शेवटच्या दिवशी ५०० पेक्षा अधिक उमेदवारांनी अर्ज भरले.माजी नगरसेवकांसह अपक्ष उमेदवारांनी मोठ्या संख्येने नामांकन भरले. नामांकनाची वस्तुस्थिती पाहिल्यावर ८७ जागेसाठी ७१५ उमेदवार निवडणुक रिंगणात दिसत आहे. यामुळे निवडणुकीचा रोमांच अजून वाढलेला आहे. बुधवारी अर्जांची पडताळणी झाल्यानंतर २ जानेवारीपर्यंत नामांकन परत घेता येणाा आहे. त्यानंतर ३ जानेवारी रोजी उमेदवारांची अंतिम यादी घोषित होऊन निवडणूक चिन्ह वितरित करण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या वतीने ७ ठिकाणी नामांकन उचलण्याची आणि दाखल करण्याची व्यवस्था करण्यात आली होती. सायंकाळी सहा वाजेनंतरही केंद्रांवर नामांकन भरण्यासाठी उमेदवार उभे होते. सुरुवातीपासूनच अर्ज उचलण्याला इच्छुकांचा चांगला प्रतिसाद आहे. मंगळवारी शेवटच्या दिवशी भाजपा ,शिंदे सेना, काँग्रेस, राष्ट्रवादी, उबाठाच्या वतीने उमेदवारांना एबी फॉर्म वितरित करण्यात आले होते. त्यानंतर नामांकन दाखल करण्यासाठी उमेदवारांची गर्दी उसळली. माजी नगरसेवकासह अपक्ष उमेदवारांनी ढोल ताशासह नामांकन दाखल केले.

### भाजप, शिवसेना, काँग्रेसने घोषित

पाटिल,कामिनी कालबांडे, कांचन मोहन ठाकुर, विकेश गवाले.

**प्रभाग क्रमांक ३ नवसारी-** चंदाताई बोरसे, दिनेश गवली, सोनाली देशमुख, पंकज कावरे.

**प्रभाग क्रमांक ५ महेंद्र कॉलोनी-** संजय वानरे, राधिका जयस्वाल, सपना सुरेश चव्हाण, आशीष ज्ञानेश्वर ठाकरे.

**प्रभाग क्रमांक ६ विलास नगर-मोरबाग-** परमानंद अहिरवार, रंजनाताई टेंडूले, ज्योति मोहन साहू, सतिश करेसिया.

**प्रभाग क्रमांक ७ जवाहर स्टेडियम-** जयमाला अनिल वरघट, सुनिल मनोहरलाल कटेजा, स्नेहा आशीष शुक्ला, संतोष राधाकिसन चंदवानी.

**प्रभाग क्रमांक ८ जोग स्टेडियम चपराशीपुरा-** विजय मिलींद नरवाडे,सारिका आत्राम, अंकित वाजुलकर

**प्रभाग क्रमांक ९-** एसआरपीएफ वडाली एड. कार्तिक गजभिये, शारदा बेदाम, वर्षा भोयर

**प्रभाग क्रमांक १० बेनोडा** मालाताई देवराव चव्हाण, शिल्पाताई पाचघरे, पंकज रामदास चौधरी, दीपक वासुदेव गिरोलकर.

**प्रभाग क्रमांक ११ फ्रेजरपुरा-रूक्मिणी नगर-** चारुशिला जामठे, सचिन मनोहर बुंदेले, कोमल कमलेश रावेकर पीयुष राठी.

**प्रभाग क्रमांक १३ अंबापेठ-गौरक्षण-** योगेश वानखडे, रेखाताई खारोडे, हेमंत मालवीया, डॉ. अद्वेत पानट.

**प्रभाग क्रमांक १४ जवाहर गेट-बुधवारा** राजेंद्र नारायणराव पांढरे/कांचन विजय उपाध्याय, कोमल संतोष बद्रे, राजू शंकर खारकर.

**प्रभाग क्रमांक १७ गडगडेश्वर रवि नगर** अमोल महेंद्र सरकटे, सुवर्णा सुनिल राउत, वैशाली मनोज पांडे, राहुल रामकृष्ण माटोडे.

**प्रभाग क्रमांक १८ राजापेठ-संत कंवरराम** अपर्णाताई ठाकरे, सागर वऱ्हाडे, विक्की चांदवानी, राजेंद्र भास्करराव महाले.

**प्रभाग क्रमांक १९ साईनगर अकोली** - सचीन पनसे, मंजूषा जाधव, प्रवीण संघई, विभा वसंत गौरखेडे.

**प्रभाग क्रमांक २० सूतगिरणी-सामरा नगर-** बंटी रामटेके, मेघा हिंगलासपुरे, अश्विनी शिंदे, डॉ. राजेंद्र तायडे.

**प्रभाग क्रमांक २१ जुनी बस्ती बडनेरा** -प्रीतीराज बलान, योगेश निमकर, सूरज सुने, आशीष दारोकार.

**प्रभाग क्रमांक २२ नई बस्ती बडनेरा-** मनाली प्रकाश पहुरकर, ललीत राजूभाऊ झंझाड, तेजस्विनी मनोज सरोदे, संजय कुमार कटारिया.

### भाजपाने २७ माजी नगरसेवकांना पुन्हा दिली संधी-

**प्रभाग क्रमांक १ शेगांव-रहाटगांव-** कल्याणी आकाश तायडे, धीरज बारबुद्धे, वंदना मडघे, नरेंद्र देशमुख.

**प्रभाग क्रमांक २- संत गाडगेबाबा-**पीडीएमसी विनोद तनवाईस, स्वाती निस्ताने, सुरेखा लुंगारे, बादल कुलकर्णी.

**प्रभाग क्रमांक ३ - नवसारी -** प्रतिभा खंडारे, अभिजीत वानखडे, रीता मोकलकर, ऋषिकेश देशमुख.

**प्रभाग क्रमांक ५ महेंद्र कॉलोनी-**नया कॉटन मार्केट - सुनीता लोणारे, माधुरी ठाकरे, नीता राऊत, नंदू काले.

**प्रभाग क्रमांक ६ विलास नगर-** संजय नरवणे, कुसुमताई साहू, पूजा कौशिक अग्रवाल, राजेश साहू (पड्डा).

**प्रभाग क्र. ७ - जवाहर स्टेडियम-** सोनाली सचिन नाईक, सुशील पडोले, शोभना देशमुख, श्रीचंद तेजवानी.

**प्रभाग क्र. ८ जोग स्टेडियम-** सुनीता आठवले, शेरा मडावी, रजनी आमले, शैलेंद्र चव्हाण

**प्रभाग क्र. ९ एसआरपीएफ-** पंचफुला चव्हाण

**प्रभाग क्र.१० बेनोडा-भीमटेकडी-** मधुरा मिलिंद काले, संध्या टिकले, नितिन बोरेकर, ऋषि खत्री.

**प्रभाग क्र. ११ - रुक्मिणी नगर-** रोहिणी रावेकर, शैलेश राऊत, नूतन भुजाडे, अलका सरदार.

**प्रभाग क्र. १२ स्वामी विवेकानंद** - राधा कुरील, योजना मेटे, स्मीता सूर्यवंशी, प्रदीप हिवसे.

**प्रभाग क्र. १३ अंबापेठ गौरक्षण-** मिलिंद बांबल, लविना हर्षे, स्वाती कुलकर्णी, प्रणित सोनी.

**प्रभाग क्र. १४ जवाहर गेट-** अविनाश देऊलकर, संगीता बुरंगे, गंगाताई खारकर, विवेक कलोती.

**प्रभाग क्र. १७ गडगडेश्वर-** सुनंदा खरड, मृणाली चौधरी, आशीष अतकरे.

**प्रभाग क्रमांक १८ राजापेठ-** चेतन पवार, राजेश शादी, पद्मजा कौंडण्य.

**प्रभाग क्रमांक १९ साईनगर-** चेतन गावंडे, लता देशमुख, सरिता सौरभ मालाणी, तुषार भारतीय,वंदना हरणे, शारदा मंगेश खोंडे, सुनील काले.

**प्रभाग क्र २१ जुनी बस्ती बडनेरा-** गंगा अंभोरे, छाया अंबाडकर, गौरव बांते.

**प्रभाग क्र.२२ नवी बस्ती, बडनेरा-** रोशनी वाकडे, वीरेंद्र ढोबले, बरखा शर्मा, नरेंद्र धामाई.

### काँग्रेसने यांच्यावर टाकला विश्वास-

**प्रभाग क्रमांक ०१ शेगाव रहाटगावं -**

अ.प्रतिभा विजय वानखडे ब.मुकेश रमेश गिरी क.अर्चना रविंद्र इंगोले ड.राजेंद्र लांडे

**प्रभाग क्रमांक ०२ संत गाडगे बाबा PDMC-**

अ.जगदीश प्रल्हाद तायडेब.नम्रता रणजीत पावडे क.चित्रा शिवहरी कुलट ड. बाळू शंकर भुयार

**प्रभाग क्रमांक ०३ नवसारी-**

अ.अनिता जितेंद्र काळे ब.प्रशांत श्रीधर महल्ले क.लुबना तनवीर मुन्ना नवाब ड. मंगेश त्र्यंबक ठाकरे

**प्रभाग क्रमांक ०४ जमील कॉलनी-** अ.जमीर अहमद अब्दुल मजीद(सुपारीवाले) ब.हमीदाबी शेख,अब्दुल चौधरी(अफजल चौधरी) क.नेहा कवल शेख इस्त्रार आलम ड.निसार अहमद खान आलम खान जे.के.

**प्रभाग क्रमांक ०५ महेंद्र कॉलनी-** अ. राजेश श्रावण चवरे ब. छाया प्रवीण नवरंगे क. राजश्री राजेंद्र जठाळे ड. धीरज हिवसे

**प्रभाग क्रमांक ०६ विलास नगर मोरबाग-** अ. गौतम चिंतामणी नाईक ब. (मित्रपक्ष) क. स्वाती प्रवीण काशिकर ड. हफीज खान युसुफ खान

**प्रभाग क्रमांक ७ जवाहर स्टेडियम-** अ. वंदना बाळू निरगुळे ब. अभिनव दिलीप देशमुख क. सुनीता गोपीचंद हासानी ड. अविनाश यशवंत भडांगे

**प्रभाग क्रमांक ८ जोग स्टेडियम -चपरासीपुरा** अ. मालता संतोष गवई ब. अर्चना संजय आत्राम क. असमा फिरोज खान ड. बबलु शेखावत

**प्रभाग क्रमांक ०९ वडाळी-** अ. विक्की उर्फ विशाल वानखडे ब. जयश्री मरापे क. पुष्पा सुरेश गुहे

**प्रभाग क्रमांक १० बेनोडा-** अ. नीलिमा भास्कर रामटेके ब. सुवर्णा मिलिंद मानकर क. रोशन उत्तम पिठेकर ड. श्रीधर अशोक देशमुख

**प्रभाग क्रमांक ११ फ्रेजरपुरा रुक्मिणी नगर-** अ. स्वाती सुरेंद्र चव्हाण(दाभाडे) ब. अरुण जयस्वाल क. जयश्री डहाके ड. जयंत बंदीवान

**प्रभाग क्रमांक १२ स्वामी विवेकानंद - बेलपुरा** अ. सुनील रामटेके ब. मैथिली पाटील क. वर्षा रवींद्र महल्ले ड. राजेश बाबाराव शिरभाते

**प्रभाग क्रमांक १३ अंबापेठ गौरक्षण -** अ. पवन श्रीवास ब. (मित्रपक्ष) क. (मित्रपक्ष) ड. कुणाल श्यामसुंदर सोनी

**प्रभाग क्रमांक १४ जवाहर गेट बुधवारा-** अ.विलास महादेवराव इंगोले ब.सुनीता मनोज भेले क. ललिता सुरेश रतावा ड. संजय शंकर शिरभाते

**प्रभाग क्रमांक १५ छाया नगर पठाणपुरा-** अ. अफसरजहाँ सादिक शाह ब. डॉ.सोहेल बारी क. डॉ.नाजिया तरन्नुम ड. शबाना अन्सारी

**प्रभाग क्रमांक १६ अलीम नगर - रहमत नगर** अ.आरेफा बानो युसुफ सौदागर ब. नसीम बानो अब्दुल अकील क.मोहम्मद आसिफ तवक्कल ड.अब्दुल रफीक अब्दुल रज्जाक

**प्रभाग क्रमांक १७ गडगडेश्वर रविनगर-**

अ.सचिन जानराव वाटकर

ब.खुशी गजानन बेले क.संगीता जितेंद्र वाघ ड.पवन राऊत

**प्रभाग क्रमांक १८ राजापेठ-** अ. (मित्रपक्ष) ब. (मित्रपक्ष) क. मयुरी समीर जवंजाळ ड. महेंद्र उर्फ मुन्ना राठोड

**प्रभाग क्रमांक १९ साईनगर अकोली-** अ.सतीश माहोरे ब. (मित्रपक्ष) क. रजनी घारडे ड. प्रभाकर अनासाने

**प्रभाग क्रमांक २१ जुनी वस्ती बडनेरा-** अ. (मित्रपक्ष) ब. रुमाना अंजुम सादिक अली क. समिउल्लाह खान रहमत खान ड.अब्दुल शफीक शेखअब्दुल रफीक शेख

**प्रभाग क्रमांक २२ नवी वस्ती बडनेरा** अ. (मित्रपक्ष) ब. (मित्रपक्ष) क. कांचन बळीराम ग्रेसपुंजे संजय नारायण बोबडे

### शिंदे सेनेत तिकीट वाटपावरून

गटाचे नेते माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी युती तुटल्याचे जाहीर केले तर माजी मंत्री जगदीश गुप्ता हे शिंदे गटातून बाहेर पडले. अशात हॉटेल महफिल येथे तिकीट वाटपाच्या वेळी काही कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला. निष्ठावंतांना डावलून आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्याला उमेदवारी दिली जात असल्याचा आरोप काही कार्यकर्त्यांनी केला. यावेळी चांगलीच बाचाबाची झाली होती. त्यानंतर काहीजणांनी या संतापलेल्या कार्यकर्त्यांना शांत केले. सोमवारी रात्रभर जागा वाटपावर काही निर्णय न झाल्याने शिंदे सेनेने स्वबळावर रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला. युवा स्वाभिमान पक्षाचा हस्तक्षेप असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. तिकीट वाटपाच्या वेळी इच्छुकांनी तेथे गोंधळ घातला. यावेळी येथे धक्काबुक्की ही झाल्याचे म्हटले जात आहे. उमेदवारी वाटपातील गोंधळ आणि अंतर्गत असंतोषांमुळे आता वेगळ्याच चर्चा आहेत.

### 'नायडू गँग'चा सराईत

घटनास्थळांची पाहणी करत तपासाची दिशा निश्चित केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे या चोरीमागे नंदुरबार जिल्ह्यातील कुख्यात 'नायडू गँग'चा हात असल्याचे निष्पन्न झाले. तपासादरम्यान आरोपी बडनेरा रेल्वे स्टेशन परिसरात वावरत असल्याची माहिती मिळताच गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून कार्तिक वालू नायडू (वय २७, रा. वाकीपाडा, पोस्ट करंजी खुर्द, ता. नवापूर, जि. नंदुरबार) याला ताब्यात घेतले. सखोल चौकशीत आरोपीने आपल्या अन्य दोन साथीदारांसह राजापेठ व सिटी कोतवाली परिसरात चारचाकी वाहनांची काच फोडून चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तीन, तर सिटी कोतवालीतील एका गुन्ह्याचा उलगडा करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, गणेश शिंदे, श्याम घुगे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे यांच्यासह पोलीस हवालदार फिरोज खान, सतीश देशमुख, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, सैय्यद नाझीम, रंजीत गावंडे व चालक प्रभात पोकळे यांनी ही यशस्वी कारवाई केली.

### प्रतिबंधित चायना मांजाचा

पर्यावरण व मानवी जीवनासाठी अत्यंत घातक असलेला मोनो फायटर (KTC कंपनी) चायना मांजा विक्री करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

शहरात पतंगोत्सवाच्या काळात चायना मांजामुळे गंभीर जखमा, गळा चिरला जाणे, दुचाकीस्वारांचे मृत्यू, पक्ष्यांचा बळी अशा असंख्य घटना घडल्या आहेत. तरीही काही विक्रेते थेट कायद्याला आव्हान देत या मृत्यूच्या साहित्यासाठी बाजारपेठ तयार करत असल्याचे या कारवाईतून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. गुन्हे शाखेचे पथक आयुक्तालय हद्दीत नियमित पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, बाकलेवाडी परिसरात पिंटू चांदेकर हा व्यक्ती आपल्या घरासमोर उभा राहून प्रतिबंधित चायना मांजाची विक्री करत आहे. माहितीची खातरजमा केल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ छापा टाकत आरोपीला ताब्यात घेतले.झडतीदरम्यान आरोपीकडून प्रति चक्र १ हजार रुपये किमतीचे एकूण १२ चक्र जप्त करण्यात आले. हा मांजा केवळ पतंग खेळण्यासाठी नसून तो मानवी जीव घेण्याची क्षमता असलेले शस्त्र असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, चायना मांजा कुठून आणला, कोणाला विक्री करण्यात आली, यामागे आणखी कोणते विक्रेते किंवा साखळी आहे का, याचा सखोल तपास सुरू आहे. ही कारवाई गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश इंगोले यांच्यासह गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश परिमल, संग्राम भोजने, विकास गुडधे, सैयद नईम बेग, सागर ठाकरे व योगेश पवार यांनी केली.

### घोटा शेत शिवारामध्ये बिबट्याचा

मास खाऊन बाकीचे मास पडलेले दिसून आले. त्यामुळे घोटा शेत शिवारा मधील शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतामध्ये जाण्याकरिता, ते भयभित होत आहे. त्याप्रमाणे या भितीमुळे मजूर सुद्धा शेतीच्या कामावर येत नाही. तेव्हा संबंधीत विभागाने त्वरीत लक्ष वेधून त्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी मौजा घोटा व वऱ्हा शेत शिवारात असलेल्या शेतकऱ्यांची आहे.

### भातकुलीतील कापूस जिनिंगला

आगीचा दाट धूर दूरवरून दिसत होता. घटनेची माहिती मिळताच भातकुलीचे पोलीस निरीक्षक रविंद्र राजुलवार यांच्यासह पोलीस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी त्वरित अग्निशमन विभागाला पाचारण केले. भातकुली, दर्यापूर, अमरावती मुख्यालय तसेच ट्रान्सपोर्ट नगर उपकेंद्र येथून अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी अथक प्रयत्न करत आग आटोक्यात आणली. आगीवर नियंत्रण मिळाल्यानंतरही संभाव्य धोका लक्षात घेऊन अमरावती मुख्यालयाची एक अग्निशमन गाडी स्टँडबाय ठेवण्यात आली होती. या घटनेत मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून आगीचे नेमके कारण व नुकसानाचा अंदाज घेण्याचे काम सुरू आहे.

### 'फुले-आंबेडकरांनी शोधलेली मिथके

साळवे, मुक्ता साळवे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या संबंध' या विषयावरील कार्यक्रमात ते बोलत होते.

फुले-आंबेडकरी विचार महात्मा फुले यांनी 'गुलामगिरी' तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'राम कृष्णाचे कोडे' या पुस्तकांतून इथल्या ब्राह्मणी व्यवस्थेची मिथके बहुजन समाजापुढे स्पष्ट केली. मात्र, आज बहुजन समाजातील परिवर्तनवादी लोक ही प्रक्रिया पुढे नेताना दिसत नाहीत. आद्य क्रांतिकारक लहुजी साळवे उस्ताद लहुजी साळवे यांचे आजोबा छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात आणि वडील पेशवाईत कार्यरत होते. लहुजी साळवे केवळ महात्मा फुले यांना शिकवणारे किंवा मदत करणारे नव्हते, तर ते त्या काळातले पहिले ज्येष्ठ आद्य क्रांतिकारक होते. प्रस्थापित लोक ज्यांची नावे घेतात, अशा अनेक ज्येष्ठ क्रांतिकारकांना शिकवण्याचे काम त्यांनी केले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शाळेत जात असताना त्यांच्यावर शेण-मातीचा हल्ला झाला, तेव्हा त्यांच्यासोबत फातिमा शेख आणि उस्ताद लहुजी साळवे काठी घेऊन संरक्षणासाठी समोर असायचे. हे सत्य जगासमोर मांडणे गरजेचे आहे, असे डॉ. राणा यांनी नमूद केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. नारायण वाघमारे हे होते. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते माणिकराव खडसे, ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. बाळकृष्ण सरकटे, सामाजिक कार्यकर्ते नवनीत महाजन आणि प्रा.यशवंत खंडारे उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरविंद वानखडे यांनी केले, विनायक वानखडे यांनी संचालन केले, तर विवेक वानखडे यांनी आभार मानले.

### जगदीश गुप्ता यांनी दिला

स्वीकारले तेव्हा पासून पुन्हा व्हीआयपी कल्चर राजकीय पक्षांमध्ये सुरू झाले आहे. गुप्तांनी सांगितले की नेहमी त्यांच्या सोबत राहणारे कार्यकर्ता आणि मित्रपरिवार यांच्यासाठी ते भूमिका घेतील. राजकारण उद्योग झाला असून आता त्यांनी राजकारणाला कायमचा राम राम करण्याचे ठरविले आहे. ते कुठल्याही पक्षात जाणार नाही किंवा कुठला पक्ष किंवा संघटना देखील स्थापन करणार नाही. भाजपासोबत युतीची व्यथा सांगताना गुप्तांनी सांगितले की त्यांनी भाजपा समोर २५ जागांचा प्रस्ताव ठेवला होता. परंतु भाजपाने तो मंजूर केला नाही. काही शिवसेना नेते १६ आणि १५ जागेवरही तयार होते. त्यामुळे त्यांनी बैठकीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. त्यांनी सांगितले की त्यांचा कुणा विषयी द्वेष किंवा राग नाही. त्यांनी कधी ही कुणाविषयी वैयक्तिक टीका टिप्पणी किंवा आलोचना केली नाही. यापुढेही ते हीच भूमिका कायम ठेवतील. अमरावतीकर जनते विषयी प्रेम असल्याने ते जनतेच्या हितासाठी नेहमीच उभे राहतील.

### थर्टी फर्स्टच्या रात्री उडान

यावर प्रतिबंध करणे आवश्यक आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यामुळे थर्टी फर्स्टच्या रात्री १० वाजेपासून गाडगेबाबा समाधी ते शिवाजी शिक्षण संस्था व नेहरू स्टेडियम कडे येणारा उडान पूल, इर्विन चौक ते राजापेठ पोलीस स्टेशन व कुथे हॉस्पिटल ते नंदा मार्केट व कुशल ऑटो कडे जाणाऱ्या उडान पुलावर प्रवेश बंदी करण्यात आलेली आहे. आदेशाचे काटेकोरपणे पालन करून नूतन वर्ष साजरे करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विरुद्ध कार्यवाही केली जाईल.

### शहरात ३९४ पोती प्रतिबंधात्मक

(पंचवीस लाख रुपये) इतकी आहे.सदर ठिकाणी पंचनामा करून प्लॅस्टिक बंदी नियमांनुसार संबंधितावर रु. ५,००० दंड आकारण्यात आला. ही कारवाई दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२.३० वाजेपर्यंत सुरू होती. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या कारवाईमुळे शहरात प्रतिबंधात्मक प्लॅस्टिक साठवणूक व वापर करणाऱ्यांमध्ये मोठा इशारा मिळाला असून, भविष्यातही अशाच प्रकारच्या कठोर कारवाया सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

### सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यापक

सौम्या शर्मा चांडक यांनी यावेळी स्पष्ट केले.

बैठकीदरम्यान सौम्या शर्मा चांडक यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यापक आणि प्रभावी जनजागृती करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. सध्याच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचा प्रभाव लक्षात घेता फेसबुक, इन्स्टाग्राम, एक्स (ट्विटर), व्हॉट्स ॲप, युट्यूब आदी माध्यमांचा योजनाबद्ध आणि सकारात्मक वापर करून मतदारांपर्यंत निवडणूकविषयक माहिती पोहोचवावी, असे त्यांनी सांगितले. विशेषतः प्रथमच मतदान करणारे तरुण मतदार, महिला मतदार, दिव्यांग मतदार तसेच शहरी भागातील कामकाजात व्यस्त असलेले मतदार यांच्यापर्यंत पोहोचण्यासाठी डिजिटल माध्यमांचा उपयोग प्रभावी ठरेल, असे त्यांनी नमूद केले. मतदार यादीत नाव नोंदणी, नाव दुरुस्ती, पत्ता बदल, मतदार ओळखपत्राशी संबंधित माहिती तसेच मतदान प्रक्रियेची सविस्तर माहिती नागरिकांपर्यंत सोप्या भाषेत पोहोचविण्यावर भर देण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. प्रत्येक पात्र नागरिकाने मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी विविध जनजागृती उपक्रम, पोस्टर्स, व्हिडीओ, संदेश तसेच नाविन्यपूर्ण कल्पनांचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले. निवडणूक प्रक्रियेतील सर्व यंत्रणांनी आपापली जबाबदारी ओळखून समन्वयाने काम करावे, असे आवाहन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी केले. स्विप कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी महानगरपालिकेचे विविध विभाग, शिक्षण संस्था, स्वयंसेवी संघटना व नागरिक यांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, ३१ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठ ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# हक्काचा पैसा नागरिकांच्या दारात ; प्रो ॲक्टिव्ह गव्हर्नन्सचे प्रभावी उदाहरण - जिल्हाधिकारी

## 'आपला पैसा आपला अधिकार' : दावा न केलेल्या संपत्तीच्या वितरणासाठी विशेष शिबिराला प्रारंभ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**हक्क न सांगितलेल्या संपत्तीच्या वितरणासाठी आजचे विशेष शिबिराच्या माध्यमातून प्रशासन स्वतः नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांचा हक्काचा पैसा मिळवून देत आहे, हे प्रो?क्टिव्ह गव्हर्नन्सचे प्रभावी उदाहरण आहे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. आर्थिक क्षेत्रातील दावा न केलेल्या मालमत्तेचे कार्यक्षम व जलद वितरण करण्यासाठी आयोजित विशेष मोहिमेचा शुभारंभ जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. वित्तीय सेवा विभाग, वित्त मंत्रालय (भारत सरकार) यांच्या पुढाकाराने हॉटेल दानीश एम्पायर येथे या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.**



यावेळी जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी योगेश क्षिरसागर, आरसेटी संचालक धनाजी बोईले, नागपूर आरबीआयचे प्रबंधक महेश थूल, एसबीआय मुख्य शाखेचे प्रबंधक मोहित कुमार यांच्यासह विविध बँकांचे प्रतिनिधी, खातेदार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री कुंभेजकर पुढे बोलतांना म्हणाले, अनेक वर्षांपासून बँकेत पडून असलेल्या निधीच्या अनुषंगाने हे शिबिर आयोजित करण्यात आले असून, आरबीआयच्या ध्येय-धोरणांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे की नाही, यासाठी जिल्हा अग्रणी बँक महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या उपक्रमात इतर बँकांनीही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी यांनी यावेळी केले. तसेच अटल पेन्शन योजना, जीवन ज्योती विमा योजना यांसारख्या केंद्र शासनाच्या विविध योजनांची माहिती या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना मिळत असून, पात्र नागरिकांनी त्यांचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. नागरिकांची आर्थिक साक्षरता वाढावी यासाठी अशा प्रकारची शिबिरे सातत्याने आयोजित करावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शिबिराला मिळालेल्या चांगल्या प्रतिसादाबद्दल त्यांनी उपस्थितांचे विशेष कौतुक केले.

शिबिराचे प्रास्ताविक एलडीएम यशवीर कुमार यांनी केले. त्यांनी शिबिराची सविस्तर माहिती देताना सांगितले की, जिल्ह्यातील सुमारे १८ कोटी रुपयांची दावा न केलेली संपत्ती आरबीआयकडे जमा आहे. आजच्या शिबीरात १५७ खातेदारांना १.२३ कोटी रुपये रक्कम आतापर्यंत वितरित करण्यात आली असून जवळपास १६.७० कोटी रुपये रक्कम अजून आरबीयकडे जमा आहे. संबंधित बँक खात्यांची यादी बँकांच्या नोटीस बोर्डवर तसेच ग्रामपंचायत स्तरावर अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या शिबिरामध्ये उपस्थित नागरिकांनी ही माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन त्यांनी केले.ष्यावेळी पंकज दिवनाले यांनी मनोगत व्यक्त करत, या विशेष शिबिरासाठी बँकांनी पुढाकार घेऊन व्यापक जनजागृती केल्याचे नमूद केले.जिल्हाधिकारी श्री.कुंभेजकर यांनी विविध बँकांच्या स्टॉलला भेट देत पाहणी केली. शिबिराच्या निमित्ताने बँकांच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यावेळी एसबीआय प्रबंधक मोहित कुमार यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करत, दावा न केलेल्या संपत्तीबाबत प्रक्रिया, नियम व नागरिकांचे हक्क यांची सविस्तर माहिती दिली.

# आमदार सई डहाके यांच्या प्रयत्नांना यश

## दादगाव ते पिंपळगाव रस्त्याला अखेर शासनाची मंजुरी

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा–मानोरा विधानसभा मतदारसंघातील दादगाव ते पिंपळगाव या महत्त्वाच्या रस्त्याच्या कामाला अखेर शासनाची मंजुरी मिळाली असून त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न आमदार सई प्रकाश डहाके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मार्गी लागला आहे.



कारंजा सोहळ वन्यजीव अभयारण्याच्या हद्दीत येणाऱ्या या रस्त्यामुळे स्थानिक नागरिकांना दैनंदिन प्रवासात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. पावसाळ्यात नव्हे तर बाराही महिने रस्त्याची दुरवस्था होत असल्याने शेतकरी, विद्यार्थी, कामगार तसेच रुग्णवाहिकांच्या वाहतुकीस अडथळे निर्माण होत होते. या समस्येच्या निराकरणासाठी आमदार सई प्रकाश डहाके यांनी नागपूर येथे संबंधित शासकीय अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा केला. तसेच राज्याचे मंत्री ना. गणेशजी नाईक यांची भेट घेऊन रस्त्याच्या मंजुरीसाठी ठोस भूमिका मांडली. वन विभाग व संबंधित यंत्रणांशी समन्वय साधत आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्याने अखेर या रस्त्याला मंजुरी मिळाली आहे.

या रस्त्याच्या कामामुळे दादगाव, पिंपळगाव व परिसरातील नागरिकांचा प्रवास सुकर होणार असून शेतीमाल वाहतूक, शिक्षण, आरोग्य सेवा तसेच व्यापार-विकासाला चालना मिळणार आहे. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने हा रस्ता महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या निर्णयाबद्दल परिसरातील नागरिकांनी सई प्रकाश डहाके यांचे आभार मानले असून जनहिताच्या प्रश्नांसाठी केलेला पाठपुरावा यशस्वी झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. जवळपास मागील १५ वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावल्याबद्दल पिंपळगाव येथील सरपंचा शुभांगी भारत गुंजाटे यांनी सर्व पिंपळगाव ग्रामवासीयाकडून आमदार सई प्रकाश डहाके यांचे जाहिर आभार मानले.

# चेतन इंगोले यांची सावता परिषद वाशिम शहराध्यक्षपदी निवड



**वाशीम :** सावता परिषद वाशिम शहराध्यक्षपदी चेतन संतोषराव इंगोले यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत ही निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले. या निवडीसोबत उपशहराध्यक्षपदी अविनाश जितकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सावता परिषदेच्या विचारधारेवर विश्वास ठेवून अनेक महिलांनी संघटनेत प्रवेश केला असून, काही महिला व पुरुष कार्यकर्त्यांना विविध जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत.

निवडीनंतर बोलताना शहराध्यक्ष चेतन इंगोले यांनी सांगितले की, समाज संघटन, शिक्षणाला प्रोत्साहन, सामाजिक न्याय, महिला सक्षमीकरण व युवकांना नेतृत्वाच्या संधी देणे या बाबींवर सावता परिषदेमार्फत काम केले जाईल.

# प्रथमच सर्व विषयांची भव्य शैक्षणिक प्रदर्शनी

## सन्मती ज्ञानमंदिर शाळेतील विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे प्रभावी दर्शन

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा येथे प्रथमच सर्व विषयांचा समावेश असलेली शैक्षणिक प्रदर्शनी सन्मती ज्ञानमंदिर इंग्रजी प्राथमिक व माध्यमिक शाळेत दिनांक २६ व २७ डिसेंबर २०२५ रोजी उत्साहात पार पडली. या प्रदर्शनीत इंग्रजी, गणित, मराठी, विज्ञान, सामाजिक शास्त्र, सामान्य ज्ञान आदी विषयांवरील विविध प्रकल्प विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सादर केले.

प्रदर्शनीचे उद्घाटन प्रमोद दहीहंडीकर व त्यांच्या पत्नी वर्षा दहीहंडीकर यांच्या हस्ते करण्यात आले. दिनांक २६ डिसेंबर रोजी विद्येची आराध्य



देवता माता सरस्वतीचे पूजन व हार अर्पण करून तसेच फीत कापून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्व. श्रीमती पद्माबाई चवरे एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा सुधाताई मनोहर चवरे उपस्थित होत्या. यावेळी संस्थेचे संस्थापक आमोद मनोहर चवरे व सचिव गुंजन आमोद चवरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेचे शिक्षक निलय बोन्ते यांनी केले. प्रदर्शनीला पालकवर्ग, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, नागवानी शाळेचे अध्यक्ष व शिक्षकवृंद, शाळेचे विद्यार्थी तसेच श्री बाबासाहेब धाबेकर माध्यमिक विद्यालय (यावर्डी) चे मुख्याध्यापक, गुरुकुल विद्यालय, काळी कारंजा चे संस्थापक, जे. डी. चवरे विद्यामंदिर चे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कारंजा शहर व ग्रामीण भागातील पालक, विद्यार्थी व नागरिकांनी प्रदर्शनीचा उत्स्फूर्त प्रतिसाद देत विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे कौतुक केले व त्यांना प्रोत्साहन दिले.

या यशस्वी प्रदर्शनीसाठी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका म्हणजे वारी

## प.पू.विजयकाका पोफळी महाराज यांचे उद्बोधन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आपला जन्म सफल करायचा असेल तर यम-नियमपूर्वक साधना करणे जरूरी आहे.तसेच जीवनात शुचिता आवश्यक आहे.साधना शुचितेने आस्तिक्य निर्माण होते.वारी म्हणजे एक तपस्याच असून वारीत मनाने ,तनाने प्रत्येकाने सहभागी व्हावे.जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटका म्हणजे वारी होय असे उद्बोधन प.पू.विजयकाका पोफळी महाराज यांनी कोंढाळी महाली येथे साधकांना उपदेश देताना केले.

श्री वासुदेव आश्रमाची पालखी वाशीम येथून कारंजाकडे निघाली असता वाटेत कोंढाळी महाली येथे मुक्कामात ते मार्गदर्शनाना बोलत होते.अनुग्रहित साधकाने आपले



विहित कर्म केलेच पाहिजे.सद्गुरूंनी जो मंत्र अथवा जप दिला असेल तो दररोज केलाच पाहिजे.जीवनात पापक्षय करायचा असेल तर सेवा केलीच पाहिजे.जीवनात सेवेचे फार मोठे महत्त्व आहे.पुढे माघ महिना आहे.यात माघ स्नानाचे पर्व साधकांनी साधायला हवे असेही विजयकाका पोफळी महाराज म्हणाले.मोठड्या महाराजांनी माघ स्नानाला फार महत्त्व दिले आहे.पापाचा क्षय होण्यासाठी माघ मासात म्हणजेच पर्व काळात स्नानाला महत्त्व आहे.

# कथित वैद्यकीय निष्काळजीपणा : १५ वर्षीय विद्यार्थ्याचा डावा हात निकामी झाल्याचा आरोप




## वाशिममधील अस्थिरोग तज्ञाविरुद्ध जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार, खासगी आरोग्य सेवांवर चौकशीची मागणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील आरोग्य क्षेत्रात खळबळ उडवणारे प्रकरण समोर आले असून, वाशिम येथील अस्थिरोग तज्ञ डॉ. अजय परशरामजी दहात्रे यांच्याविरुद्ध कथित वैद्यकीय निष्काळजीपणाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात सविस्तर लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. चुकीच्या निदान व उपचारांमुळे १५ वर्षीय अल्पवयीन शालेय विद्यार्थ्याचा डावा हात निकामी झाल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. अल्पवयीन असल्याने संबंधित मुलाची ओळख गोपनीय ठेवण्यात आली आहे.

मालेगाव तालुक्यातील एका गावातील रहिवासी पंडित रामसिंग चव्हाण यांनी दिलेल्या निवेदनानुसार, त्यांचा मुलगा ८ डिसेंबर २०२५ रोजी खेळताना पडल्याने डाव्या हाताला दुखापत झाली होती. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारांसाठी त्याला वाशिम येथील अस्थिरोग तज्ञाकडे नेण्यात आले.

तक्रारीनुसार, ११ डिसेंबर २०२५ रोजी मुलाला डॉ. अजय दहात्रे यांच्या दत्तकृपा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथे कच्चे बॅन्डेज काढून पक्के प्लास्टर बांधण्यात आले. मात्र, काही तासांतच हातातील तीव्र वेदना वाढल्या व बोटांची हालचाल बंद झाल्याचा दावा करण्यात आला आहे.

ही बाब डॉक्टरांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर दुसऱ्या दिवशी प्लास्टर अंशतः कापून औषधोपचार करून रुग्णाला घरी पाठविण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. तथापि, प्रकृतीत सुधारणा न होता त्रास वाढतच गेला, असा आरोप करण्यात आला आहे.

१३ डिसेंबर रोजी तपासणीदरम्यान हातावर फोड आढळून प्लास्टर काढण्यात आले. इंजेक्शनद्वारे फोड फोडून सलाईन देण्यात आली. मात्र, 'आराम होईल' असे सांगून रुग्णाला पुन्हा घरी पाठविण्यात आल्याचा दावा आहे. या उपचार प्रक्रियेमुळे हातातील पेशींना अधिक इजा झाली का, असा प्रश्न तक्रारदारांनी उपस्थित केला आहे.

यानंतर रुग्णाला वाशिम व अकोला येथील विविध तज्ञ डॉक्टरांकडे उपचारासाठी नेण्यात आले. अखेर अकोला येथील खासगी रुग्णालयात डाव्या हातावर शस्त्रक्रिया करण्यात आली. तज्ञांच्या मते, हातातील पेशींना मोठ्या प्रमाणावर इजा झाल्याने हात पूर्ववत होण्याबाबत अनिश्चितता व्यक्त करण्यात आली असून, पुढील उपचारांसाठी नागपूर, पुणे किंवा मुंबई येथे जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

# जिल्हास्तरीय लोकशाही दिन ५ जानेवारी २०२६ रोजी

**वाशिम :** सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या शासन परिपत्रक क्र. प्रसुधा २०११/प्रक्र.१८९/११/१८-अ दिनांक २६ सप्टेंबर २०१२ तसेच महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या शासन निर्णय क्र. मलोदि-२०१३/प्र.क्र.११/मकक दिनांक ०४ मार्च २०१३ नुसार दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार, दि.०५ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी, वाशिम यांच्या कार्यालयातील वाकाटक सभागृहात करण्यात येणार आहे.

## परीक्षा केंद्रावर प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अकोला :** सांगली जिल्ह्यातील मिरज येथील पद्मभूषण वसंतदादा पाटील शासकीय रूग्णालय व आरोग्य शिक्षण पथक या संस्थेच्या सरळसेवा पदभरतीसाठी उद्या (३१ डिसेंबर) दु. १ वा. परीक्षा होणार असून, जिल्ह्यातील २ परीक्षा केंद्रांवर १०० मीटर परिसरात सकाळी ६ वा. ते सायं. ८ वा. दरम्यान प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. आदेश जिल्हाधिकारी यांनी जारी केला. रस्त्यावरील श्री इन्फोटेक आणि बाभुळगाव येथील श्री शिवाजी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय अशी दोन परीक्षा केंद्रे आहेत.

**Change In Name**

My Old passport name was **MOHAMMAD AQUEEL MOHAMMAD ISMAEEL** My new name is **MOHAMMAD AQUEEL MOHAMMAD ISMAIL** My Old passport no M4948779 Address Roshan plot main road near akola urban co op bank Hiwarkhed tq. Telhara Dist. Akola 444103 (M S)

**Change In Name**

My passport number is N6205216I have change my name Old name **VASANTRAO SUBHASRAO DESHMUKH** New Name **VASANTRAO SUBHASHRAO DESHMUKH** My Residential Address is --At post Charangaon tq paturDist Akola 444501

**Change In Name**

My Old passport name was **MOHAMMAD KHALIQUE** My new name was is **MOHAMMAD KHALIQUE NOOR MOHAMMAD** My Old passport no K1741542 Address near masjid patwa pura Akot Dist Akola 444101 (M S)

**Change In Name**

My Old passport name was **MOHAMMAD AIJAZUDDIN** my new name is **MOHD AIJAZUDDIN GHIYASUDDIN** My Old passport no M4948730 Address near house of qadeer Mirza Choti buarque Akot Dist Akola 444101 (M S)

**Change In Name**

My Old passport name was **MOHAMMAD ISMAEEL** My new name is **MOHAMMAD ISMAIL** Old passport no M4948779 Address Roshan plot main road near akola urban co op bank Hiwarkhed tq telhara Dist. Akola 444103 (M S)

**Change In Name**

My Old passport name was **FARIDA BI MOHAMMAD AIJAZUDDIN** my new name is **FARIDA BI MOHD AIJAZUDDIN** My Old passport no M4948780 Address near house of qadeer Mirza Choti buarque Akot Dist Akola 444101 (M S)

## चौकशीची जाहिर नोटीस

### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

जा. क्र. ३६६२/२०२५ दि. १८/१२/२०२५

अर्ज क्रमांक :- ६३/२०२५ कलम- १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक :-** श्री. विश्वेश्वर महादेव संस्थान, कुंभारी ता. जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. शंकर रामदास अतकरे मु.पो. कुंभारी ता. जि. अकोला

संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- **काही नाही**

आ) स्थावर मिळकत (वर्णन):- मौजे कुंभारी, अकोला ता. जि. अकोला कुंभारी ग्रामपंचायत येथील 312×182 = 56784 चौ. फुट व 68x46 = 3128 चौ. फुट

ऐकून क्षेत्रफळ = 59912 चौ. फुट व खुली जागा व ज्याची चतुःसीमा

पुर्वेस :- खुला प्लॉट पश्चिमेस : - सितला इंडस्ट्रीज उत्तरेस :- सरकारी रस्ता दक्षिणेस :-दायमा गंटू इंडस्ट्रीज (कुंभारी अकोला रोड) सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियतही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सही निशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला. १ यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १८/१२/२०२५ रोजी दिली.

(शिक्का)

**प्र. अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला

## जाहीर संमन्स

### विदयमान जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अकोला.

तक्रार क्रमांक :- १६०/२०२४ पुढील तारीख दि :- १५/०१/२०२६

अर्जदार :- यश अरुण खेतान रा. सिव्हील लाईन्स अकोला, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार क्र. :- नंदकिशोर मालिराम खंडेलवाल,

व्दारा नंदकिशोर मालिराम खंडेलवाल प्रो. प्रा. नंदकिशोर मालिराम खंडेलवाल, चेंबर ऑफ फारमसी, जुना कापड बाजार, अकोला ता. जि. अकोला ज्याअर्थी अर्जदार यांनी ग्राहक संरक्षण कायदयाच्या कलम १२ नुसार गैरअर्जदार नंदकिशोर मालिराम खंडेलवाल प्रो. प्रा. नंदकिशोर मालिराम खंडेलवाल, चेंबर ऑफ फारमसी, जुना कापड बाजार, अकोला ता. जि. अकोला यांच्या विरुध्द तक्रार अर्ज दाखल केला आहे. वरील गैरअर्जदार यांना नोटीस पाठविण्यात आली. परंतु त्यांची बजावणी झाली नाही. त्यामुळे या व्दारे जाहीर समन्स देत आहोत. वरील तक्रार अर्ज दिनांक १५/०१/२०२६ रोजी नियोजीत केला आहे. तरी गैरअर्जदार यांनी वरील तक्रारीमध्ये दिनांक. १५/०१/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अकोला येथे न चुकता हजर होऊन आपले लेखी म्हणणे मांडावे. जर सदर तारखेवर अनुउपस्थित राहण्यास कसूर केल्यास वरिल गैरअर्जदार यांना तक्रारी संबंधी काहीही म्हणणे मांडावयाचे नाही व तक्रार मान्य आहे असे समजून तक्रारीमध्ये वरिल गैरअर्जदार विरुध्द एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल तसेच प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०२/१२/२०२५.
ठिकाण :- अकोला.

(शिक्का)

**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण
आयोग अकोला

## जाहीर संमन्स

### विदयमान जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अकोला.

तक्रार क्रमांक :- १६१/२०२४ पुढील तारीख दि :- २०/०१/२०२६

अर्जदार :- उमा अरुण खेतान रा. सिव्हील लाईन्स अकोला, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार क्र. :- नंदकिशोर मालिराम खंडेलवाल,

व्दारा नंदकिशोर मालिराम खंडेलवाल प्रो. प्रा. नंदकिशोर मालिराम खंडेलवाल, चेंबर ऑफ फारमसी, जुना कापड बाजार, अकोला ता. जि. अकोला ज्याअर्थी अर्जदार यांनी ग्राहक संरक्षण कायदयाच्या कलम १२ नुसार गैरअर्जदार नंदकिशोर मालिराम खंडेलवाल प्रो. प्रा. नंदकिशोर मालिराम खंडेलवाल, चेंबर ऑफ फारमसी, जुना कापड बाजार, अकोला ता. जि. अकोला यांच्या विरुध्द तक्रार अर्ज दाखल केला आहे. वरील गैरअर्जदार यांना नोटीस पाठविण्यात आली. परंतु त्यांची बजावणी झाली नाही. त्यामुळे या व्दारे जाहीर समन्स देत आहोत. वरील तक्रार अर्ज दिनांक २०/०१/२०२६ रोजी नियोजीत केला आहे. तरी गैरअर्जदार यांनी वरील तक्रारीमध्ये दिनांक २०/०१/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, अकोला येथे न चुकता हजर होऊन आपले लेखी म्हणणे मांडावे. जर सदर तारखेवर अनुउपस्थित राहण्यास, कसूर केल्यास वरिल गैरअर्जदार यांना तक्रारी संबंधी काहीही म्हणणे मांडावयाचे नाही व तक्रार मान्य आहे असे समजून तक्रारीमध्ये वरिल गैरअर्जदार विरुध्द एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल तसेच प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक :- ०२/१२/२०२५.
ठिकाण :- अकोला.

(शिक्का)

**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण
आयोग अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

### सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला

जा. क्र. ३६६३/२०२५ दि. १८/१२/२०२५

अर्ज क्रमांक :- १४९/२०२५ कलम- १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** शिलवंत महिला उपासिका चॅरिटेबल ट्रस्ट चिखलगाव, ता. जि. अकोला

**अर्जदार :-** सौ.वंदना श्रीकृष्ण अंभोरे मु. पो. चिखलगाव, ता. जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम , १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- **१९०० /- रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन ) :- **काही नाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशीं पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक १८/१२/२०२५ रोजी दिली.

(शिक्का)

**प्र. अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३६ ■ बुधवार, ३१ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# थर्टी फर्स्टपूर्वी वर्ध्यात दारूमाफियांवर धडक

## -१८ लाख १९ हजारांचा अवैध साठा जप्त; स्कॉर्पिओसह मुद्देमाल हस्तगत



**वर्धा जनमाध्यम :** ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा-सुव्यवस्थेचा भंग होऊ नये, यासाठी वर्धा पोलीस प्रशासनाने अवैध धंद्यांविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. त्याचाच भाग म्हणून स्थानिक गुन्हे शाखेने हिंगणघाट येथे मोठी कारवाई करत तब्बल १८ लाख १९ हजार ५०० रुपयांचा अवैध दारू साठा व चारचाकी वाहन जप्त केले. या कारवाईमुळे थर्टी फर्स्टपूर्वी दारूमाफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर अवैध दारू साठा, विक्री व वाहतुकीवर कठोर कारवाईचे आदेश दिले होते. त्या आदेशांच्या अंमलबजावणी दरम्यान, २९ डिसेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार हिंगणघाट शहरातील संत कबीर वार्ड परिसरात छापा टाकण्यात आला.

छाप्यात एका दुकानात मोठ्या प्रमाणावर देशी दारूचा साठा आढळून आला. तपासात आकाश उर्फ टिन्या गवळी (रा. संत कबीर वार्ड, हिंगणघाट) आणि अमरदीप उर्फ बॉम्ब जिवणे (रा. चंद्रपूर, सध्या हिंगणघाट) हे अवैधरीत्या दारू साठवणूक करत असल्याचे निष्पन्न झाले. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच मुख्य आरोपी आकाश गवळी घटनास्थळावरून पसार झाला.

**हजारो शिश्या, स्कॉर्पिओ जप्त-** कारवाईदरम्यान प्रीमियम डिलक्स सुपर संत्रा, टंगो पंच, कोकण प्रीमियम, भिंगरी संत्रा, रॉकेट संत्रा आदी ब्रँडच्या हजारो शिश्या तसेच मोठ्या क्षमतेचे बंपर जप्त करण्यात आले. दारू वाहतुकीसाठी वापरण्यात येणारी महिंद्रा स्कॉर्पिओ (MH-20-DJ-4740) ही चारचाकीही पोलिसांनी ताब्यात घेतली. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत १८,१९,५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी हिंगणघाट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार आरोपीचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे. थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर अवैध दारूविरोधातील कारवाई आणखी तीव्र करण्यात येणार असून, कायदा मोडणाऱ्यांवर 'झिरो टॉलरन्स'ची भूमिका कायम राहील, असा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे,

ही कारवाई पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने राबवली. पथकातील अधिकाऱ्यांनी समन्वयाने केलेल्या या धडकेत थर्टी फर्स्टपूर्वीच दारूमाफियांचा मोठा डाव उधळून लावण्यात वर्धा पोलिसांना यश आले आहे.

# पालकमंत्री डॉ. भोयर यांचा विकासाचा धडाका

## -वर्धा जिल्ह्यात महत्वपूर्ण प्रकल्पांना मंजुरी

**वर्धा जनमाध्यम :** पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या प्रयत्नांमुळे वर्धा जिल्ह्यातील अनेक प्रलंबित विकास प्रश्न मार्गी लागले आहेत. प्रशासनिक इमारती, सिंचन प्रकल्प, आरोग्य सेवा, पर्यटन आणि नागरी सुविधांसाठी कोटयवधींचा निधी मंजूर झाला असून, जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळाली आहे.

रामनगर येथील शेकडो भूखंडधारकांच्या जमीन फ्री होल्ड करण्यास शासन मंजूर झाले आहे. यामुळे नागरिकांना मालकी हक्क मिळणार असून खरेदी-विक्री आणि कर्ज व्यवहारही सुलभ होतील. वाढती गुन्हेगारी लक्षात घेऊन रामनगर पोलिस स्टेशनसाठी १६३५.९३ चौ.मी. जागा व २.७७ कोटींचे भूखंड हस्तांतरण मंजूर झाले आहे. शहरालगत ११ ग्रापं क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापनासाठी चार एकर जागा जिल्हा परिषदेला हस्तांतरीत झाली असून स्वच्छता मोहिमेला बळ मिळाले आहे. टाटा टेक्नॉलॉजीचे ण्घ्छ्ऊ केंद्र सुरू होणार असून युवकांना इंडस्ट्री ४.० नुसार तांत्रिक प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.



बोर व धाम प्रकल्पांच्या नुतनीकरणासाठी ४२९ कोटी रूपयांचा निधी, तळेगांव श्यामजीपंत येथे ३०० खाटांचे सामान्य रूग्णालय, जिल्हा रूग्णालयात ५० खाटांचे क्रिटिकल केअर ब्लॉक मंजूर झाले आहेत. तसेच ग्रामीण भागातील सात नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रे, आठ उपकेंद्राचे दुरुस्ती, शहरातील आयुर्वेदिक रूग्णालयासाठी निधी आणि अंगणवाडी, ग्रापं भवन, स्मशानभूमी शेडसारख्या उपक्रमांसाठी निधी मंजूर झाला आहे.धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी ६५ तीर्थक्षेत्रांसाठी निधी मंजूर झाला असून सालोड इको टुरिझम पार्क, तलाव सौंदर्यीकरण, अभयारण्य विकास यासह अनेक प्रकल्पांना मान्यता मिळाली आहे.

डॉ. भोयर म्हणतात, वर्धेकरांनी माझ्यावर विश्वास ठेवला. त्यांना दिलेल्या शब्दाची पूर्तता करण्यासाठी सर्व प्रश्न मार्गी लावले आहेत. जिल्हा आता विकासाचे मॉडेल बनेल.

## सेलूत धाडसी चोरट्यांचा कहर; झोपेत कोंडून एकाच रात्री तीन घरफोड्या

**वर्धा । जनमाध्यम :** सेलू शहरात चोरट्यांनी धाडसी कारवायांना पुन्हा एकदा उधाण आणले आहे. शहरातील विविध भागांतील तीन घरांना एकाच रात्री लक्ष्य करत चोरट्यांनी घरफोड्या केल्याची खळबळजनक घटना मंगळवारी (३०) सकाळी उघडकीस आली. विशेष म्हणजे, काही ठिकाणी घरातील कुटुंबीय झोपेत असतानाच त्यांना खोलीत कोंडून टीव्ही, रोख रक्कम व मौल्यवान साहित्य लंपास करण्यात आले. या घटनेमुळे नागरिकांमध्ये तीव्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मध्यरात्रीच्या सुमारास रेहकी मार्गावरील गेंदलाल जेवरे, डुकरे गुरुजी यांच्या घरांसह शहरातील मुख्य वस्तीत असलेल्या आणखी एका घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. एका घरात झोपेत असलेल्या कुटुंबीयांना बाहेरील खोलीत कोंडून ठेवण्यात आले. त्यानंतर चोरट्यांनी घरातील टीव्ही संच, रोख रक्कम व अन्य मौल्यवान वस्तू गोळा करून पसार झाले.

# जनतेच्या डोळ्यात सिमेंटची धूळ

## -जुन्याच पुलावर कॉंक्रीटचा थर देऊन नवीन पूलाचा ढोंगी खेळ

**आर्वी जनमाध्यम :** आर्वी तालुक्यातील नांदपूर ते लाडेगाव रस्त्यावरील पुलाचे सुरू असलेले तथाकथित नवीन बांधकाम म्हणजे सरळसरळ शासनाच्या पैशांची उधळपट्टी आणि जनतेच्या डोळ्यात धूळफेक असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. जुन्याच मोडकळीस आलेल्या पुलावर फक्त सिमेंट-कॉंक्रीटचा थर टाकून नवीन पूल उभारल्याचा दिखावा केला जात असून, कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे.



या पुलाची उंची वाढवणे, जुने तुटलेले पाईप काढून मोठ्या क्षमतेचे नवे पाईप बसवणे, पावसाळ्यात पाणी अडू नये यासाठी नियोजनबद्ध काम करणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात जुन्याच तुटलेल्या संरचनेवर मलमपट्टी करून कंत्राटदार आणि संबंधित अधिकारी आपली जबाबदारी झटकत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. यामुळे यावर्षीही पावसाळ्यात पुलावरून पाणी वाहणार आणि ग्रामस्थांना जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागणार आहे. हे निकृष्ट दर्जाचे काम संबंधित विभागातील अभियंते व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आशिर्वादानेच सुरू असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याप्रकरणी लाडेगाव व परिसरातील नागरिक जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल करण्याच्या तयारीत आहेत. दोषी अभियंते व अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. विशेष म्हणजे, याच रस्त्यावरील पुलांचे काम तातडीने व दर्जेदार पद्धतीने व्हावे यासाठी चार महिन्यांपूर्वी देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात आजही कामाच्या नावाखाली केवळ दिखावा सुरू आहे. काम नियमानुसार न झाल्यास ग्रामस्थांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अरविंद लिल्लोरे यांनी दिला आहे. जनतेचा संयम आता संपत चालला असून, प्रशासनाने वेळीच दखल न घेतल्यास हा दिखाऊ पूल आंदोलनाचा केंद्रबिंदू ठरण्याची दाट शक्यता आहे.

## मुलांचे भविष्य धोक्यात, तंबाखू-अंमलीपदार्थमुक्त अभियान राबवा - जिल्हाधिकारी वान्मथी सी.

**वर्धा जनमाध्यम :** बाल वयापासून मुलांना व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण व मानसिक आरोग्य कार्यक्रम शिक्षण, अन्न व औषध प्रशासन विभाग व पोलिस विभागाने संयुक्तपणे राबवावा. जिल्ह्याला तंबाखु व नशामुक्त करण्यासाठी विद्यार्थी व पालकांमध्ये जनजागृती अभियान राबवावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी दिल्यात.



जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा तंबाखू नियंत्रण समन्वय समितीचा आढावा घेण्यात आली. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या. बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ, उपशिक्षणाधिकारी एम.पानसरे, पोलिस निरिक्षक सलाम कुरेशी, डॉ. मोहिता कोडापे, डॉ. माधुरी निमसटकर, डॉ. शमा खान, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या जिल्हा सल्लागार डॉ. नम्रता सलूजा आदी उपस्थित होते. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या वाढत्या व्यसनाधीनतेबरोबरच अंमली पदार्थाचे वाढते प्रमाण लक्षात घेता शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तंबाखू व तंबाखूजन्य तसेच अंमली पदार्थाचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम कसे होतात, बाल वयातच मुलांना व्यसनाची सवय कशी लागते आणि त्यांना या व्यसनापासुन दूर ठेवण्याकरीता जनजागृती अभियान राबविण्याच्याही सूचना यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी दिल्यात. बैठकीला राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम चमू व मानसिक आरोग्य विभागाची चमू उपस्थित होती.

# काळी मातीच्या थरात नागरिकांचा जीव धोक्यात, कंत्राटदार बेपत्ता

## -सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** आष्टी तालुक्यातील बोरगाव ते टूमनी-झाडगाव रस्त्याचे काम म्हणजे विकास नव्हे, तर थेट आदिवासी नागरिकांच्या जीवाशी सुरू असलेला धोकादायक खेळ असल्याचे भयावह चित्र समोर आले आहे. नाली खोदून निघालेली काळी माती थेट रस्त्यावर टाकून त्यावर रोड रोलरने दबाई करण्याचा प्रकार उघडपणे सुरू असून, हा सगळा गैरप्रकार कॅमेऱ्यात कैद झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नाकाखाली सुरू असलेल्या या निकृष्ट कामामुळे संतापाची लाट उसळली आहे.

या रस्त्याच्या कामात वापरली जाणारी काळी माती ही तांत्रिकदृष्ट्या पूर्णतः अयोग्य असतानाही तीच माती रस्त्याच्या थरात वापरली जात असल्याने भविष्यात हा रस्ता पावसाळ्यात चिखलाचा सापळा ठरण्याची भीती व्यक्त होत आहे. जेसीबी चालकांना विचारणा केली असता, कंत्राटदार कोण आहे, हे आम्हाला माहीत नाही, असे उत्तर मिळाले. सरकारी कामात कंत्राटदारच अदृश्य असणे, हा प्रकार अधिकच संशयास्पद ठरत आहे.



टूमनी व झाडगाव ही दोन गावे आदिवासी बहुल असून, स्वातंत्र्यानंतर तब्बल पंच्याहत्तर वर्षे उलटून गेली तरी या गावांना पक्का रस्ता मिळालेला नव्हता. लालपरी आजतागायत या गावांच्या वाटेवर पोहोचलेली नाही. पक्क्या रस्त्यासाठी हतबल झालेल्या नागरिकांनी विधानसभा निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकून प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घेत हा रस्ता मंजूर केला. मात्र, मंजुरीनंतर एक वर्ष लोटले तरी दर्जेदार रस्ता दूरच, उलट निकृष्ट कामाचा कहर सुरू आहे.

सहा महिन्यांपासून काही ठिकाणी गिट्टी टाकून ती तशीच ठेवण्यात आली आहे. रोड रोलरने योग्य दबाई न केल्यामुळे गिट्टी सर्वत्र पसरली असून, दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग जीवघेणा ठरत आहे. काही ठिकाणी तर जेसीबीच्या सहाय्याने नाली खोदून त्यातील काळी माती रस्त्यावर टाकली जात असून, मागोमाग रोलर फिरवून काम 'पूर्ण' केल्याचे भासवले जात आहे. हे चित्र पाहूनच नागरिकांमध्ये प्रचंड संताप उसळला आहे.

या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेत टूमनी गावाचे सरपंच संजय ठाकरे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. निकृष्ट दर्जाचे काम, कंत्राटदाराची मनमानी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष याबाबत त्यांनी स्पष्ट शब्दांत आरोप केले आहेत. तक्रारी करूनही कामात सुधारणा न झाल्यास आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारण्याचा इशाराही त्यांनी तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे.

आदिवासींच्या विकासाच्या नावाखाली काळी माती रस्त्यावर टाकून 'काळा कारभार' सुरू असल्याचा आरोप होत असून, दोषींवर तातडीने कठोर कारवाई न झाल्यास हा रस्ता संघर्षाचे रणांगण बनेल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. विकास हवा, पण जीवाशी खेळ आहे, हीच या रस्त्यावरील आर्त हाक आहे.

# ३१ डिसेंबरला वर्धा पोलीस 'अलर्ट मोड'वर

## - हुल्लडबाजी, दारूधुंद वाहनचालकांवर करडी नजर; सीमांवर १० चेकपोस्ट : पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल

**वर्धा जनमाध्यम :**

३१ डिसेंबरची रात्र आणि नववर्षाच्या स्वागतासाठी जिल्हाभरात उत्साहाचे वातावरण असले तरी, या जल्लोषात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी वर्धा जिल्हा पोलीस प्रशासन पूर्णपणे अलर्ट मोड वर आले आहे. २०२५ ला निरोप देत २०२६ चे स्वागत शांततेत व सुरक्षिततेत व्हावे, यासाठी जिल्ह्यातील सर्व १९ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. हुल्लडबाजी, बेशिस्त वर्तन, सार्वजनिक ठिकाणी मद्यपान, छेडछाड तसेच कायदा-सुव्यवस्थेचा भंग करणाऱ्यांवर पोलीसांची विशेष नजर राहणार आहे. जिल्ह्याच्या सीमांवर एकूण १० ठिकाणी चेकपोस्ट उभारण्यात आले असून, बाहेरून येणाऱ्या प्रत्येक वाहनाची कसून तपासणी केली जाणार आहे. अवैध दारू, शस्त्रे अथवा संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**'ड्रंक अँड ड्राईव्ह'वर कडक कारवाई-** ३१ डिसेंबरच्या दिवशी बेदरकार वाहनचालना मुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास आल्याने, सकाळपासूनच 'ड्रंक अँड ड्राईव्ह' मोहिम राबविण्यात येणार आहे. मद्यधुंद अवस्थेत वाहन चालविणाऱ्या चालकांवर दंडात्मक व कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. रात्रीच्या वेळी जिल्ह्यातील हॉटेल्स, रिसॉर्ट्स व लॉजचीही पोलिसांकडून तपासणी करण्यात येणार आहे.

## जाहीर सूचना

माझे पती गोपाळराव गोविंदराव मोरे याचे दिनांक १० एप्रिल २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे टायटन (ग्रे) चारचाकी वाहन क्रं. MH३२ैS6९१९ चेचीस नंबर MALFB81BLPM४७९१५१ इंजिन नंबार G4LAPM५७९८४५ हा आहेत. (नाते पत्नी ) माझे नाव मंदा गोपाळराव मोरे (वय ७६) कमला नेहरू शाळेजवळ रामनगर वर्धा, हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

आपली नम्र

श्रीमती मंदा गोपाळराव मोरे
कमला नेहरू शाळा जवळ रामनगर वर्धा
मो. नं. ९८५०२३५५९०

## जाहीर सूचना

माझे पती प्रकाश अर्जुनराव सलामे याचे दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे दुचाकी वाहन क्रमांक MH32AF0645 चेचीस नंबर MBLHA11ATGGK09007 इंजिन नंबार HA11EJGGK08432 हा आहेत. (नाते पत्नी ) माझे नाव प्रतिक्षा प्रकाश सलामे वय (२४) रा. सालोड हिरापूर, ता. जि. वर्धा हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

**आपली नम्र**

**प्रतिक्षा प्रकाश सलामे, रा. सालोड हिरापूर,**
**ता. जि.वर्धा - ९३७३३१३५२७**

प्रो.क्र.१२२९७/२०२५

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वर्धा यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.क्र.२४६/२०२५ — ने.ता.२३.०१.२०२६

**शालिनी ज्ञानेश्वर हिवसे व २**
**--- विरुध्द ---**
**निरंक**

वर्धा येथील सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात एम.जे.सी.क्र.२४६/२०२५ **शालिनी ज्ञानेश्वर हिवसे व २ --विरुध्द-- निरंक** पेशी ता.२३.०१.२०२६, सदरहू केसमध्ये **ज्ञानेश्वर पांडुरंग हिवसे** हे मयत असून त्यांचा मृत्यू दिनांक ०६.११.२०२५ रोजी झालेला आहे. अर्जदार **नं.१ शालिनी ज्ञानेश्वर हिवसे, २. छाया निलेश हस्ती व ३. नरेंद्र ज्ञानेश्वरराव हिवसे** हे मयत यांचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदार यांनी मयत **ज्ञानेश्वर पांडुरंग हिवसे** यांचा मृत्यू पश्चात या न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ अन्वये वारसान प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

सदरहू केसमध्ये कोणासही काही आपत्ती असल्यास अथवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत **सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, वर्धा** यांचे न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांस कायदेशीर वारसा हक्क कायद्यान्वये प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारीख २०.१२.२०२५ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर ,
वर्धा
दि.२०.१२.२०२५

## विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)**
**कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा**
**(ई मेल : eewidn@gmail.com दुरध्वनी क्र.07152-243548)**
**निविदा सुचना क्र.१८ / वपावि/२०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा (भ्रमणध्वनी क्र.०७१५२-२४३५४८) हे Government of India Ministry of Corporate Affairs यांचेकडे प्रमाणित असलेल्या अधिकृत अभिकरणाकडून खालील कामासाठी **ब-१** मोहरबंद लिफाफ्यात मागविण्यात येत आहे.

कोरी निविदा प्रपत्रे रु.१०००/- व जी.एस.टी.१८ टक्के असे एकुण रु.११८०/- कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस दिनांक ०२.०१.२०२६ ते ०९.०१.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये प्राप्त करुन भरलेल्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात मागविण्यात येत आहे. तसेच बयाणा रक्कम (E.M.D.) ची रक्कम विभागीय कार्यालयात धनाकर्षाने नमुद दिनांकापर्यंत जमा करण्यात यावी. तसेच कोऱ्या निविदा प्रपत्र व तांत्रिक कागदपत्रे (Technical Envelop No.01) बाबत सविस्तर माहिती वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा यांचे कार्यालयात मिळेल. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, वर्धा पाटबंधारे विभाग, वर्धा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | कामाची किंमत (रु.) | बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कोरी निविदा प्रपत्राची किंमत (रु.) | कंत्राटदाराचा वर्ग/ वगीकरण | शेरा/सदरच्या निविदेसाठी कंत्राटदाराचा आरक्षण निकष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | टेंभरी, कुऱ्हा, रोठा-१, रोठा-२, लहादेवी, दहेगांव, गोंडी या लघु प्रकल्पाची वितरण प्रणालीचे नुतनीकरण/ दुरुस्ती करण्यासाठी सर्व्हेक्षण संकल्पन व सक्षम स्तरावरुन अंतिम मंजुरी पर्यंतचे संपूर्ण कामे | रु.८२७९४४/- | रु.८५००/- | ०३ महिने | १००० + १८ टक्के जीएसटी = रु.११८०/- | तांत्रिक निकषामध्ये पात्र होणारे कंत्राटदार | -- |
| २. | आष्टी, पिलापूर, कन्नमवार ग्राम, मलकापूर, आंजी, बोरखेडी, पारागोठाण या लघू प्रकल्पाची वितरण प्रणालीचे नुतनीकरण / दुरुस्ती करण्यासाठी सर्व्हेक्षण संकल्पन व सक्षम स्तरावरुन अंतिम मंजुरी पर्यंतचे संपूर्ण कामे. | रु.७६६८५२/- | रु.८०००/- | ०३ महिने | १००० + १८ टक्के जीएसटी = रु.११८०/- | तांत्रिक निकषामध्ये पात्र होणारे कंत्राटदार | -- |

| | | |
|---|---|---|
| अ) निविदा लिफाफा स्विकारण्याचा कालावधी | - | दि.०२.०१.२०२६ ते ०२.०१.२०२६ पर्यंत |
| ब) निविदा लिफाफा सादर करण्याचा अंतिम कालावधी | - | दि. १३.०१.२०२६ (सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत) |
| क) निविदा लिफाफा उघडणे | - | दि.१४.०१.२०२६ (वेळ दुपारला १२.०० वाजता) |

**स्वाक्षरी/-**
**कार्यकारी अभियंता,**
**वर्धा पाटबंधारे विभाग,**
**वर्धा**

**(क्र.जिमाका-वर्धा/१८४/२०२५-२०२६)**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
paper www.janmadhyam.com

# भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था!

## दरडोई उत्पन्नात घसरण; बेरोजगारीचे आव्हान कायम



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सरत्या वर्षाच्या अखेरीस आणि नवीन वर्षाच्या सुरुवातीला हाती आलेल्या वृत्तानुसार, भारत, जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था ठरली आहे. भारताने जपानला मागे टाकत हे स्थान पटकवल्याचे सांगण्यात येत आहे. सरकारच्या आकडेवारीनुसार, भारताचे एकूण सकल घरगुती उत्पादन (जीडीपी) ४.१८ ट्रिलियन डालरपर्यंत पोहचले आहे. अर्थात याची अधिकृत माहिती २०२६ मध्ये जाहीर होणार आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अंदाजानुसार, २०२६ मध्ये भारताचा जीडीपी ४.५१ ट्रिलियन डालर असू शकतो. तर जपानचा जीडीपी ४.४६ ट्रिलियन डालर असेल. म्हणजे भारत जपानला मागे टाकणार हे आकडेवारीवरुन समोर आले आहे.

आर्थिक समिक्षेनुसार, जर भारतीय अर्थव्यवस्था अशीच घोडदौड करत असेल तर येत्या अडीच ते तीन वर्षांत जर्मनीला मागे टाकून जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था ठरेल. अंदाजानुसार, २०३० पर्यंत भारताचा जीडीपी ७.३ ट्रिलियन डालरपर्यंत पोहचू शकतो. जागतिक अस्थिरता आणि व्यापार, व्यावसायिक दबावापुढे न झुकता भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक आघाडीवर सरस कामगिरी करेल.

एकूण जीडीपी मध्ये भारताने मोठी झेप घेतली असली तरी सर्वसामान्य भारतीयांच्या उत्पन्नात मात्र घसरण होत आहे. जागतिक बँकेच्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये भारताच्या प्रत्येक व्यक्तिचे उत्पन्न केवळ २,६९४ डालर होते; तर जपानमधील सामान्य नागरिकाचे उत्पन्न आपल्यापेक्षा १२ पट आणि जर्मनीपेक्षा जवळपास २० पट अधिक आहे. भारत २०२३ मध्ये चीनला मागे टाकत सर्वाधिक लोकसंख्येचा देश झाला आहे. यातील जवळपास १.४ अब्ज लोकसंख्या ही १० ते २६ वर्ष वयोगटातील आहे. भारत सर्वात तरुण देश ठरला आहे. पण रोजगार निर्मिती, नवीन नोक-या आणि सर्वसामान्यांच्या हाती अधिक पैसा हे सरकारसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे.

# भाजपने वेळ संपल्यानंतर 'एबी फॉर्म' दिले




**सोलापूर :** उमेदवारी अर्ज भरण्याच्या करण्याच्या शेवटच्या दिवशी मंगळवार दि. ३० डिसेंबर रोजी भाजपच्या वतीने आपल्या उमेदवारांचे एबी फार्म अगदी शेवटच्या क्षणी वेगवेगळ्या निवडणूक कार्यात आणण्यात आले. मात्र भाजपने वेळ संपल्यानंतर एबी फार्म सादर केले. लोकशाहीची हत्या केली असा आरोप करत विरोधकांनी जोरदार घोषणाबाजी केली. वेळेत एबी फार्म पोहोचवण्यासाठी भाजपचे आमदार सचिन कल्याणशेट्टी, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर तसेच अन्य प्रमुख कार्यकर्त्यांची मोठी धावपळ उडाली. दरम्यान वेळ संपल्यानंतर भाजपच्या नेत्यांना एबी फार्म देण्यास मूभा दिल्याचा आरोप करत विरोधी पक्षांच्या नेत्यांनी व कार्यकर्त्यांनी निवडणूक कार्यालयाबाहेर मोठी घोषणाबाजी केली. भाजपच्या नेत्यांना कार्यालयात प्रवेश करण्यास अडवण्यात आले. अखेर पोलिस व शीघ्र कृती दलाच्या जवानांना बोलवून भाजपच्या नेत्यांना आपल्या उमेदवारांचे एबी फार्म देण्यास कार्यालयात सोडण्यात आले.

# शिंदेसेनेने 14 विद्यमान नगरसेवकांना नाकारली उमेदवारी

**मुंबई/प्रतिनिधी :** युती झाल्यानंतर उमेदवारी घोषित करेपर्यंत अनेकांच्या जीवांची घालमेल सुरु होती. अशातच शिंदेसेना आणि भाजपाकडून उमेदवारी जाहीर करण्यात आली. शिंदेसेनेने १४ विद्यमान नगरसेवकांना उमेदवारी नाकारत नव्या चेह-यांना संधी दिली, तर भाजपाने चार विद्यमान नगरसेवकांना डावलले आहे. त्यामुळे अनेकांनी जाहीर नाराजी व्यक्त केली. काहींनी अपक्ष अर्ज दाखल केले आहेत.दोन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे मंगळवारी (३० डिसेंबर) पहाटेपासून अधिकृत उमेदवारी अर्ज (एबी फार्म) देण्यास सुरु वात करण्यात आली. यासाठी सोमवारी (२९ डिसेंबर) सायंकाळपासूनच इच्छुक उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी पक्ष कार्यालयांबाहेर ठिय्या मांडल्याचे चित्र दिसून आले. रविवारी रात्री उशिरा भाजपा उमेदवारांची पहिली यादी जाहीर होताच अनेक इच्छुकांचा रोष उफाळून आला.

**नरेश म्हस्केंच्या मुलालाही तिकीट नाही**

दरम्यान, टेंभीनाका येथील आनंदाश्रम परिसरात शिंदेसेनेमधील इच्छुकांची मोठी गर्दी जमली होती. अधिकृत उमेदवारी मिळावी यासाठी जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आले. यामध्ये खासदार नरेश म्हस्के यांचे पुत्र आशुतोष म्हस्के यांचाही समावेश होता.

उमेदवारी नाकारल्याचे समजताच काही इच्छुक भावनिक झाले असून,



त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहताना दिसले. काहींनी पक्षपदाचा राजीनामा देत उघड नाराजी व्यक्त केली.

**नव्या चेह-यांना संधी-** शिंदेसेनेकडून साधना जोशी, एकनाथ भोईर, पुर्वेश सरनाईक, आशा डोंगरे, मधुकर पावशे, भूषण भोईर, रुचिता मोरे, मनिषा कांबळे, प्रभा बोरिटकर, राजेंद्र साप्ते, मंगल कळंबे, प्रियंका पाटील आणि सुनिता मुंडे या विद्यमान नगरसेवकांना उमेदवारी नाकारली आहे. काही ठिकाणी कुटुंबातील सदस्यांना उमेदवारी देण्यात आली असून, रुचिता मोरे यांच्या जागी त्यांचे पती राजेश मोरे, एकनाथ भोईर यांच्या जागी त्यांची सून यज्ञा भोईर, तर भूषण भोईर यांच्या जागी त्यांची पत्नी सपना भोईर यांना उमेदवारी देण्यात आली आहे.भाजपाकडून माजी नगरसेविका कविता पाटील, केवलादेवी यादव, सुवर्णा कांबळे आणि दीपा गावंड यांना डावलण्यात आले असून, त्यांच्या जागी नव्या चेह-यांना संधी देण्यात आली आहे.

**तिकीट नाकारल्यामुळे बंडखोरी वाढली-** टेंभीनाका प्रभागातून शिंदेसेनेकडून माजी नगरसेवक सुधीर कोकाटे यांना उमेदवारी मिळाल्यानंतर इच्छुक निखिल बडजुडे आणि विकास दाभाडे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला. प्रभाग क्रमांक १५ मध्ये उमेदवारी नाकारल्याने भाजपाचे माजी नगरसेवक राजकुमार यादव, वर्षा पाटील आणि शिंदेसेनेचे महेंद्र सोडारी यांनी आधी राष्ट्रवादीत प्रवेश केला, मात्र काही तासांतच बहुजन समाजवादी पक्षात प्रवेश करून उमेदवारी अर्ज दाखल केला. याच प्रभागात शिंदेसेनेचे इच्छुक बबुल शेख आणि दशरथ यादव यांनी समाजवादी पक्षातून अर्ज दाखल केला आहे. प्रभाग क्रमांक ३ मध्ये माजी नगरसेवक भूषण भोईर आणि मधुकर पावशे यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे.

# सोशल मीडिया पोस्टवरून अहमदाबादमध्ये दोन गटांमध्ये दगडफेक

## ४० लोकांना अटक; दोन दिवसांत दोनदा हिंसक संघर्ष

**अहमदाबाद/वृत्तसंस्था :** अहमदाबादच्या साणंद येथील कालाना गावात मंगळवारी सकाळी दोन समुदायांच्या लोकांमध्ये हिंसक झटापट झाली. हा वाद जुन्या वैमनस्यातून झाला आणि दोन्ही बाजूंनी एकमेकांवर दगडफेक केली. या हिंसाचाराचा एक व्हीडीओ व्हायरल झाला आहे, ज्यात लोक एकमेकांवर दगडफेक करताना दिसत आहेत. पोलिसांनी ४० जणांना ताब्यात घेतले आहे. गावात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात



करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गावात राहणा-या तरु णांच्या दोन गटांमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून सोशल मीडियावर एका पोस्टवरून वाद सुरू आहे. यामुळे सोमवारी एका गटातील तरु णाला दुस-या गटातील तरु णांनी मारहाण केली होती. यानंतर दोन्ही बाजूंनी डझनभर लोक एकमेकांशी भिडले. बघता बघता दोन्ही बाजूंनी लोकांची संख्या वाढली आणि एकमेकांवर जोरदार दगडफेक सुरू झाली. कशाबशा परिस्थिती नियंत्रणात आणली गेली.मंगळवारी सकाळी पुन्हा भिडले मंगळवारी सकाळी दोन्ही गटांमध्ये पुन्हा कोणत्यातरी कारणावरून वाद झाला आणि दगडफेक सुरू झाली. पोलिसांची अनेक पथके गावात पोहोचली आणि परिस्थिती नियंत्रणात आणली. सध्या गावात शांतता आहे. पोलिस संशयितांची चौकशी करत आहेत. दोन्ही बाजूंनी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

# बंदरातून काजू निर्यातीसाठीची प्रक्रिया गतीने पूर्ण करा

## मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे

**मुंबई :-** रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड बंदरातून काजू आणि इतर कृषी उत्पादनांच्या निर्यातीची प्रक्रिया गतीने पूर्ण करावी अशा सूचना मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिल्या. याविषयी मंत्रालयात आयोजित बैठकीवेळी ते बोलत होते.बैठकीस महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. प्रदीप, मत्स्यव्यवसाय आयुक्त किशोर तावडे, मित्राचे सल्लागार परशराम पाटील यांच्यासह जेएसडब्ल्यू ग्रुपचे प्रतिनिधी उपस्थित होते. निर्यात प्रक्रिया सुरू करण्यासाठी लागणारी सर्व मदत विभाग करेल असे सांगून मंत्री राणे म्हणाले की, कोकणातील उत्पादने लवकरात लवकर आणि सहज निर्यात होण्यासाठी ही प्रक्रिया पूर्ण होणे आवश्यक आहे. बंदराला जोडणी होण्यासाठी कोल्हापूर - वैभववाडी रेल्वे मार्गाचे काम गतीने हाती घेण्यात येत आहे. उत्पादन तपासणी प्रयोगशाळा १५ जानेवारीपर्यंत सुरू करावी. यंदाच्या हंगामात काजू जयगड बंदरातून निर्यात होण्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणांनी तयारी करावी. उत्पादकांमध्ये जागृतीसाठी कार्यशाळेचे आयोजन करावे असेही मंत्री राणे यांनी सांगितले.

# आदिवासी लाभार्थ्यांसाठी घरकुलासाठीचा प्रस्ताव तातडीने सादर करा

## महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे



**मुंबई :** माणगाव, तळा व म्हसळा नगरपंचायत हद्दीतील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना आदिवासी घरकुल योजना (शहरी) अंतर्गत घरकुले मंजूर करून निधी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. माणगाव, तळा व म्हसळा नगरपंचायत हद्दीतील अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना घरकुल मंजुरीसंदर्भात मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, माणगाव नगरपंचायतीमधील ४५, तळामधील ६९ आणि म्हसळा मधील ४० (जि. रायगड) नगरपंचायत क्षेत्रातील घरकुलापासून वंचित असलेल्या अनुसूचित जमातीच्या एकूण १५४ घरकुलांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावेत. या घरकुलासंदर्भातील निधी तसेच पात्र लाभार्थ्यांच्या मान्यतेसाठी करावयाची कार्यवाही कालमर्यादेत करावी.प्रत्येक लाभार्थ्यास रुपये २.५० लाख प्रमाणे घरकुल अनुदान देण्याचा प्रस्ताव आहे. या प्रस्तावांचा विचार करून पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ प्रदान करण्यात यावा. या योजनेमुळे शहरी भागातील आदिवासी कुटुंबांना सुरक्षित निवा-याचा लाभ मिळणार आहे.बैठकीस आदिवासी विभागाचे सहसचिव मच्छिंद्र शेळके, अतिरिक्त आयुक्त गोपीचंद कदम, तळा तहसिलदार स्वाती पाटील, माणगाव उपनगराध्यक्षा रिया उभारे, आनंद यादव, लक्ष्मी जाधव, दिलीप जाधव, उत्तम जाधव, नाना भुवड, जगदिश शिंदे, नागेश लोखंडे, किशोर शिंदे, परशुराम कदम, अलिम पल्लवकर, लक्ष्मण हिलम, विजय तांबे, शाहीद उके, आदी उपस्थित होते.

# राज्यभर 1 ते 31 जानेवारी 2026 दरम्यान रस्ता सुरक्षा अभियान

**मुंबई :** रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी कमी करण्यासाठी आणि नागरिकांमध्ये रस्ता सुरक्षेविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्यभर १ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने संपूर्ण राज्यात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.या रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत परिवहन विभाग, वाहतूक पोलीस विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, शालेय शिक्षण विभाग तसेच इतर संबंधित संस्था व संघटनांच्या सहकार्याने रस्ता सुरक्षिततेसाठी प्रचार, जनजागृती व जनप्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नागरिक, वाहनचालक, विद्यार्थी आणि सर्व संबंधित घटकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता वाढविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय (एमओरटीएच) यांच्या मार्गदर्शनानुसार या कालावधीत प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा, परिसंवाद, वाहनचालक व शालेय विद्यार्थ्यांसाठी जनजागृती सत्रे, नेत्र तपासणी शिबिर तसेच विविध प्रचारात्मक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.यावर्षीच्या राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिन्याची संकल्पना सडक सुरक्षा जीवन रक्षा अशी असून रस्ता सुरक्षा ही प्रत्येकाच्या जीवनरक्षणाशी निगडित आहे, हा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. राज्यभर राबविण्यात येणा-या या अभियानामुळे रस्ता सुरक्षा नियमांचे पालन वाढेल आणि अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, अशी अशा परिवहन आयुक्त, मुंबई यांनी व्यक्त केली आहे.

# उत्तर भारतीय महापौर बसेल इतके नगरसेवक निवडून आणू; भाजपा नेते कृपाशंकर सिंह यांचे विधान

**मुंबई/प्रतिनिधी :** आगामी महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने उत्तर भारतीय समाजातील मतदारांना आकर्षित करण्यासाठी भाजपाने रणनीती आखली आहे. त्यात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, बिहारच्या आमदार मैथिली ठाकूर यांना मुंबई आणि आसपासच्या महापालिकेत प्रचारात उतरवण्यात येणार आहे. त्याशिवाय भाजपाच्या उत्तर भारतीय मोर्चाकडून महापालिका क्षेत्रात उत्तर भारतीय संमेलन आयोजित करण्यात येत आहे. त्यात मीरा भाईंदर येथे भाजपा नेते कृपाशंकर सिंह यांनी उत्तर भारतीयांचा महापौर बसवूया असं आवाहन जनतेला करण्यात आले.



या मेळाव्यानंतर कृपाशंकर सिंह यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यात ते म्हणाले की, बिहार निवडणुकीनंतर ही ९ वी सार्वजनिक निवडणूक आहे. लवकर महापालिका निवडणुका व्हाव्यात अशी जनतेची इच्छा होती. मीरा भाईंदर महापालिकेसह २९ महापालिकेत भाजपाच्या नेतृत्वात महायुतीची सत्ता येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्याशिवाय आम्ही इतके नगरसेवक निवडून आणू ज्यातून उत्तर भारतीय महापौर बसेल असा दावा त्यांनी केला. तसेच नकली शिवसेना गेली, असली आमच्यासोबत आहे. हिंदुत्व आणि विकास आमचा मुद्दा आहे. देवेंद्र फडणवीस यांचं नेतृत्व महाराष्ट्रात मजबूत आहे. उत्तर प्रदेशात बाबा का बुलडोजर चालतो तसा फडणवीस यांच्या विकासाचा बुलडोजर महाराष्ट्रात सुरू आहे. जे कुणी समोर असतील त्यांना उद्ध्वस्त करून भाजपाच्या नेतृत्वात २९ महापालिकेत आमची महायुतीची सत्ता येईल असंही कृपाशंकर सिंह यांनी सांगितले.दरम्यान, मीरा भाईंदर शहराचा विकास भाजपाने कसा केलाय हे उत्तर भारतीयांना सांगण्याची गरज होती. त्यासाठी आजचे संमेलन होते. आम्ही प्रत्येक समाजाच्या बैठकीचे आयोजन केले आहे. मीरा भाईंदरमध्ये राहणा-या वेगवेगळ्या समाजाचे आम्ही मेळावे घेत आहोत. आमची भूमिका त्यांच्यासमोर ठेवत आहोत. या मीरा भाईंदर शहरात बहुतांश महापौर हे उत्तर भारतीय राहिले आहेत असं आमदार नरेंद्र मेहता यांनी सांगितले.

# असीम मुनीर यांच्या मुलीचा निकाह त्यांच्याच सख्ख्या भावाच्या मुलाशी

**कराची/वृत्तसंस्था :** पाकिस्तानचे लष्कर प्रमुख असीम मुनीर यांनी त्यांच्या मुलीचा निकाह त्यांच्या भावाच्या मुलाशी लावून दिला आहे. पाकिस्तानचे पत्रकार जाहिद गिश्कोरी यांनी सोशल मीडियावर या निकाहचा व्हिडीओ पोस्ट केला आहे. असीम मुनीर यांनी त्यांच्या भावाच्या मुलाशीच मुलीचा विवाह केला असल्याचं गिश्कोरी यांनी म्हटलं आहे. तर राजा मुनीब नवाच्या पत्रकाराने म्हटलं आहे की असीम मुनीर यांनी त्यांच्या मुलीचा निकाह त्यांचा भाउ कासिम मुनीरच्या मुलाशी लावून दिला आहे. असीम मुनीर आणि कासिम मुनीर सख्खे भाउ आहेत. असीम मुनीर यांनी त्यांच्या मुलीचा निकाह भावाच्या मुलाशी लावून दिला आहे. रावळपिंडीमध्ये हा निकाह झाला आहे.



**असीम मुनीर यांचा पुतण्याच झाला त्यांचा जावई-** असीम मुनीर यांनी त्यांच्या मुलीचा निकाह त्यांच्या पुतण्याशी लावून दिला आहे. त्यामुळे त्यांचा पुतण्याच त्यांचा जावई झाला आहे. या निकाहबाबत जाहिद गिश्कोती म्हणाले की पाकिस्तानच्या लष्करात अधिका-यांसाठी सिव्हिल सर्व्हिस कोटा असतो. असीम मुनीर यांनी या विवाहाची माहिती फार कुणाला न देता गोपनीय पद्धतीने हा निकाह लावून दिला आहे. या निकाह सोहळ्यासाठी पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी, पंतप्रधान शाहबाज शरीफ, मरियम नवाज यांच्यासह इतर दिग्गजांची उपस्थिती होती. तसंच लष्करातले आजी माजी अधिकारीही या विवाह सोहळ्यात सहभागी झाले होते.

**दोन सख्खे भाउ आता व्याही झाले आहेत-** असीम मुनीर यांच्या मुलीच्या निकाह सोहळ्यात ४०० पाहुणे उपस्थित होते. कठोर सुरक्षा व्यवस्थेत हा सोहळा पार पडला. पाकिस्तानातल्या सोशल मीडियावर या लग्न सोहळ्याचे व्हिडीओ व्हायरल होत आहेत. कासिम मुनीर यांचा मुलगा अब्दुल रहमान हा आता असीम मुनीर यांचा जावई झाला आहे.

# शिक्षक भरती प्रक्रियेचा भार आता राज्य परीक्षा परिषदेवर

## राज्य सरकारचा निर्णय

**पुणे/प्रतिनिधी :** राज्यात सन २०१७ पासून शिक्षक भरतीची प्रक्रिया पवित्र पोर्टलद्वारे आणि शिक्षण आयुक्त कार्यालयामार्फत केली जात होती. मात्र आगामी काळात ही प्रक्रिया महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत केली जाईल, असा निर्णय शासनाने घेतला आहे. विशेष म्हणजे तसे परिपत्रक देखील प्रसिद्ध केले आहे.शासन निर्णयानुसार यापुढील काळात पवित्र पोर्टलमार्फत राज्य स्तरावरील शिक्षक पदभरतीशी संबंधित सर्व कामकाज महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सोपविण्यात आले आहे. परिषदेने सुकाणू समितीच्या मार्गदर्शनात कामकाज पार पाडायचे आहे असे उप सचिव आबासाहेब कवळे यांच्या सहीने परिपत्रक काढले आहे.

मात्र, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचा कारभार मागील काही वर्षांपासून संशयास्पद असल्याने भविष्यात शिक्षक भरती पारदर्शक होईल का? असा प्रश्न काही संस्था, संघटनांकडून उपस्थित केला जात आहे.साधारणतः शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमता चाचणी झाल्यानंतर उमेदवारांसाठी स्व-प्रमाणीकरणाची सुविधा उपलब्ध करुन देणे, जाहिराती स्वीकारणे त्याचप्रमाणे उमेदवारांचे विषय, प्रवर्गानुसार सामाजिक व समांतर आरक्षण, उमेदवारांच्या



प्राधान्यक्रमानुसार त्या-त्या प्रवर्गासाठीचा कट ऑफ निश्चित करणे, उमेदवारांची शिफारस करणे आदी बाबी काटेकोरपणे हाताळाव्या लागतात. यात आयुक्त(शिक्षण) कार्यालयाचा बहुतांशी वेळ खर्ची होत आहे. त्याचा परिणाम धोरण निश्चिती व निर्णयांच्या अंमलबजावणीवर होत असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे असे परिपत्रकातून स्पष्ट करण्यात आले आहे.

**परिषदेला अनुभव-** राज्य परीक्षा परिषद ही शालेय शिक्षण विभागांतर्गत स्वायत्त संस्था आहे. या संस्थेमार्फत शिक्षक पात्रता परीक्षा, शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी परीक्षा घेण्यात येते. शिवाय सदर संस्थेने यापूर्वी शिक्षक पद भरतीशी संबंधित कामकाज हाताळले आहे. ही बाब विचारात घेउन सरकारने वरील निर्णय घेतला आहे.

**सुकाणू समितीचेही गठन-** याचबरोबर शासनास शिफारशी करण्यासाठी सुकाणू समितीचेही गठन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. याचे अध्यक्षपद शिक्षण आयुक्त यांच्याकडे असणार आहे. त्यांच्यासमवेत सदस्य म्हणून महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिकचे शिक्षण संचालक प्राथमिक विभागाचे शिक्षण संचालक काम पाहणार असून सदस्य-सचिव पदाची जबाबदारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्तांवर सोपवण्यात आली आहे.

# अकोल्यात आघाडीत बिघाडी; उबाठाचे 55, काँग्रेसचे 49, तर राष्ट्रवादीचे 24 उमेदवार

**अकोला/प्रतिनिधी :** महापालिका निवडणुकीसाठी महाविकास आघाडीत बिघाडी झाली. शिवसेना ठाकरे गटाने ५५ उमेदवारांची यादी जाहीर केली. मनसेसोबत त्यांची युती झाली. प्रहार पक्षाचे चार उमेदवार मशाल चिन्हावर निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. काँग्रेस व राष्ट्रवादी शरद पवार गटात आघाडीवर शिक्कामोर्तब झाले. त्यामध्ये ४९ जागांवर काँग्रेस, तर २४ जागांवर राष्ट्रवादी लढत आहे. काही ठिकाणी काँग्रेसने शिवसेनेला पाठिंबा दिला.

अकोला महापालिकेच्या २० प्रभागातील ८० जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्याची मंगळवारी दुपारी ३ वाजेपर्यंत शेवटची मुदत होती. राजकीय पक्षांकडून अंतिम क्षणी उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आले. शिवसेना ठाकरे गट स्वबळावर निवडणूक रिंगणात उतरले असून काँग्रेस व राष्ट्रवादी शरद पवार गटाची आघाडी झाली आहे. काँग्रेसने ४९ जणांची यादी जाहीर केली. बहुतांश मुस्लीम बहूल भागामध्ये काँग्रेसने उमेदवार दिले आहेत. काँग्रेसने काही ठिकाणी शिवसेना ठाकरे गटाला पाठिंबा दिला आहे, अशी माहिती महानगराध्यक्ष डा. प्रशांत पाटील वानखडे यांनी दिली.शिवसेना ठाकरे गटाने ५५ उमेदवारांची यादी जाहीर केली. त्यामध्ये जुन्या-नव्या चेह-यांना संधी देण्यात आली आहे. भाजपचे माजी नगरसेवक विजय इंगळे यांचे तिकीट पक्षाने कापल्याने त्यांनी शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला. त्यांना शिवसेना ठाकरे गटाकडून उमेदवारी देण्यात आली. भाजपचे कुणाल शिंदे यांना देखील शिवसेना ठाकरे गटाने तिकीट दिले. मनसेसाठी काही जागा शिवसेनेकडून सोडण्यात आल्या. प्रहार जनशक्ती पक्षाच्या चार जणांना शिवसेना ठाकरे गटातून उमेदवारी देण्यात आली. काही ठिकाणी काँग्रेसला पाठिंबा देण्यासंदर्भात निर्णय घेतला जाईल, असे जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांनी सांगितले.

# अतिरिक्तकर्मचा-यांचे समायोजन वेळेत व पारदर्शक पद्धतीने होणार-सचिव तुकाराम मुंढे

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळा व कार्यशाळांमधील नोंदणी प्रमाणपत्र रद्द होणे, नूतनीकरण न करणे तसेच पटनिर्धारणानंतर विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे अतिरिक्त ठरणा-या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या समायोजनासाठी सर्वसमावेशक व एकसंध कार्यपद्धती निश्चित केली आहे, अशी माहिती दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिली.

सचिव मुंढे म्हणाले, यापूर्वी विविध शासन निर्णय, परिपत्रके व शाळा संहितेतील तरतुदी विखुरलेल्या स्वरूपात असल्याने समायोजन प्रक्रियेस विलंब होत होता आणि त्यामुळे न्यायालयीन प्रकरणे वाढत होती. ही बाब लक्षात घेउन आयुक्त, दिव्यांग कल्याण यांच्या नियंत्रणाखाली कार्यरत असलेल्या अतिरिक्तसंवर्ग कक्षामार्फत समायोजन प्रक्रिया अधिक प्रभावी करण्याचा निर्णय घेतला आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कोणताही खंड पडू नये, यासाठी समायोजनासाठी कालबद्ध कार्यपद्धती निश्चित केली आहे. या निर्णयामुळे समायोजन प्रक्रिया अधिक पारदर्शक होउन शैक्षणिक सातत्य राखले जाणार असल्याचे सचिव मुंढे यांनी स्पष्ट केले आहे.शासन मान्यताप्राप्त खासगी अनुदानित विशेष शाळा किंवा कार्यशाळेची मान्यता रद्द झाल्यानंतर अपिलास स्थगिती नसेल, तर आयुक्त, दिव्यांग कल्याण संबंधित उपक्रम तात्काळ बंद करतील. अशा वेळी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे कायमस्वरूपी समायोजन होईपर्यंत त्यांना समान प्रकारच्या उपक्रमांमध्ये तात्पुरत्या स्वरूपात हस्तांतरित करण्यात येईल. यासाठी जवळच्या शाळांची क्षमता तात्पुरती वाढवली जाईल.शाळा संहितेनुसार विद्यार्थ्यांची पटनिर्धारण प्रक्रिया दरवर्षी १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करणे बंधनकारक असून, पटनिर्धारणानंतर अतिरिक्त ठरलेल्या कर्मचा-यांची यादी नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात व त्यानंतर दर महिन्याला संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. अतिरिक्तकर्मचा-यांचे समायोजन एका महिन्यात पूर्ण करणे आवश्यक असल्याचे सचिव मुंढे यांनी सांगितले.सचिव मुंढे म्हणाले, समायोजन शक्यतो संबंधित जिल्ह्यात, अन्यथा लगतच्या किंवा इतर जिल्ह्यांमध्ये करण्यात येईल. आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या कर्मचा-यांना समान वेतनश्रेणीतील समकक्ष पदावर नियुक्ती देण्यात येणार असून, प्रथम दिव्यांग कर्मचा-यांना प्राधान्य दिले जाईल. आदेशानंतर विहित कालमर्यादेत रुजू न झाल्यास शिस्तभंग कारवाई करण्यात येईल. अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध असताना नवीन भरतीस मान्यता दिली जाणार नाही. समायोजनास नकार देणा-या किंवा परस्पर भरती करणा-या संस्थांवर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल. दिव्यांग कल्याण विभागाच्या नियंत्रणाखालील विशेष शाळा व कार्यशाळांमधील अतिरिक्तकर्मचा-यांचे विहित मुदतीत समायोजन करण्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर) तसेच आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांची राहणार असल्याचे सचिव मुंढे यांनी सांगितले. याबाबतचा शासन निर्णय दिव्यांग कल्याण विभागाने निर्गमित केला असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# न्यू नॉर्मल?

एकदिवसीय क्रिकेट सामन्याचा धावफलक स्थिर वाटावा, इतक्या वेगाने महापालिका निवडणुकीसंदर्भातल्या बातम्या दाखवणाऱ्या टीव्हीचा पडदा धावतो आहे. दर क्षणाला काहीतरी नवं घडतं आहे. जे बिघडलं असं वाटत होतं, ते घडतं आहे आणि जे घडलं असं गृहीत धरून चाललो, ते बिघडतं आहे. एकाही पक्षाचं संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक धोरण नाही. कुणाचेही मित्र पक्के नाहीत आणि शत्रू नक्की नाहीत. महापालिकांच्या हद्दी बदलल्या, की मित्र-शत्रूच्या व्याख्या बदलतात आणि पक्षाची धोरणंही इकडून तिकडे १८० अंशात फिरतात. जिथे पक्षपातळीवर 'भेदाभेद भ्रम अमंगळ' अशी भावना आहे, तिथे पक्षातल्या इच्छुक उमेदवारांनी तरी तशी भावना का बाळगावी? इच्छुकही 'सबै भूमी गोपालकी' या न्यायाने क्षणार्धात गळ्यातला गमछा बदलून नव्या बोहल्यावर चढायला तयार असतील, तर त्यांना दोष देण्यात काय अर्थ आहे? वैचारिक बांधिलकी पक्षांनाच महत्त्वाची वाटत नसेल, तर कार्यकर्त्यांना त्याबाबत कसा दोष देता येईल? पक्षनिष्ठा, नेत्यांची सोबत या गोष्टीही दिवसेंदिवस बिनमहत्त्वाच्या ठरू लागल्या आहेत. युती आणि आघाडीची गणितं जुळवताना आपल्या हक्काची जागा राखता आली नाही, तर नेत्यांचा नाईलाज होतो. तेच आपल्या 'निष्ठावंता'ला बाहेरचा मार्ग दाखवतात; 'तिकडले' दरवाजे त्याच्यासाठी उघडले जातील याचीही व्यवस्था करतात. त्यामुळे, वर्षांनुवर्षे एखाद्या पक्षात राहिलेला कार्यकर्ता किंवा कोणा नेत्यासाठी सतत आघाडीवर राहिलेला अचानक गमछा बदलून वेगळेच रंग दाखवू लागला, तर त्याचं आश्चर्य वाटण्याची ही शेवटची निवडणूक असेल! महाराष्ट्राचं राजकारण जर असंच प्रवाहपतित होऊन पुढे जाणार असेल, तर यापुढे मतदाराला कशाचंच आश्चर्य वाटणार नाही, हा यातला सर्वात मोठा धोका आहे. नवीन पिढीला तर हेच 'न्यू नॉर्मल' वाटेल. पक्षसंघटनांचं अस्तित्व आणि संविधानाने स्पष्ट केलेल्या राजकीय पक्षांच्या व्याख्या, लक्षणं वेगाने विरून जातील. यापूर्वी कधीही न पाहिलेलं संपूर्ण व्यवहारवादी राजकारण या निवडणुकीत पाहायला मिळतं आहेच. महानगरपालिकांनंतरच्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका झाल्या, की त्यानंतर येणाऱ्या निवडणुका यापुढचा टप्पा दाखवतील, ते समजून घेण्यासाठीच त्या निवडणुकांची उत्सुकता असेल! भारतीय जनता पक्ष आणि शिवसेना यांची युती सर्वप्रथम जाहीर झाली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण किंवा शिंदे आणि वनमंत्री गणेश नाईक ही न जमणारी समीकरणं या युतीसाठी जमवली गेली. त्यांच्या एकत्रित बैठका झाल्या. मतभेद मिटवून युती झालीच पाहिजे, या निर्धाराने सगळे नेते वागताना दिसले. जिथे अवघड वाटत होतं, तिथे वरिष्ठ नेतृत्वाने हस्तक्षेप करून प्रश्न सोडवले. वरिष्ठ नेतृत्व त्याबाबत यशस्वीही झालं. पण, जिथे अडचण येईल असं वाटत नव्हतं, तिथेच घोडं अडलं. पुणे, नाशिक आणि अन्य एक-दोन ठिकाणी युतीसाठी परिस्थिती कसोटीची ठरते आहे. स्थानिक नेतृत्वावर न सोडता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच तिथल्या गाठी सोडव्याव्या लागतील, असं दिसतं आहे. इच्छुकांची संख्या सगळीकडेच अमाप आहे. त्यातून काही प्रश्न निर्माण झाले असले, तरी निकालानंतर या महापालिका सुरळीतपणे चालायच्या असतील, तर वरिष्ठ नेत्यांनीच समजुतीने विचार केला पाहिजे. मार्ग काढायचाच या निर्धाराने संवाद झाला, तर ते कठीण नाही. राज्य चालवताना जे मतैक्य दिसतं, तेच स्थानिक स्वराज्य संस्थांत उतरल्याशिवाय राज्यात 'ट्रिपल इंजिन' धावणार नाही! काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची युती वरवर आकर्षक दिसत असली, तरी ती काँग्रेसमधल्याच अनेकांच्या पचनी पडलेली नाही. पक्षाच्या मुंबईच्या अध्यक्षा वर्षा गायकवाड २५ वर्षांनंतरच्या या ऐतिहासिक घोषणावेळी उपस्थित नव्हत्या, यातूनच काय ते स्पष्ट होतं. 'मनसे नको' या अट्टहासापायी महाविकास आघाडी त्यांनीच मोडली आणि आता 'वंचित'लाही त्यांचाच विरोध आहे. राष्ट्रीय समाज पक्ष, आणि गवई गटाला सोबत घेण्याबाबत त्यांची भूमिका काय आहे, ती त्यांनी अजून स्पष्ट केलेली नाही. 'वंचित'बरोबरची युती ज्यांनी परस्पर घडवली, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ आणि प्रवक्ते सचिन सावंत यांचं मुंबईच्या पक्षात किती वजन आहे, हे ज्यांना माहिती आहे ते या युतीचे नेमके परिणाम समजू शकतील. काँग्रेस आणि वंचितच्या युतीमुळे आता महायुतीलाही रिपब्लिकन पक्षाला (आठवले) बऱ्यापैकी जागा देऊन सामावून घ्यावं लागेल. प्रकाश आंबेडकर यांच्यामुळे केंद्रीय समाजकल्याण राज्यमंत्री रामदास आठवले यांचा नेहमी फायदा होतो, तो असा. मुंबईत खरी ताकद कोणाची हे दाखवून देण्याची दोघांनाही संधी आहे. नव्या पिढीचा कल त्यामुळे स्पष्ट होणार आहे. सर्वच राजकीय पक्षांना या पुढची राजकीय गणितं मांडताना या मुकाबल्याचा फायदा होईल! राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (दोन्ही) आजही राजकीय डावपेचांसाठी खुद्द शरद पवार यांच्याशिवाय अन्य कोणी नाही, हे पुन्हा एकदा दिसते आहे. पक्षसंघटना शिल्लक नसताना राज्याच्या राजकारणात अस्तित्व राखण्यासाठी ते पुन्हा एकदा स्वतःची प्रतिमा पणाला लावून डाव खेळताहेत. पुतण्या अजित पवार यांना त्यांनी महायुतीच्या सीमारेषेवर आणून ठेवलं आहे. मुंबई, पुणे आणि पिंपरी-चिंचवड या तीन महापालिकांवरच लक्ष केंद्रित केलं आहे. दोन्ही राष्ट्रवादींच्या हातमिळवणीला महायुतीतून काही अडचण आलीच, तर त्यांनी मुंबईत ठाकरे बंधूंसोबत; अन्यत्र काँग्रेसबरोबर बोलणी सुरू ठेवली होती. 'जिथे चांगला सौदा होईल, तेच धोरण' या न्यायाने त्यांनी सगळ्यांनाच बोलण्यांत गुंतवून ठेवलं. त्याचा फटका शेवटी जे यात गुंतले, त्यांनाच बसणार आणि ते सगळे पुन्हा पवार यांच्या बेभरवशी राजकारणाच्या नांवे खडे फोडणार!

# बंदरांच्या आधुनिकीकरणातून अर्थशक्तीचा उदय

**भारताचा सुमारे ९५ टक्के व्यापार समुद्रमार्गे होतो. समुद्र हा भारताच्या व्यापाराचा जीवनमार्ग आहे. कच्चे तेल आणि कोळशापासून इलेक्ट्रॉनिक्स, कापड आणि कृषी उत्पादनांपर्यंत देशाच्या आयात आणि निर्यातीचा मोठा भाग व्यस्त बंदरांमधून जातो. जागतिकीकरणामुळे पुरवठा साखळ्यांमध्ये खोलवर परस्परावलंबन निर्माण झाले असून भारत एक प्रमुख उत्पादन आणि ऊर्जा केंद्र म्हणून उदयास आला आहे.**

जागतिक सागरी शक्ती म्हणून स्वतःला स्थापित करण्याच्या उद्देशाने एक धाडसी पाऊल उचलून भारताने 'मेरिटाईम इंडिया व्हिजन २०३०' (एआयव्ही) लॉंच केले. २०२१ मध्ये सुरू झालेल्या या परिवर्तनकारी रोडमॅपमध्ये १५० हून अधिक धोरणात्मक उपक्रमांचा समावेश आहे. बंदरांचे आधुनिकीकरण, शिपिंग क्षमता वाढवणे आणि क्षमता आणि कौशल्य विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून अंतर्गत जलमार्गांना बळकट करणे हे या दृष्टिकोनाचे उद्दिष्ट आहे. केवळ मालवाहतुकीचा आराखडा न राहता 'एमआयव्ही २०२०' हे व्यापार, गुंतवणूक आणि रोजगारासाठी एक उत्प्रेरक आहे. यामुळे भारताच्या आर्थिक विकासाचा आणि जागतिक स्पर्धात्मकतेचा मार्ग मोकळा होतो. भारताचे सागरी क्षेत्र वेगाने वाढत आहे. बंदरे, किनारी नौवहन आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये विक्रमी कामगिरी भारताला आर्थिक विकासाच्या नवीन मार्गावर पुढे नेत आहे. या क्षेत्राची प्रगती राष्ट्राला बळकट करण्यात त्याची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करते. भारताच्या बंदर क्षेत्राने प्रचंड परिवर्तनकारी झेप घेतली आहे. बंदरांची एकूण क्षमता १४० कोटी टनांवरून २७६.२ कोटी टन झाली आहे. क्षमतेतील ही वाढ आधुनिकीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विकासात होणाऱ्या मोठ्या गुंतवणुकीचे प्रतिबिंब आहे. मालवाहतुकीचे प्रमाणदेखील प्रभावीपणे वाढले, ९७.२ दशलक्ष टनांवरून १५९.४ दशलक्ष टन मालवाहतूक झाली. यावरून सागरी व्यापारात आणि बंदरांच्या कार्यक्षमतेत प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते.

२०२४-२५ मध्ये प्रमुख बंदरांमधून ८५.५ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली. २०२३-२४ मध्ये या बंदरांमधून ८१.९ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली होती. कामकाजात लक्षणीय सुधारणा झाल्यामुळे जलवाहतुकीचा सरासरी वेळ ९३ तासांवरून फक्त ४८ तासांवर आला आहे. यामुळे एकूण उत्पादकता आणि जागतिक स्पर्धात्मकता आणि या क्षेत्राची आर्थिक ताकददेखील वाढली आहे. या क्षेत्राचा निव्वळ वार्षिक अधिशेष १,०२६ कोटी रुपयांवरून ९,३५२ कोटी रुपयांपर्यंत झपाट्याने वाढला आहे. तो महसूल निर्मिती आणि खर्च व्यवस्थापनात सुधारणा दर्शवतो. ऑपरेटिंग रेशो ७३ टक्क्यांवरून ४३ टक्क्यांपर्यंत सुधारणे हे संवहनी आणि फायदेशीर बंदर ऑपरेशन्सच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. भारताचे शिपिंग क्षेत्र सातत्याने विकसित होत आहे. भारतीय ध्वजांकित जलवाहतुकीची संख्या १,२०५ वरून १,५४९ पर्यंत वाढली आहे. ती देशाच्या व्यापक सागरी उपस्थितीचे संकेत देते. भारतीय ताफ्याचे एकूण टनेजदेखील दहा दशलक्ष ग्रॉस टनांनी वाढून १.३५ कोटी ग्रॉस टन झाले आहे. त्यांची शिपिंग क्षमता अधिक मजबूत आणि अधिक सक्षम होण्याची अपेक्षा आहे. किनारी शिपिंगमध्येही लक्षणीय गती दिसून आली आहे. मालवाहतूक ८.७० दशलक्ष टनांवरून १६.५० दशलक्ष टन झाली आहे. यामुळे कार्यक्षम, परवडणाऱ्या आणि पर्यावरणपूरक वाहतुकीच्या पद्धतींकडे कल वाढतो. भारतीय अंतर्देशीय जलमार्ग प्राधिकरणाने (आयडब्ल्यूएआय) म्हटले आहे, की ते १४.६० दशलक्ष टन मालाची विक्रमी वाहतूक करेल. ही आंतरदेशीय जलवाहतूक क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक घटना आहे. २०१४ च्या १.८० दशलक्ष टनाच्या तुलनेत ही वाढ ७१० टक्के आहे. 'आयडब्ल्यूएआय'ने



'हल्दिया मल्टीमोडल टर्मिनल' (एमएमटी) आयआरसी नॅचरल रिसोर्सेसकडे सोपवले आहे. सरकार आणि खासगी क्षेत्राच्या भागीदारीमध्ये अंतर्गत जलमार्ग पायाभूत सुविधांचे अपग्रेडिंग आणि बहुमॉडेल वाहतुकीला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. जागतिक बँकेच्या मदतीने बांधलेल्या पश्चिम बंगालमधील टर्मिनलची क्षमता ०.३० दशलक्ष टन आहे. प्रवासी जलवाहतूक आणि रोप-पॅक (वाहने आणि वाहने वाहून नेणारी जहाजे) ची लोकप्रियतादेखील बरीच वाढली आहे. २०२४-२५ मध्ये ७.५ कोटींहून अधिक वाहने त्यातून प्रवास करतील. यावरून दिसून येते, की लोक सुरक्षित आणि कार्यक्षम प्रवासासाठी जलद गतीने जलआधारित वाहतुकीचा अवलंब करत आहेत. २०३० मध्ये बंदरे, जहाजबांधणी आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये एकूण ३-३.५ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची योजना आहे. जहाजबांधणीला चालना देण्यासाठी आणि सागरी परिसंस्थांना पुनरुज्जीवित करण्यासाठी अलीकडेच जाहीर केलेल्या ६९ हजार ७२५ कोटी रुपयांच्या ऐतिहासिक पॅकेजसह इंडिया टू कॉन्टिनेंटल वर्ल्डवाइड त्याच्या विशाल किनाऱ्याचा वापर करून स्थापनेसाठी एक धोरणात्मक मार्ग तयार करत आहे. लक्ष्यित वाटप आणि धोरणात्मक उपक्रम एकूण दृष्टिकोनाशी सहज जोडलेले आहेत. त्यामुळे प्रस्तावित गुंतवणूक यशस्वी होते. प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. सागरी विकास निधी (एमडीएफ) भारताच्या नेव्हिगेशनल क्षमता आणि जहाजबांधणी क्षमतेच्या विस्तारासाठी दीर्घकालीन वित्तपुरवठा करेल. याव्यतिरिक्त, २४ हजार ७३६ कोटी रुपयांच्या खर्चासह सुधारित जहाज बांधणी वित्तीय सहाय्य योजना (एसबीएफएएस) देशांतर्गत खर्चाशी संबंधित तोटे दूर करेल. १९,९८९ कोटी रुपयांच्या खर्चासह, जहाज बांधणी विकास योजना (एसबीडीएस) ग्रीनफील्ड क्लस्टर्स, यार्डचा विस्तार आणि जोखीम कव्हरेजला प्रोत्साहन देते. याव्यतिरिक्त, विशाखापट्टणममध्ये ३०५ कोटी रुपये खर्चून बांधलेले 'इंडियन शिप टेक्नॉलॉजी सेंटर' (आयएसटीसी) हे जहाज डिझाइन, संशोधन आणि विकास, अभियांत्रिकी आणि कौशल्य विकासाचे राष्ट्रीय केंद्र आहे.

ईशान्य भारतातील अंतर्देशीय जलमार्ग पायाभूत सुविधांच्या विकासात एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करण्यात आली आहे, जी देशाच्या नदी नेटवर्कद्वारे वाहतूक आणि व्यापाराला महत्त्वपूर्ण चालना देते. या गुंतवणुकीपैकी सुमारे तीनशे कोटी रुपयांचे प्रकल्प आधीच पूर्ण झाले आहेत तर उर्वरित प्रकल्प अद्याप पूर्ण झालेले नाहीत. त्यात कनेक्टिव्हिटी आणि प्रादेशिक व्यापार वाढवणे समाविष्ट आहे. या प्रदेशात मोठ्या प्रमाणात पर्यटन सुरू करण्याची तयारी सुरू आहे. हावडा येथील हुगळी कोचीन शिपयार्डमध्ये २५० कोटी रुपयांच्या एकत्रित गुंतवणुकीसह दोन लक्झरी क्रूझ जहाजे बांधली जात आहेत. हे जहाज ब्रह्मपुत्रा नदीतून प्रवास करेल. सरकारच्या 'क्रूझ इंडिया मिशन'अंतर्गत आसामच्या नदी पर्यटनाच्या लॅंडस्केपमध्ये ते बदल घडवून आणील, अशी अपेक्षा आहे. भारताला 'सागरमाला प्रकल्प' हा 'समुद्री भारत व्हिजन २०३०' आणि 'समुद्री अमृत कल व्हिजन'चा एक प्रमुख आधारस्तंभ आहे. हा कार्यक्रम लॉजिस्टिक्स खर्च कमी करणे, व्यापार कार्यक्षमता वाढवणे आणि हरित वाहतूक नेटवर्कद्वारे रोजगार निर्माण करणे यावर केंद्रित आहे. याअंतर्गत, २०३५ पर्यंत ५.८ लाख कोटी रुपयांचे ८४० प्रकल्प राबवले जातील. त्यापैकी १.४१ लाख कोटी रुपयांचे २७२ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. भारताचे सागरी क्षेत्र एका निर्णायक दशकात प्रवेश करत आहे. तिथे नवीन कायदे, मोठे प्रकल्प आणि जागतिक गुंतवणूक महत्त्वाकांक्षा 'सागरी भारत व्हिजन, २०३०' ला आकार देत आहेत.

हरित तंत्रज्ञान आणि डिजिटल नवोपक्रमावर भर देऊन भारत केवळ त्याच्या व्यावसायिक मागण्या पूर्ण करण्यासाठीच नाही, तर सागरी क्षेत्रात एक नेता म्हणून उदयाला येण्यासाठीही सज्ज होत आहे.

हे लक्षात घेऊन 'सागरी अमृतकाल व्हिजन, २०४७' तयार केले जात आहे. तो भारताच्या सागरी पुनरुत्थानाचा दीर्घकालीन रोडमॅप आहे. त्यात बंदरे, किनारी नौहरगोहन निर्माण यांचा समावेश आहे.

'हरित नेव्हिगेशन' उपक्रमांसाठी सुमारे ८० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राखून ठेवण्यात आली आहे.

## सरत्या वर्षातील सरकारचा सर्वात महत्वाचा निर्णय!

२०२५ हे वर्ष निरोप घेत असताना या वर्षात आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अनेक आमूलाग्र बदल दिसून आले आणि २०२६ या वर्षात आधुनिक तंत्रज्ञान अधिक मोठी झेप घेणार हे नक्की. अत्यंत वेगाने बदल होत असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), बिग डेटा, इंटरनेट ऑफ थिंग्ज, मशीन लर्निंग, रोबोटिक्स, थ्री डी प्रिंटिंग, जैव तंत्रज्ञान, नॅनो टेक्नॉलॉजी, चॅटबॉट, अक्षय ऊर्जा तंत्रज्ञान आणि ड्रोन तंत्रज्ञान यांसारख्या तंत्रज्ञानाचा समावेश आहे. त्यापैकी सर्वात चर्चेत असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आता कृषी, आरोग्य, उद्योग, व्यवसाय, शिक्षण, बँकिंग आणि फायनान्स अशा सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढला आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता हे सध्याच्या काळातील सर्वात अधिक परिवर्तनशील तंत्रज्ञानापैकी एक असल्यामुळे त्याचा आपल्या दैनंदिन जीवनावर सर्वाधिक प्रभाव पडत आहे.

अशा प्रकारे सर्वच क्षेत्रांमध्ये वाढणारा कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव लक्षात घेऊन तसेच या तंत्रज्ञानातील माहिती, तपशील व बारकावे उमलत्या वयापासूनच विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे अवगत व्हावेत यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून देशभरातील शाळांमध्ये तिसऱ्या इयत्तेपासून म्हणजेच प्राथमिक शिक्षणातच कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाचा समावेश करण्यात येणार आहे.

शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल घडवण्याच्या दृष्टीने कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयाचा प्राथमिक शिक्षणातच समावेश करण्याचा सरकारचा निर्णय २०२५ या सरत्या वर्षातील सर्वात महत्वाचा निर्णय म्हणावा लागेल.

**प्रदीप मोरे**

## बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या निवडणूकीचा बिगुल वाजला असून आता प्रत्येक राजकीय पक्षांकडून जनकल्याणकारी जाहीरनाम्यांचा पाऊस पडेल दर पाच वर्षांनी हि प्रक्रिया पुनरावृत्त होतेचं असते मात्र प्रश्न असा उरतो की, या गोष्टींचे तारतम्य कीती पक्ष बाळगतात, बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले हे फक्त आणि फक्त बोलण्यापूरते, भाषण देण्यापुरते आहे असे वाटू लागले आहे.कारण कोणताही राजकीय पक्ष या जाहिरनाम्याशी बांधील राहिलेला नाही असे दिसून येत आहे.

निवडणूका जिंकायच्या आणि येरे माझ्या मागल्या, मागे तसे पुढे हाच कित्ता गिरवायचा हे राजकीय पुढाऱ्यांना अंगवळणी पडले असावे नुकताच नगरपालिकांच्या निवडणुका झाल्या यामध्ये मोठ्याप्रमाणात पैसे वाटून निवडून आल्याचे बोलले जात आहे त्यामूळे निवडून आलेली व्यक्ती विकासात्मक कामे काय करणारं ? यावर शाशंकता आहे पूर्णपणे निवडणुकीची दिशा बदलत असून पार लोकशाही मोडीत निघते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे निवडणूका घेण्यापेक्षा टेंडर अर्थात निविदा पद्धतीने पदे वाटली तर बरे होईल अशी दर्जाहीन निवडणूक प्रक्रिया झाली आहे सर्वसामान्य कार्यकर्त्यांना कात्रजचा घाट दाखवून गुंड प्रवृत्तीच्या लोकांना स्थान मिळत असेल तर काय कामाच्या निवडणूका आपले महानगर प्रामुख्याने भ्रष्टाचार मुक्त असले पाहिजे, स्वच्छ हवा, पाणी, प्रदूषण विरहित शहर असले पाहिजे रस्ते, वाहतुकीची कोंडी, पार्किंग व्यवस्था, अद्यावत रुग्णालये, शैक्षणिक सुविधा, रोजगार उपलब्ध असावा सर्वांना विशेष करुन महिलांना निर्भयपणे वावरण्यासाठी कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे महत्वाचे आहे लोकशाही टिकविण्यासाठीआता केवळ जाहिरनामे वाचून चालणारं नाहि तर मतदारांनीही आशा भ्रष्ट प्रवृतींना रोखण्यासाठी जागरुक होण्याची वेळ आली आहे.

**राजू जाधव**

## आय.पी.एल. मध्ये बांगलादेशी खेळाडू नकोत !

आय.पी.एल. २०२६ साठी खेळाडूंचा लिलाव हल्लीच पार पडला ज्यामध्ये 'कोलकाता नाईट रायडर्स' संघाने बांगलादेशी गोलंदाज मुस्तफिजुर रहमान याला खरेदी केले. मागील एक वर्षाहून अधिक काळ बांगलादेशमध्ये माजलेले अराजक अद्याप शमलेले नाही. गेल्या काही दिवसांत हिंदूंच्या नरसंहाराच्या घटना एकामागोमाग एक समोर येत आहेत. हिंदूंना वेचून ठार केले जात आहेत, त्यांची घरे, दुकाने पेटवली जात आहेत. हिंदू स्त्रियांवर अत्याचार केले जात आहेत. याउपरांत भारत सरकार या भीषण नरसंहाराविरोधात काहीच करताना दिसत नाही. हिंदूंच्या संहाराचे व्हिडीओ प्रतिदिन सामाजिक माध्यमांवर येऊ लागल्याने बांगलादेशच्या विरोधात सर्वसामान्य जनतेच्या भावना तीव्र होणे स्वाभाविक आहे. आता तर आय.पी.एल. च्या निमित्ताने बांगलादेशी खेळाडूंसाठी पायघड्या घालण्याचे काम चालू आहे. ज्याचे पडसाद देशभरात उमटू लागले आहेत. बांगलादेशी क्रिकेटपटूंना खरेदी करण्याच्या आणि खेळवण्याच्या विरोधात हरिद्वारचे साधू-संत उघडपणे समोर आले आहेत. 'जर बांगलादेशी क्रिकेटपटूंसमवेत भारतीय खेळाडू खेळले, तर ते या विरोधात रस्त्यावर उतरतील. तसेच भारतीय खेळाडूही 'जिहादी' म्हणवले जातील' असा इशारा या संतांनी दिला आहे. ज्या भावना आज या साधू संतांच्या आहेत त्याच आज प्रत्येक देशप्रेमी नागरिकांच्या आहेत. सामान्य जनतेच्या तीव्र विरोधामुळे भारताचा कट्टर शत्रू असलेल्या पाकिस्तानातील खेळाडूंना आय.पी.एल. मध्ये खेळण्यावर निर्बंध आणण्यात आले. सध्या बांगलादेशमध्ये सुरु असलेल्या हिंदूंच्या नरसंहाराचा पार्श्वभूमीवर तेच धोरण बांगलादेशी खेळाडूंच्या बाबतीतही अवलंबावे नाहीतर विनाकारण जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल हे निश्चित आहे !

**जगन घाणेकर**

## पक्षबदलूंना जनतेने धडा शिकवा !

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष जोमाने तयारीला लागले आहेत. पक्षाची अधिकृत उमेदवारी देताना वार्डातील जुन्या जाणत्या एकनिष्ठ कार्यकर्त्यापेक्षा त्या वार्डात वजन कुणाचे आहे याचा विचार आधी केला जात आहे मग तो कोणत्याही पक्षाचा का असेना. त्याला आपल्याकडे खेचण्याची स्पर्धा सध्या रंगताना पाहायला मिळते आहे. एखाद्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या उमेदवाराने पक्षाशी एकनिष्ठ राहावे यासाठी १९८५ मध्ये पक्षांतरबंदी कायदा करण्यात आला. या कायद्यान्वये उमेदवाराने निवडून आल्यानंतर अन्य पक्षात प्रवेश केला, तर त्याचे त्या सभागृहाचे सदस्यत्व रद्दबातल ठरवण्यात येते; मात्र निवडणुकांच्या तोंडावर जो घोडेबाजार चालतो त्यावर दुर्दैवाने कायद्याचा कोणताच अंकुश ठेवण्यात आलेला नाही. पक्षाने तिकीट नाही दिले, पक्षश्रेष्ठींविषयी नाराजी, पक्षांतर्गत मतभेद किंवा अन्य पक्षाने दिलेली मोठी ऑफर अशा या ना त्या कारणाने अनेक नेतेमंडळी निवडणुकांच्या तोंडावर पक्ष बदलत असतात. पक्षाची प्रमुख मंडळीही अन्य पक्षातील मोठा मासा आपल्या गळाला लागावा यासाठी बराच काथ्याकूट करत असतात.

ही पक्षबदलू मंडळी आपल्याशी एकनिष्ठ असलेल्या कार्यकर्त्यांनाही सोबत घेऊन जातात. बड्या राजकीय पक्षांना हे नित्याचे असले, तरी सामान्य कार्यकर्त्यांचा मात्र अशा घटनांतून हिरमोड होत असतो.

आपल्या स्वार्थासाठी दर निवडणुकांना खांद्यावरील झेंडे बदलणारी ही मंडळी कधीतरी जनतेशी एकनिष्ठ राहू शकतील का ? अशा पक्षबदलू स्वार्थांध उमेदवारांना खरेतर जनतेनेच मतदानातून धडा शिकवायला हवा.

**मोक्षदा घाणेकर**

# अटलजी, मोदी ते योगी

*कुमार विश्वास यांनी उलगडले भाजपच्या तीन पिढ्यांचे 'कार्यसूत्र'....*

माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त लखनौ येथे आयोजित कार्यक्रमात प्रसिद्ध कवी डॉ. कुमार विश्वास यांनी भारतीय जनता पक्षाच्या तीन पिढ्यांमधील कार्यशैलीतील बदलाचे रंजक आणि मार्मिक विवेचन केले. यावेळी त्यांनी भाजपच्या नेतृत्वात काळाप्रमाणे होत गेलेल्या बदलांचा प्रवास एका साध्या पण प्रभावी उदाहरणातून मांडला. 'राजकीय इच्छाशक्ती' व्यवस्थेत कसा बदल घडवू शकते, याचे विश्लेषण त्यांनी आपल्या भाषणातून केले.

कुमार विश्वास यांनी व्यवस्थेतील त्रुटींना 'कचरा' असे संबोधित करत नेतृत्वाचे तीन महत्त्वाचे टप्पे मांडले:

पहिली पिढी: अटलबिहारी वाजपेयी (आदर्शवाद आणि संस्कार) - अटलजींच्या काळातील नेतृत्व हे आदर्शवाद आणि संयमावर आधारित होते. विश्वास म्हणाले की, 'त्या पिढीत जर आपल्या शेजाऱ्याने कचरा फेकला असेल, तर तो आपण स्वतः साफ करावा, इतके ते सौम्य संस्कार होते.' तो काळ लोकशाही मूल्यांना जपणारा, सर्वांना सोबत घेऊन चालणारा आणि सुसंस्कृत मार्गदर्शनाचा होता.

दुसरी पिढी: नरेंद्र मोदी आणि राजनाथ सिंह (उत्तरदायित्व आणि शिस्त) - पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वात जबाबदारी आणि शिस्तीला महत्त्व आले. ही पिढी समोरच्याला जाब विचारणारी आहे. 'कचरा तुम्ही टाकला आहे, तर तो तुम्हीच साफ केला पाहिजे,' असे सांगण्याचे धाडस या नेतृत्वाने दाखवले. यातून प्रशासकीय उत्तरदायित्व निर्माण झाले.

तिसरी पिढी: योगी आदित्यनाथ (निर्णायक आणि कठोर प्रशासन) - उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या कार्यपद्धतीचे वर्णन करताना विश्वास यांनी त्यांच्या आक्रमक शैलीचे कौतुक केले. ते म्हणाले की, आजचे नेतृत्व केवळ कचरा साफ करण्यावर थांबत नाही, तर 'कचरा साफ करा आणि तो टाकणाऱ्या प्रवृत्तीलाही साफ करा', अशा कठोर भूमिकेत आहे.' या निर्णयामुळेच उत्तर प्रदेशातील गुन्हेगारी आणि भ्रष्टाचारावर मोठा वचक निर्माण झाला आहे.

एका पिढीने सांगितले कचरा तुम्ही स्वतः साफ करा, दुसऱ्या पिढीने सांगितले शेजाऱ्याला साफ करायला सांगा, तर सध्याच्या तिसऱ्या पिढीने कचरा टाकणाऱ्यालाच साफ करण्याचा निर्णय घेतला आहे,' अशा शब्दांत त्यांनी तिन्ही पिढ्यांमधील कामाचा फरक स्पष्ट केला.देशातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या उत्तर प्रदेशात गेल्या काही वर्षांत जो सकारात्मक बदल झाला आहे, त्याचे श्रेय कुमार विश्वास यांनी प्रबळ राजकीय इच्छाशक्तीला दिले. एकेकाळी अव्यवस्थेसाठी ओळखले जाणारे हे राज्य आज सर्वच क्षेत्रांत प्रगती करत असून 'उत्तम प्रदेश' म्हणून नावारूपाला येत आहे. नेतृत्वाकडे जर स्पष्ट व्हिजन आणि जिद्द असेल, तर समाज आणि व्यवस्था कशी बदलू शकते, याचे हे प्रशासकीय मॉडेल असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**अविनाश देशपांडे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# दुचाकी चोरट्यास अटक, १ लाख ८० हजाराच्या ६ दुचाकी जप्त

**जनमाध्यम प्रतिनिधी**



आर्णी - पोलिसांनी ठाणेदार नीलेश सुरटकर यांचे मार्गदर्शनात दुचाकीच्या अट्टल चोरट्यास अटक करून जोरदार कामगिरी केली. त्याचे जवळून विविध पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या तब्बल 6दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत.

बाजार भाव नुसार दुचाकींची किंमत 1लाख 80हजार असल्याचे सांगितले आहे.

पोलीस स्टेशन आर्णी येथे दि. 27/12/2025 रोजी फिर्यादी नामे संदिप उत्तम चव्हाण रा. वडगाव ता.दिग्रस जि. यवतमाळ याची हिरो स्प्लेंडर प्लस ही अज्ञात चोराने चोरुन नेली असल्याबाबत तक्रार दिल्याने त्याचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशनला अज्ञात आरोपीविरुद्ध अप.क्र.1013/2025 कलम 303 (2) BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा आर्णी पोलीसांनी तांत्रीक तपासाच्या माध्यमातुन व गोपनिय माहीती वरुण शोध घेण्यात आला असता, सदर मोटार सायकल चोरटा नामे सचिन संदिप सुकळकर उर्फ आकाश वय 32 वर्ष रा. लाख रायजी ता.दिग्रस हा असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास गुन्हा दाखल होताच 24 तासाच्या आत ताब्यात घेऊन त्याचेकडून गुन्ह्यातील त्याने चोरलेली MH-29-AY-8257 किंमत अंदाजे 30,000/-रु.ची जप्त करुन त्यास मोटार सायकल चोरी संबंधाने अधिक विचारपूस केली असता त्याने यापूर्वी पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथिल 1 मोटार सायकल व पोलीस स्टेशन घाटंजी येथिल एक मोटार सायकल चोरील केल्याची कबुली दिल्याने त्याचे कडून 01 हीरो स्प्लेंडर प्लस, 01 हीरोहोन्डा सिडी डिलक्स, 01 बजाज बॉक्सर, 01 हीरोहोन्डा स्प्लेंडर, 01 हीरो सुपर स्प्लेंडर अशा एकुण 06 मोटारसायकल एकुण किंमत 1,80,000/- रु च्या जप्त केल्या. सदरची कार्यवाही कुमार चिंता, पोलीस अधिक्षक यवतमाळ, अशोक थोरात, अप्पर पोलीस अधिक्षक यवतमाळ, सिद्धेश्वर भोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी दारव्हा यांचे मोर्गदर्शनाखाली पो.स्टे आर्णी येथील पोलीस निरिक्षक निलेश सुरडकर, स. पो. नि. मिलिंद पारडकर, स. पो. नि. प्रशांत देशमुख पोहवा गुणवंत बोईनवाड,नितिन वास्टर, मनोज चव्हाण, पोकॉ आकाश गावंडे, आसिफ खल्लीखाऊ,आकाश पातुरकर यांच्या पथकाने यशस्वी रित्या पार पाडली.

# जगदंबा अभियांत्रिकीच्या 'विंग्स-२६' मध्ये हेल्मेट मॅन ऑफ इंडिया - राघवेंद्र सिंग






**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : स्थानिक जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयात दि. ३० डिसेंबरला वार्षिक स्नेहसंमेलन विंग्स-२६ मध्ये मुख्यअतिथी "हेल्मेट मॅन ऑफ इंडिया" म्हणून प्रख्यात असलेले राघवेंद्र सिंग यांची उपस्थिती लाभली. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अजाबराव वातीले, सचिव डॉ. शितल वातिले, संचालक पवन वातिले, प्राचार्य डॉ. प्रविण डाखोळे, उपप्राचार्य डॉ. विजय भांबेरे, प्राचार्य डॉ. राहुल बिजवार, सर्व विभाग प्रमुख, कार्यक्रम समन्वयक प्रा. अमोल ढूमणे, प्रा. धनश्री पोहरे, प्रा. ओम अडपावार, प्रा. दर्शना शंभरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

हेल्मेट मॅन ऑफ इंडिया राघवेंद्र कुमार यांनी विद्यार्थ्यांना हेल्मेटचे महत्व पटवून देताना सांगितले की हेल्मेट हे हॉस्पिटलच्या बिलापेक्षा खूप स्वस्त आहे, गाडीचा वेग आनंद देतो पण सुरक्षितता जीव वाचवते. हेल्मेट पोलिसांसाठी नसून ते तुमच्या कुटुंबासाठी आहे. एक अपघात तुमचे संपूर्ण आयुष्य बदलू शकतो. तुम्ही विद्यार्थी हे भविष्याचे नागरिक आहात त्यामुळे लहानपणापासूनच रस्ते सुरक्षा शिका व हेल्मेट घालण्याची सवय टाका कारण जीवन अमूल्य आहे त्याचे रक्षण करा. त्यांनी पालकांना संदेशात म्हटले की तुम्ही स्वतः आदर्श बना व हेल्मेट घाला म्हणजेच तुमची मुलेही घालतील कारण हेल्मेट हा पर्याय नाही ती गरज आहे. पोलीस अधीक्षक यवतमाळ कुमार चिंता यांनी विद्यार्थ्यांना दुचाकी वाहनासाठी हेल्मेट व चारचाकी वाहनाकरिता सिट बेल्ट यासंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती दिली. जगदंबा अभियांत्रिकीने हेल्मेट मॅन ऑफ इंडिया यांना बोलावून विद्यार्थ्यांमध्ये हेल्मेट संदर्भात जागरूकता निर्माण करण्यासाठी घेतलेला पुढाकार हा नक्कीच गौरवास्पद असल्याचे प्रतिपादन केले. राघवेंद्र सिंग यांनी भारतातील पूर्ण राज्यामध्ये आतापर्यंत ७५,००० पेक्षा जास्त हेल्मेटचे वाटप केलेले आहे. याप्रसंगी जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालया तर्फे राघवेंद्र सिंग व कुमार चिंता जिल्हा पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांच्या हस्ते सुमारे २५० हेल्मेटचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आहे. संस्थेचे सचिव डॉ. शीतल वातिले यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी शिस्तपणा, वेळेची योग्य नियोजन, चिकित्सावृत्ती, जिज्ञासा असे विविध सुप्त गुण अंगी जोपासावे. जीवनात यशस्वी होण्याकरता सर्वप्रथम ध्येय निश्चित करून ते धेय्य गाठण्यासाठी सतत प्रयत्नशील असावे. विंग्स-२६ स्नेहसंमेलनाचे आयोजन दिनांक २९ ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत करण्यात आले असून या स्नेहसंमेलना दरम्यान फॅशन शो, नाट्य, नृत्य, डिश व फ्लावर डेकोरेशन, प्रश्नमंजुषा, रांगोळी, कवी संमेलन, जेसीईटी झूम, वाद संवाद, मिमिक्री अशा विविध प्रकारच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व प्राध्यापक वृन्द, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी परिश्रम घेत आहेत.

## वेचक

### कला, वाणिज्य महाविद्यालय राळेगावचे ग्रंथपाल सुरेश फुलकर यांना आचार्य पदवी प्रदान



राळेगाव : येथील कला, वाणिज्य महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. सुरेश फुलकर यांना नुकतीच विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. त्यांच्या या शैक्षणिक यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील लौकिकात भर पडली आहे. त्यांचा संशोधन प्रबंधाचा विषय "रोल ऑफ पब्लिक लायब्रेरिज इन एनन्हान्सिंग सोसियल व्हॅल्यूज, सोसिओ-कल्चरल डेव्हलपमेंट अँड कम्युनिटी डेव्हलपमेंट ऑफ अमरावती डिव्हिजन इन महाराष्ट्र स्टेट" असा असून, सार्वजनिक ग्रंथालये समाजमूल्यांची जपणूक, सामाजिक-सांस्कृतिक विकास व समुदाय विकासात कशी महत्त्वाची भूमिका बजावतात यावर त्यांनी सखोल व अभ्यासपूर्ण संशोधन केले आहे. हा विषय समाजोपयोगी व वर्तमान काळाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. आपल्या यशाचे श्रेय श्री. सुरेश फुलकर यांनी आपले पीएच.डी. मार्गदर्शक डॉ. किशोर मांडगावकर, संस्थेचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब दायदार, सचिव श्री. बापूसाहेब भोयर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भास्कर सावरकर यांना दिले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थीवर्गाच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

### डॉ. चंचल कपिले यांना 'यवतमाळ रत्न पुरस्कार' प्रदान



यवतमाळ : समाजातील गोरगरीब, वंचित घटकांना आरोग्यसेवा मिळावी यासाठी सातत्याने झटणाऱ्या यवतमाळ येथील होमिओपॅथी डॉक्टर डॉ. चंचल कपिले यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल आंतरराष्ट्रीय मानवाधिकार फेडरेशनच्या वतीने 'यवतमाळ रत्न पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. निळोणा येथील मातोश्री वृद्धाश्रम येथे आयोजित कार्यक्रमात संस्कृती संवर्धन मंडळाचे सचिव श्री. प्रवीण बंडेवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. समाजसेवेचा वसा जपत डॉ. कपिले यांनी आरोग्याच्या माध्यमातून राबवलेले कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. गेल्या पाच वर्षांपासून यवतमाळ शहरात होमिओपॅथी उपचार सेवा देत असलेल्या डॉ. चंचल कपिले या केवळ डॉक्टर न राहता सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या सेवाव्रती म्हणून ओळखल्या जातात. गरजू, गोरगरीब रुग्णांना मोफत उपचार मिळावेत यासाठी त्या सातत्याने वैद्यकीय शिबिरांचे आयोजन करून आरोग्यसेवा पोहोचवण्याचे कार्य करत आहेत. त्यांचे वडील श्री. बाबा कपिले हे आदर्श शिक्षक म्हणून समाजात परिचित असून संस्कारांची हीच शिदोरी डॉ. कपिले यांच्या कार्यातून दिसून येते. या कार्यक्रमाला राहुल सोरटे (अध्यक्ष, यवतमाळ जिल्हा मानवाधिकार फेडरेशन), श्री. अरविंद इंगळे (सचिव), श्री. अनिस चव्हाण (जिल्हा सदस्य), श्री. बाबाराव कपिले, विमल राजकमल इंगळे, कोमल धरम डहाके, मयूर राऊत यांची उपस्थिती होती. यावेळी मानवाधिकार फेडरेशनच्या विदर्भ अध्यक्ष ॲड. मीनाक्षी माहेश्वरी यांनीही डॉ. चंचल कपिले यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. सामाजिक जाणिवेतून केलेल्या सेवेचा सन्मान म्हणजेच हा पुरस्कार असून, डॉ. चंचल कपिले यांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

### लोखंडी कोयत्याने एकावर हल्ला

दारव्हा : दारूच्या नशेत तरुणाने समाधीच्या ओट्यावर कसा काय झोपला, असे म्हणून एकावर कोयत्याने हल्ला चढवीत गंभीर जखमी केले. ही घटना तालुक्यातील नखेगाव शेतशिवारात २८ जानेवारी रोजी घडली. गणेश चौदार (५२) रा. नखेगाव ता. दारव्हा असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेनंतर त्यांनी दारवा पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी तक्रार दिली. त्यावरून आरोपी सुमित इदाले (३२) रा. नखेगाव याच्यावर गन्हा दाखल केला.

# सराईत गुन्हेगारांवर कठोर कारवाई करा : आयजी रामनाथ पोकळे



**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : अमरावती परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे सोमवारी जिल्हा दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी पोलीस ठाण्याच्या वार्षिक तपासणीनिमित्त स्थानिक अवधूतवाडी पोलीस ठाण्याला भेट दिली. या भेटीत त्यांनी गुन्ह्यांचा सविस्तर आढावा घेतला आणि सराईत गुन्हेगारांविरुद्ध कठोर कायदेशीर पावले उचलण्याचे निर्देश दिले.

वार्षिक तपासणीच्या अनुषंगाने आयजी रामनाथ पोकळे यांनी सोमवारी दुपारी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात दाखल झाले. पोलीस ठाण्याचे ठाणेदार नंदकिशोर काळे यांनी त्यांना मानवंदना दिली. त्यानंतर पोकळे यांनी पोलीस ठाण्याच्या कार्यालयातील कागदपत्रांची आणि परिसराची पाहणी केली. प्रलंबित गुन्ह्यांचा आढावा घेताना त्यांनी तपासातील त्रुटी दूर करून गुन्हे लवकरात लवकर उघडकीस आणण्याचे आदेश दिले. घरफोडी रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यासह घरफोडीच्या गुन्ह्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन गुन्हेगारांना तातडीने जेरबंद करावे. गुन्हे तपासात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा जास्तीत जास्त वापर करावा आणि सीसीटीएनएस प्रणालीचे कामकाज अचूक व अद्ययावत ठेवावे. क्षेत्रात वारंवार गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांची यादी करून त्यांच्यावर कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करावी. अशा सुचना दिल्या. तपासणी दरम्यान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गुन्ह्यांची संख्या, तपासाची टक्केवारी, आरोपींना झालेली शिक्षा आणि सध्या सुरू असलेले महत्त्वाचे तपास याची माहिती महानिरीक्षकांनी घेतली. यावेळी अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्यासह विभागातील इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद शाळांच्या दुरवस्थेविरोधात मनसेचे 'शाळा वाचवा' अभियान

**जनमाध्यम प्रतिनिधी**

> तातडीने उपाययोजना करण्याची प्रशासनाकडे मागणी

पांढरकवडा - तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांची दिवसेंदिवस होत चाललेली दुरवस्था लक्षात घेता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने 'शाळा वाचवा' अभियानांतर्गत प्रशासनाकडे तातडीच्या उपाययोजना करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे.

बोरगाव (कडू) येथील जिल्हा परिषद शाळेतील जीर्ण व धोकादायक वर्गखोल्या पाडण्याबाबतचा प्रस्ताव मागील एक वर्षापासून प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत यापूर्वी मनसेने केलेल्या पत्रव्यवहारानंतर शिक्षण विभागाने काही प्रमाणात सकारात्मक पावले उचलली होती, मात्र अद्यापही मुख्य फाईल मंजुरीअभावी रखडलेली आहे. जुनी इमारत कधीही दुर्घटनेस कारणीभूत ठरू शकते, त्यामुळे तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे. तसेच, वाढोणा (खुर्द) (गट ग्रामपंचायत घोडदरा) येथील जिल्हा परिषद शाळेची अवस्था अत्यंत दयनीय असून शाळेला संरक्षण भिंत नसल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शाळेचे पटांगण खेळासाठी अयोग्य असून अस्वच्छतेचे साम्राज्य आहे. बाथरूमची सुविधा असली तरी पाण्याचा पुरवठा नसल्याने ती निरुपयोगी ठरत आहे. शाळेच्या भिंतींचा रंग उडाल्याने इमारत निस्तेज व जीर्ण अवस्थेत दिसून येत आहे. प्रशासनाकडून "विद्यार्थी पटसंख्या कमी आहे" असे कारण पुढे करून निधी देण्यात टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप मनसेने केला आहे. मात्र, मूलभूत सुविधा नसल्यामुळेच पालक मुलांना शाळेत दाखल करत नसल्याने पटसंख्या घटत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. हीच परिस्थिती कायम राहिल्यास भविष्यात शाळा बंद पडण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. तालुक्यातील एकही जिल्हा परिषद शाळा केवळ सुविधांअभावी बंद पडू नये, यासाठी 'शाळा पुनर्जीवन' कार्यक्रमांतर्गत बोरगाव (कडू) व वाढोणा (खुर्द) येथील प्रलंबित कामांसाठी तातडीने निधी मंजूर करून प्रशासकीय अडथळे दूर करण्यात यावेत, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# नराधम चुलत काकाकडून अल्पवयीन पुतणीचे शारीरिक शोषण

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - ग्रामीण पो स्टे अंतर्गत तालुक्यातील जांबबाजार येथील एका अल्पवयीन पीडितेचे तिच्या चुलत काकाने शारीरिक शोषण केले. या घटनेत पीडित मुलगी अडीच महिन्याची गर्भवती झाली. मात्र चार दिवसांपूर्वी पोटात दुखत असल्यामुळे आईला शंका येऊन पुसद च्या खाजगी रुग्णालयात तपासणी करण्यात आली. त्या तपासणीत ती अडीच महिन्याची गर्भवती असल्याचे पुढे येताच पीडितेने आपबीती सांगितली. त्यावर तात्काळ पुसद ग्रामीण पो स्टे मध्ये पीडितेने तक्रार दिली.

पोटात अडीच महिण्याचा गर्भ असलेल्या पीडितेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. त्या तक्रारी नुसार १७सप्टेंबर २०२५ रोजी पीडित चे दुपारी आई वडील मोठ्या मुलीची प्रसूती झाल्याने तीची तब्येत पाहण्यासाठी पुसद ला आले. यावेळी तिच्या चुलत काकाने घरात येऊन तीचे तोंड दाबून कुकर्म केले. व झालेली घटना कोणाला न सांगण्याची धमकी दिली. वडिलांच्या भीती पोटी सदर घटना तिने कोणाला सांगितली नव्हती. दरम्यान २६ सप्टेंबर रोजी घटना उघडकीस आल्या नंतर पीडितेच्या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ६४ व ३३३ तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारा पासुन संरक्षण कायदा २०१२ च्या कलम ४, ८,१२ अन्वये आरोपी चुलत काका याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास ग्रामीण पोस्टेचे पीएसआय राहुल देशमुख करीत आहेत. दरम्यान आरोपी हा गावात वर्ग ८ ते १० पर्यंत खाजगी कोचिंग क्लास घेत असल्याची माहिती मिळाली आहे. तसेच एलोपेथी औषधी ची जुजबी माहिती असल्यामुळे गावातच लोकांचे उपचार करीत होता अशी देखील माहिती मिळाली आहे.

# जिल्हा परिषद शाळांच्या दुरवस्थेविरोधात मनसेचे 'शाळा वाचवा' अभियान

**जनमाध्यम प्रतिनिधी**

तातडीने उपाययोजना करण्याची प्रशासनाकडे मागणी

पांढरकवडा - तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांची दिवसेंदिवस होत चाललेली दुरवस्था लक्षात घेता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने 'शाळा वाचवा' अभियानांतर्गत प्रशासनाकडे तातडीच्या उपाययोजना करण्याची जोरदार मागणी करण्यात आली आहे.

बोरगाव (कडू) येथील जिल्हा परिषद शाळेतील जीर्ण व धोकादायक वर्गखोल्या पाडण्याबाबतचा प्रस्ताव मागील एक वर्षापासून प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत यापूर्वी मनसेने केलेल्या पत्रव्यवहारानंतर शिक्षण विभागाने काही प्रमाणात सकारात्मक पावले उचलली होती, मात्र अद्यापही मुख्य फाईल मंजुरीअभावी रखडलेली आहे. जुनी इमारत कधीही दुर्घटनेस कारणीभूत ठरू शकते, त्यामुळे तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे. तसेच, वाढोणा (खुर्द) (गट ग्रामपंचायत घोडदरा) येथील जिल्हा परिषद शाळेची अवस्था अत्यंत दयनीय असून शाळेला संरक्षण भिंत नसल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. शाळेचे पटांगण खेळासाठी अयोग्य असून अस्वच्छतेचे साम्राज्य आहे. बाथरूमची सुविधा असली तरी पाण्याचा पुरवठा नसल्याने ती निरुपयोगी ठरत आहे. शाळेच्या भिंतींचा रंग उडाल्याने इमारत निस्तेज व जीर्ण अवस्थेत दिसून येत आहे. प्रशासनाकडून "विद्यार्थी पटसंख्या कमी आहे" असे कारण पुढे करून निधी देण्यात टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप मनसेने केला आहे. मात्र, मूलभूत सुविधा नसल्यामुळेच पालक मुलांना शाळेत दाखल करत नसल्याने पटसंख्या घटत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. हीच परिस्थिती कायम राहिल्यास भविष्यात शाळा बंद पडण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. तालुक्यातील एकही जिल्हा परिषद शाळा केवळ सुविधांअभावी बंद पडू नये, यासाठी 'शाळा पुनर्जीवन' कार्यक्रमांतर्गत बोरगाव (कडू) व वाढोणा (खुर्द) येथील प्रलंबित कामांसाठी तातडीने निधी मंजूर करून प्रशासकीय अडथळे दूर करण्यात यावेत, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# गुरुदेव सेवा मंडळ हि परिवर्तनवादी चळवळ आहे : जिल्हाध्यक्ष धर्माळे

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थनेच्या अष्टकात संपूर्ण सद्ग्रंथाचा सार असून मानवातील असुरत्व, आपसातील वाद,द्वेष, मत्सर तिरस्काराची भावना नष्ट होऊन प्रेम, सहकार्य, सूचित्व, स्नेहाची जागृती होते, खरंच प्रार्थना राष्ट्रीय उन्नतीचे प्रभावी साधन आहे गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने अनेक समाजोपयोगी,शैक्षणिक,सामाजिक, धार्मिक,सांस्कृतिक,राष्ट्रीय उपक्रम राबविले जातात आज सामुदायिक प्रार्थनेद्वारे नूतन घराचा गृहप्रवेश प्रार्थनेद्वारे होत आहे कारण गुरुदेव सेवा मंडळ परिवर्तनवादी चळवळ आहे असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कलावंत वारकरी सेवा विकास व सन्मान समितीचे जिल्हाध्यक्ष ग्रामगीताचार्य गणेश धर्माळे यांनी प्रार्थनेप्रसंगी आदर्श नगर येथे केले.

माजी जिल्हा महिला भजन प्रमुख कमलताई व गुरुदेव उपासक आदरणिय पंजाबराव गडदे यांच्या नूतन घराच्या वास्तू निमित्त गृहप्रवेश सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना घेऊन करण्यात आला.यावेळी अनुदीप कोरटकर महाराज, प्रा.नंदकुमार खैरे,अनिल पांडे महाराज माहूरगड, आदर्श प्रचारक शिवशंकर नागरे,सुभाष महाराज नाथ पारडी,विठ्ठल महाराज चापनाथ, ग्रामगीताचार्य किसन गरडे प्रकाश पाटील वायकुळे, हरिओम पंजाबराव गडदे, माजी सरपंच मिलिंद उदेपूरकर,माजी ग्रा. पं. सदस्य राजू राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. सर्वप्रथम दिपप्रज्वलन करून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व अधिष्ठानाचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला त्यानंतर मौन प्रार्थना, सामुदायिक प्रार्थना, अर्जीपद,नामधून,नामजप, ग्रामगीता अध्याय वाचन, शांतिपाठ, आत्मचिंतन, सामुदायिक नमस्कार व जयघोष घेण्यात आला. यावेळी पुढे धर्माळे म्हणाले की सर्व संतांनी अक्षर वाङ्मयातुन मानव जातीवर अनंत उपकार केले आहेत त्याचप्रमाणे राष्ट्रसंतांनी अनेक ग्रंथातून मानवाचे कल्याण कश्यात आहे हे सांगितले, कर्मयोगी गाडगे महाराज व राष्ट्रसंतांनी माणसात देव पाहिला त्यामूळे माणसाचे जीवन सुखद आदर्श कसे होईल या विवंचनेतून पहाटे ध्यान व सायंकाळी प्रार्थना ही दोन साधने सांगितली, आज पंजाबराव गडदे यांनी सामुदायिक प्रार्थनेद्वारे नूतन घराचा गृहप्रवेश केला हि अभिमानाची व अनुकरणीय बाब आहे यावेळी त्यांनी अनेक संत,महात्मे,ऋषी, महापुरुषांची उदाहरणे देऊन सामुदायिक प्रार्थनेची महती सांगितली.

यानंतर भजनांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला त्यात हार्मोनियम अशोक भगत महाराज तबला अनिल अस्वार, खंजिरी सुरेश कदम यांनी केली सामुदायिक प्रार्थनेत असंख्य स्त्री पुरुष बाल गोपाल मोठया संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गुरुदेव सेवा मंडळ आदर्श नगर, कोपरा, श्रीरामपूर यांनी अथक परिश्रम घेतले..

# शहरावर थंडीचा जोरदार हल्ला ; नागरिक शेकुटीच्या आधारावर

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पांढरकवडा - शहरात गेल्या काही दिवसांपासून थंडीचा कडाका प्रचंड वाढला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. पहाटे व रात्री तापमानात मोठी घसरण होत असल्याने शहरातील चौकाचौकात, रस्त्यांच्या कडेला व वस्त्यांमध्ये नागरिक शेकुटी शेकताना दिसून येत आहेत. कडाक्याच्या थंडीमुळे लहान मुले, वृद्ध नागरिक तसेच कामगार वर्ग अधिक त्रस्त झाला आहे.

थंडीपासून बचावासाठी उबदार कपडे, शाल, स्वेटर, कानटोपी यांचा वापर वाढला असून पहाटेच्या सुमारास रस्ते ओस पडलेले दिसत आहेत. सकाळच्या वेळेत शाळकरी विद्यार्थी व कामगारांना थंडीचा मोठा फटका बसत आहे. काही ठिकाणी गरजूंना उबदार कपड्यांचे वाटप करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवस थंडी कायम राहण्याचा इशारा दिल्याने नागरिकांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. थंडीचा जोर कायम राहिल्यास आरोग्याच्या समस्या वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# महावितरणच्या ऑनलाईन सेवेमुळे ग्राहकांना सुविधा

## ५८ हजार ग्राहकांना नाव बदलाचा तर १० हजार ग्राहकांना भारवाढीचा लाभ

**अमरावती/का.प्र.**

वीज कनेक्शनच्या नावात बदलाच्या अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्याची सुविधा महावितरणने सुरू केल्यानंतर राज्यातील वीज ग्राहकांना त्याचा मोठा लाभ झाला असून दोन महिन्यात ५८,१६७ ग्राहकांनी घरबसल्या नावात बदल (चेंज ऑफ नेम) करून घेतला. त्याचसोबत वीज ग्राहकांना मंजूर भार वाढवून घेण्यासाठी सुरू केलेल्या सुविधेचा १०,४२८ ग्राहकांना लाभ झाला आहे.

जीवनसुलभतेसाठी (ईज ऑफ लिव्हिंग) महावितरणने वीज ग्राहकांना जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन द्याव्यात जेणेकरून वीज ग्राहकांना घरबसल्या सुविधांचा लाभ घेता येईल व त्यांना कार्यालयात जावे लागणार नाही, असा प्रयत्न चालू आहे. त्यानुसार महावितरणने वीज कनेक्शन नावात बदल आणि मंजूर भार बदल यासाठी ऑनलाईन व झटपट सुविधा उपलब्ध केली आहे खरेदी - विक्री, वारसा हक्क किंवा इतर कारणांमुळे घर किंवा इतर मालमत्तेच्या मालकीमध्ये बदल झाल्यानंतर वीजबिलाच्या ग्राहक नावात बदल करण्यासाठी अर्ज करण्यात येतो. या प्रक्रियेसाठी महावितरण मोबाईल ॲप अथवा www.mahadiscom.in या संकेतस्थळावर वीजग्राहकांना



'लॉग-इन'द्वारे ऑनलाइन अर्ज सादर करता येतो. ग्राहकाला कोणत्या कारणासाठी नाव बदलणे आवश्यक आहे त्याचा पर्याय निवडला की, त्यानुसार आवश्यक ते निवडक दाखले जोडावे लागतात. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यानंतर तीन ते सात दिवसात नावातील बदलाची प्रक्रिया पूर्ण होते.

महावितरणने लघुदाब वर्गवारीतील सर्व औद्योगिक, व्यावसायिक, घरगुती व इतर ग्राहकांच्या १५७ केडब्लूपर्यंत वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित पद्धतीने मंजुरी देण्यास प्रारंभ केला आहे. या सुविधेचा लाभ घेणाऱ्या ग्राहकांची संख्या आता १०,४२८ झाली आहे व त्यांनी ६९.३७ मेगावॅट भार वाढवून घेतला आहे. अस्तित्त्वात असलेल्या जोडणीच्या वीजभारामध्ये (Load Change/Demand Change) वाढ करणे किंवा कमी करण्याची सोय महावितरणच्या www.mahadiscom.in संकेतस्थळावर किंवा मोबाइल ॲपवर ग्राहकांना उपलब्ध आहे.वीज भार वाढीबाबत ऑनलाइन मागणी नोंदविल्यानतंर संबंधित ग्राहकांना स्वयंचलित पद्धतीने कोटेशन देण्यात येते. वीजग्राहकांनी आवश्यक शुल्काचा भरणा केल्यानंतर नवीन मीटर बसविण्याची किंवा पायाभूत वीजयंत्रणा उभारण्याची गरज नसेल अशा वीजजोडणीचा वाढीव वीज भार स्वयंचलित प्रणालीने मंजूर होतो व केवळ २४ तासांत कार्यान्वित होतो. वाढीव वीजभाराच्या आवश्यकतेनुसार किंवा सिंगलऐवजी थ्री फेजची मागणी असल्यास नवीन मीटर लावण्यात येतो. अशा ठिकाणी नवीन वीज मीटर लावण्याचा आदेश स्वयंचलितपणे संबंधित एजन्सीला देण्यात येतो. नवीन वीजमीटरची आवश्यकता असलेल्या ठिकाणी देखील साधारणतः ४८ तासांमध्ये वीज भार वाढीची प्रक्रिया पूर्ण होते. लघुदाब वर्गवारीमध्ये वीज भार वाढीच्या ऑनलाइन अर्जांना स्वयंचलित पद्धतीने मंजूरी देण्याच्या निर्णयामुळे प्रामुख्याने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेसाठी घरगुती ग्राहकांना तसेच प्रामुख्याने औद्योगिक, व्यावसायिक व इतर लघुदाब ग्राहकांना मोठा लाभ होत आहे.

## तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्थांसाठी विशेष कार्यशाळा संपन्न

**अमरावती/का.प्र.**

भावी पिढीला व्यसनाधीनतेपासून वाचवण्यासाठी आणि जिल्हा तंबाखूमुक्त करण्यासाठी शिक्षण विभागातर्फे विशेष प्रयत्न करण्यात येत आहे. याच मोहिमेचा भाग म्हणून जिल्ह्यातील शिक्षण विभागाच्या तालुकास्तरीय पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांसाठी 'तंबाखूमुक्त शैक्षणिक संस्था' कार्यशाळा नुकतीच संपन्न झाली.

शिक्षण मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने 'तंबाखू मुक्त पिढी : शाळांसाठी आव्हान' या विषयाच्या अनुषंगाने या कार्यशाळेचे आयोजन केले होते. यामध्ये उपशिक्षणाधिकारी, महानगरपालिका शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी शिक्षण, शाळा केंद्र प्रमुख आणि विषय साधन व्यक्ती उपस्थित होते. तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या वापराच्या दुष्परिणामांबाबत समाजात आणि विशेषतः लहान मुलांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी शासन स्तरावर निरंतर प्रयत्न सुरू आहेत. ज्यामध्ये शाळा आणि शैक्षणिक संस्था केंद्र व राज्य शासनाच्या निकषांनुसार तंबाखूमुक्त करण्यासाठी रॅली, पोस्टर, घोषवाक्ये, कविता आणि पथनाट्ये यांसारखे विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. शाळेच्या १०० मीटर परिसरात तंबाखू विक्री करणे हा दंडात्मक गुन्हा असून १८ वर्षांखालील मुलांना तंबाखू विकणे किंवा तसे करण्यास भाग पाडणे हा कठोर शिक्षेस पात्र गुन्हा आहे. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती अंतर्गत प्रत्येक तालुक्यातील शाळांकरिता विशेष पोस्टर्स, बॅनर्स आणि बोर्ड्सचे वाटप करण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मिलिंद कुबडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षक डॉ. मंगेश गुजर यांनी केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या निकषांची माहिती दिली, तर मंगेश गायकवाड यांनी 'तंबाखू नियंत्रण कायदा २००३' बाबत मार्गदर्शन केले. या मोहिमेत शिक्षण विभाग, जिल्हा सामान्य रुग्णालय आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था,यांनी संयुक्त सहभाग नोंदवला असून, कार्यशाळेतील प्रशिक्षित अधिकारी आता शाळा स्तरावर मुख्याध्यापक व शिक्षकांना मार्गदर्शन व पर्यवेक्षण करण्याचे महत्त्वाचे कार्य करीत आहेत.

## आगामी ५ वर्ष अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष म्हणून रुपाली माथने कारभार पाहणार - आ.प्रवीण तायडे

**अचलपूर/वार्ताहर**

आगामी ५ वर्ष अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष म्हणून रुपाली माथने यशस्वीरित्या कारभार पाहणार असून जुळ्या शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासन स्तरावर निधी उपलब्ध करण्यासाठी मी कटिबध्द असल्याचे मत अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी अचलपूर नगर परिषद सभागृहात अचलपूर न.प चे भाजपा पक्षाचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष रुपाली माथने यांच्या नगर परिषद कार्यालयात विधिवत प्रवेश प्रसंगी केले.

यावेळी अचलपूर मतदार संघाचे आ.प्रवीण तायडे सह भाजपा पक्षाचे नेते मंडळी चा उपस्थितीत रोजगार निर्मिती व्हावी यासाठी दीव्यांग बांधवांना तीन चाकी ई - बाईक चे वाटप करण्यात आले.यावेळी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे,भाजपा पक्षाचे विनोद वाघ,भाजपा पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रभूदास भिलावेकर,रविराज देशमुख ,गजानन कोल्हे,अशोक बनसोड,महामंत्री सुधीर रसे,नयना जोशी , भाजयुमो जिल्हाध्यक्ष तुषार खेरडे ,सुनील चौधरी आदी उपस्थितीत होते. त्यानंतर भाजपा



पक्षाचे जिलाध्यक्ष प्रभुदास भिलावेकर,गजानन कोल्हे आणि विनोद वाघ यांनी आपले मनोगत व्यक्त करून जुळ्या शहराच्या सर्वांगीण विकास होऊन अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा ही दिल्या.त्यानंतर आ.प्रवीण तायडे यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की,गेल्या २० वर्षात जुळ्या शहराचा विकास झालेला नाही. पण अचलपूर मतदार संघाचे आमदार म्हणून गेल्या १ वर्षाच्या कार्यकाळात कल्याण मंडपम मध्ये प्रस्तावित अचलपूर नगर परिषदेच्या कार्यालय साठी नवीन इमारतीचा प्रस्ताव सादर केला असून यासाठी मुंबई मध्ये बैठक ही झाली आहे. तसेच चांदुर बाजार नाका ते अंजनगाव स्टॉप पर्यंत रस्त्याचा कायापालट होणार आहे. अचलपूर नगर परिषद नगरसेवक पदाच्या निवडणुकीत भाजपा पक्षाचे ९ नगरसेवक निवडून आले आहे. जुळ्या शहरात सामान्य माणसाला घरकुल, पी.आर कार्ड या योजनेचा लाभ व्हावा यासाठी अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने आणि आमदार म्हणून मी व नगरसेवक कटिबध्द राहणार असल्याचे प्रतिपादन आ.प्रवीण तायडे यांनी केले. यावेळी जुळ्या शहरातील नागरिक ,भाजपा पक्षाचे नगरसेवक ,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते .यावेळी शशिकांत जयस्वाल,मनीष खंडेलवाल ,महेंद्र राठी,निलेश सातपुते,विकी सोनपरोते ,प्रसन्न काठोले,सुनील चौधरी ,जय तिवारी आदी उपस्थितीत होते.

## आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती-** जिल्ह्यातील रिक्त ठिकाणी आधार नोंदणी केंद्रांचे वाटपाबाबत जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती मार्फत करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मान्यता प्राप्त व सुरू असलेल्या आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी यासाठी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज स्वीकृतीची तारीख दि. ३१ डिसेंबर २०२५ ते ०९ जानेवारी २०२६ ही आहे.

वलगांव, तालुका अमरावती-१, आसरा, तालुका भातकुली -१, मंगरूळ चव्हाळा, तालुका नांदगाव खंडेश्वर-१, लोणी, तालुका नांदगाव खंडेश्वर-१, घुईखेड, तालुका चांदुर रेल्वे-१, जुना धामणगांव, तालुका धामणगाव-१, वऱ्हा, तालुका तिवसा-१, हिवरखेड, तालुका मोर्शी-१, लोणी, तालुका वरूड-१, पुसला, ता. वरूड-१, बेलोरा, ता. चांदुर बाजार-१, रासेगांव, ता. अचलपूर-१, वडनेर गंगाई, ता. दर्यापूर-१, भंडारज, ता. अंजनगांव सुर्जी-१, धुलघाट, ता. धारणी-१, हरिसाल, ता. धारणी-१, गौलखेडा, ता. चिखलदरा-१, टेंब्रुसोंडा, ता. चिखलदरा-१, असे एकुण १८ नवीन आधार केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

## डोक्यावरचा ताण कमी करायचा असेल तर खेळ खेळणे गरजेच -आ. वानखडे

**मोर्शी/वार्ताहर**

विद्यार्थ्यांच्या कला व सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी क्रीडा महोत्सव घेणे गरजेचे असून विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर खेळात सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासोबतच देशाचा विकास होऊ शकतो. डोक्यावरचा ताण कमी करायचा असेल तर खेळ खेळणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन तिवसा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार राजेशभाऊ वानखडे यांनी तालुकास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाच्या निमित्ताने क्रीडा संकुल येथे आयोजित कार्यक्रमात व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार राजेशभाऊ वानखडे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गटविकास अधिकारी स्वप्निल मगदूम यांनी भूषविले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून मोर्शी



शहराच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा प्रतीक्षा रवींद्र गुल्हाने,भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण राऊत, गटशिक्षणाधिकारी डॉ. नितीन उंडे,केंद्र समन्वयक सुरेंद्र वानखडे,गजानन चौधरी,शिक्षण विस्तार अधिकारी डी.सी. गायकवाड,गोकुल राऊत,पत्रकार अजय पाटील,गजानन हिरुळकर,संजय गारपवार,विजय सोमवंशी,बाबुराव पडोळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.यावेळी तिवसा विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश वानखडे,मोर्शी शहराच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने,बिडिओ स्वप्निल गटशिक्षणाधिकारी नितीन उंडे,प्रशिक्षक अनिल जावळे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. दोन दिवस होत असलेल्या या शालेय क्रीडा स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग होता.याप्रसंगी विद्यार्थिनींनी विद्येची देवता सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित नृत्य सादर करून उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटशिक्षणाधिकारी नितीन उंडे यांनी संचालन सुरज अंबाडकर यांनी तर आभार प्रदर्शन डी.सी. गायकवाड यांनी केले.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

**अमरावती/का.प्र.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावती येथे विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रत्यक्ष प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यशाळेचे एक दिवसीय प्रशिक्षण यशस्वीरीत्या पार पडले.या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आगीचे विविध प्रकार, अग्निशामक यंत्र हाताळण्याची पद्धत तसेच आग लागल्यास करावयाच्या योग्य उपाययोजना याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कमलाकर पायस हे होते. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे विभागप्रमुख प्रा. प्रकाश बोरकर व प्रा. अनिल घोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन डॉ. ज्ञानेश्वर भगत यांनी केले, तर संचाली रंगारी हिने आभार मानले.अग्निशमन विभागाचे मुख्य अग्निशामक अधिकारी दिनेश हंबर्डे, अग्निशामक अधिकारी अजय पंधरे, केंद्रप्रमुख प्रेमानंद सोनकांबळे, पाळी प्रमुख किशोर शेंडे, डेमो इन्चार्ज अमोल साळुंखे, फायरमन योगेश सावळे व वाहनचालक श्री. मोहम्मद फरान यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान आग लागल्यास घ्यावयाची काळजी, भूकंप , पूर,प्राथमिक सुरक्षिततेचे उपाय तसेच आपत्कालीन परिस्थितीत योग्य व तात्काळ निर्णय कसा घ्यावा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रशिक्षण कार्यक्रमास महाविद्यालयातील प्रा. पी. आर. एस. राव, डॉ. श्याम तंत्रपाळे, डॉ. सुनील कुमार, डॉ. शुद्धोधन कांबळे, डॉ. प्रदीप अंबोरे, डॉ. प्रकाश म्हस्के, प्रा. डॉ. राजेश देशमुख, डॉ. प्रशांत खेडकर, प्रा. जी. एच. पांड, डॉ. एस. बी. सांगोले, प्रा. दिपाली पडोळे, प्रा. प्रकाश बोरकर, प्रा. अनिल घोटे, प्रा. प्रवीण विधाते, प्रा. शंकर लाहोटी, प्रा. डोईफोडे, प्रा. हर्षवर्धन देशमुख, डॉ. ज्ञानेश्वर भगत, डॉ. अनिल पाचकुडके, प्रा. सुभाष मुंडे, प्रा. नवलकर मॅडम, प्रा. रुद्रा चोपकर, प्रा. ज्योती टाले, प्रा. मेघा चिमणकर, प्रा. स्वप्नील मानकर, प्रा. एन. डी. आबाऊ, प्रा. महेश बनसोड, प्रा. हेमंत सावळे, प्रा. दिपाली गवई तसेच विजय इंगळे, राजेश नाखले, किशोर विजवे, प्रफुल धार्मिक, सुशांत युनाते, भाग्यश्री वानखडे, सागर शिरसाट, राशन वैद्य यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जी. एच. रायसोनी विद्यापीठाच्या विधी विद्यार्थ्यांचे शिक्षणप्रद भ्रमण

**अमरावती/का.प्र.**

भारताच्या संवैधानिक रचनेची, न्यायव्यवस्थेची आणि लोकशाही मूल्यांची प्रत्यक्ष जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावतीच्या स्कूल ऑफ लॉतर्फे डिसेंबर २०२५ मध्ये विधी शाखेच्या ४६ विद्यार्थ्यांसाठी बहु-स्थळी शिक्षणप्रद भ्रमण आयोजित करण्यात आले होते.

हा उपक्रम स्कूल ऑफ लॉच्या डीन डॉ. नीता नाथ यांच्या मार्गदर्शनाखाली



राष्ट्रपती भवन, सर्वोच्च न्यायालय व अटारी-वाघा सीमेचा दौर

यशस्वीपणे पार पडला. फॅकल्टी को-ऑर्डिनेटर डॉ. मीनाक्षी काले व डॉ. रंजन दुबे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी नवी दिल्ली व अमृतसर येथील महत्त्वाच्या राष्ट्रीय स्थळांना भेटी दिल्या.भ्रमणाची सुरुवात नवी दिल्लीतील सर्वोच्च न्यायालय भेटीने झाली. विद्यार्थ्यांनी विविध खंडपीठांमध्ये सुरू असलेल्या खटल्यांची प्रत्यक्ष सुनावणी अनुभवली. यावेळी मौखिक युक्तिवाद, न्यायमूर्तींचे प्रश्नोत्तर आणि न्यायालयीन शिस्त यांचे निरीक्षण करण्यात आले. तसेच राष्ट्रीय न्यायिक संग्रहालयाला भेट देऊन भारतीय न्यायव्यवस्थेचा इतिहास, महत्त्वाचे निर्णय आणि प्रमुख न्यायमूर्तींच्या कार्याचा अभ्यास करण्यात आली. विद्यार्थ्यांनी राष्ट्रपती भवनाला भेट दिली. दुर्बार हॉल, अशोक हॉल, बँक्वेट हॉल आणि राष्ट्रपती ग्रंथालय यांसारख्या ऐतिहासिक व प्रतिष्ठित कक्षांचे अवलोकन करून राष्ट्रपतींची संवैधानिक भूमिका, कर्तव्ये व भवनाचे ऐतिहासिक महत्त्व समजून घेतले. भ्रमणाचा समारोप अमृतसरजवळील अटारी-वाघा सीमेवर झाला. येथे विद्यार्थ्यांनी बीएसएफ व पाकिस्तान रेंजर्स यांच्यातील प्रसिद्ध रिट्रीट सेरेमनी पाहिली. या अनुभवातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय अभिमान, शिस्त व सशस्त्र दलांविषयी आदराची भावना अधिक दृढ झाली.या शिक्षणप्रद भ्रमणामुळे विद्यार्थ्यांमध्ये संवैधानिक मूल्ये, सत्तेचे विभाजन, न्यायपालिकेची भूमिका आणि राष्ट्रीय सुरक्षेबाबतची समज वाढल्याचे फॅकल्टी सदस्यांनी सांगितले. हा उपक्रम विद्यापीठाच्या अनुभवात्मक शिक्षणाच्या वचनबद्धतेचे उत्तम उदाहरण असून भावी विधिज्ञांना लोकशाही मूल्ये जपण्यासाठी प्रेरणादायी ठरेल.


## संक्षिप्त

### सेलिब्रेशन हॉल १ जानेवारी पासून सुरु



**कुऱ्हा -** येथील लक्ष्मी नारायण नगर तिवसा रोड कुऱ्हा (ता.तिवसा) येथे शुभ संकेत सेलीब्रेशन हॉल कुऱ्हा याचे १ जानेवारी २०२६ पासून बुकिंग सुरु होत आहे.यामध्ये भव्य व आकर्षक मंगल कार्यालय, प्रशस्त डायनिंग हॉल, सुसज्ज पार्किंग सुविधा सुसज्ज बैठक व्यवस्था, लग्न, वाढदिवस, नामकरण, साखरपुडा, बैठक, डोहाळे, जेवण, रिसेप्शन, मिटींग, स्वागत समारंभ इत्यादी भोग्य दरात मिळेल सर्व प्रकारच्या ऑर्डर्स स्विकारल्या जातील असे संचालक कैलास पु. आसोडे, व्यवस्थापक गौरव स कोल्हे यांनी केले आहे.

### कला व विज्ञान महाविद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख जयंती



**कुऱ्हा -**येथील कला व विज्ञान महाविद्यालयामध्ये थोर समाजसुधारक, शिक्षणमहर्षी आणि शेतकरी चळवळीचे जनक डॉ. पंजाबराव देशमुख यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. अजय अभ्यंकर यांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पमाला अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास विभागाद्वारे करण्यात आले.आजच्या काळात त्यांच्या विचारांची उपयुक्तता अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा अंगीकार करावा, असे आवाहन त्यांनी केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागाच्या विभागप्रमुख प्रा.डॉ. निशा जोशी यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाचा समारोप भूगोल विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. किशोर ताकसांडे यांनी आभार प्रदर्शन केले.या जयंती कार्यक्रमाला प्रा. डॉ. हर्षा कांबे, प्रा.डॉ. गांधी, प्रा. मेश्राम, प्रा. दिलीप पाटील यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या विचारांची प्रेरणा मिळाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

### श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सप्ताह



**कुऱ्हा -** विदर्भाची पंढरी आई रुख्मीणी मातेचे माहेर अशा प्राचीन पुरातन श्री तीर्थक्षेत्र असलेल्या कौंडण्यपूर येथे गोशाळा, राधे गोविंद सत्संग संभाजी नगर यांच्या आयोजनात श्री.विठ्ठल रुख्मीणी मंदीरात संत गाडगेबाबा सभागृहात दि.२७ डिसेंबर ते २ जानेवारी २०२६ पर्यंत श्रीमद् भागवत कथा व ज्ञानयज्ञ सप्ताह भागवताचार्य ह.भ.प. अरविंद महाराज मुळे (संभाजी नगर) यांच्या अमृतवाणीतून सुंदर असे भागवत कथा सुरु आहे. त्यांना संगतसाथ तबला वादक श्रीनिवास कुळकर्णी (संभाजीनगर) हार्मोनियम व गायक- उध्दव माने (पनुकर) यांचा सहभाग आहे. रुक्मिणी माता हरण श्री अंबिका देवी मंदीरामधून कौंडण्यपूर नगरीतून ग्रंथ दिंडी शोभा यात्रा काढून करण्यात आली. तर दररोज महाअभिषेक स.६ वा. काकडा आरती, सकाळी ११ ते दुपारी २ व ३ ते सायं. ६ वा.श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी हरिपाठ व आरती करण्यांत येते. या कार्यक्रमाला भागवता मधील पुरुष व महिला वारकरी उपस्थित आहे. याचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन राधे गोविंद सत्संग संभाजी नगर यांनी केले आहे.

### डॉ. सिकंदर मनवरे यांना सावित्री फुले प्रतिमा भेट



**अमरावती -** येथील सेंट थॉमस प्रशासकीय महा विद्यालय आणि भगवानराव प्रशासकीय महाविद्यालय कुऱ्हाचे अध्यक्ष डॉ. सिकंदर मनवरे यांचा वाढदिवसाच्या निमित्त आयोजित केलेला अभिष्टचिंतन सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. याप्रसंगी, विद्या बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समजभूषण पुरस्कार प्राप्त संजय वऱ्हेकर यांनी सत्कारमूर्ती डॉ. मनवरे यांना क्रांतीसूर्य महात्मा फुले आणि क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांची फोटो प्रतिमा भेट दिली. यावेळी आर्किटेक्त तथा बिल्डर निखिल कुबडे, प्राचार्या संजीवनी मनवरे, प्रा. शिल्पा गजभिये, प्रा. निलेश डोंगरे, प्रा.भाकरे, प्रा. शरद गजभिये, ॲड. प्रभाकर वानखडे, शिक्षकेत्तर कर्मचारी पंकज गजभिये, आकाश मेश्राम, बाळू सोळंके आदी मान्यवर उपस्थित होते.

### शहरातील अनेक सौरदिवे बंद



**मोर्शी -** शहरात विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे माजी आमदार यांच्या निधीतून शहराच्या विविध वार्डात शेकडो सौर दिवे लावण्यात आले होते. सुरुवातीला ही सौरदिवे वेळेवर बरोबर लागत होते. पण गेल्या काही दिवसांपासून सौरदिवे बंद आहेत. त्यामुळे त्या परिसरात काळोखा निर्माण झाला आहे. याबाबत आमच्या प्रतिनिधीने नगरपालिकेच्या वतीने लावण्यात आलेल्या इलेक्ट्रिक पोल वरील देखभाल करणाऱ्या व्यक्तीशी चर्चा केली असता सौर दिव्याची देखभाल दुरुस्ती आमच्याकडे नसल्याचे सांगितले. वास्तविक सौर दिवे लावल्यावर लाखो रुपयाचा निधी खर्च केला आहे. खांबावरील बंद असलेले सौरदिवे तातडीने लावण्यात यावे अशी मागणी मोर्शीकर नागरिक करीत आहे.

# जगदीश भाऊंची पत्रकार परिषद

# आजच्या राजकीय व्यवस्थेचा आरसा

जगदीश भाऊ गुप्ता यांची झालेली पत्रकार परिषद, ही केवळ पत्रकार परिषद नाही; ती आजच्या राजकीय व्यवस्थेचा आरसा आहे. हा आरसा पाहण्याची हिंमत आज फारच थोड्या नेत्यांकडे उरली आहे, कारण त्यात दिसणारे वास्तव अस्वस्थ करणारे आहे, प्रश्न विचारणारे आहे आणि सत्तेला अस्वस्थ करणारे आहे.

आजचे राजकारण विचारांवर उभे राहिलेले नाही. ते तत्त्वांवर घडलेले नाही. ते सामान्य कार्यकर्त्यांच्या घामावर आणि त्यागावर उभे राहिलेले नाही. आजचे राजकारण उभे आहे VIP कल्चरवर सत्ता, पैसा, ओळखी आणि वरच्या नेत्यांची मर्जी यावर. या VIP संस्कृतीने संपूर्ण राजकीय व्यवस्था आतून पोखरून काढली आहे. पक्ष कोणताही असो, झेंडा कोणताही असो, घोषणा कितीही मोठ्या असोत; आतून यंत्रणा मात्र सगळीकडे एकसारखीच आहे. सामान्य कार्यकर्ता हा आज फक्त वापरण्याचा घटक उरला आहे. सभा भरवायच्या असतील तर तो पुढे असतो. पोस्टर लावायचे असतील तर तो पुढे असतो. आंदोलन करायचे असेल तर तो पुढे असतो. पोलिसांची लाठी खायची वेळ आली तरी तोच पुढे असतो. पण जेव्हा तिकीट वाटायची वेळ येते, निर्णय घ्यायची वेळ येते किंवा सत्तेच्या खुर्च्या वाटायच्या असतात, तेव्हा हाच कार्यकर्ता अचानक बाजूला फेकला जातो.त्याला शब्द दिला जातो. आश्वासनं दिली जातात. तुझी वेळ येईल, पक्ष तुझ्या पाठीशी आहे, तूच आमचा खरा चेहरा आहेस, असे सांगितले जाते. पण निवडणूक संपताच हे शब्दही संपतात. मग सुरू होते VIP लोकांची एंट्री. कालपर्यंत पक्षाशी काहीही संबंध नसलेले, कुठलाही संघर्ष न केलेले, जनतेशी नाळ नसलेले लोक अचानक महत्त्वाचे ठरतात, कारण त्यांच्या हातात पैसा असतो, ओळखी असतात आणि वरच्या नेत्यांपर्यंत थेट पोहोच असते. निर्णय प्रक्रिया अशाच लोकांच्या हातात दिली जाते आणि खरा कार्यकर्ता कोपऱ्यात उभा राहतो.

यालाच आज राजकारण समजले जाते.या सगळ्या गोंधळात जगदीश भाऊ गुप्ता हे निष्कपट, प्रामाणिक आणि स्पष्टवक्ते नेतृत्व म्हणून ओळखले जातात, याबाबत संपूर्ण अमरावतीमध्ये कुणालाही शंका नाही. ते भाजपमध्ये असताना देखील त्यांची ओळख अशीच होती आणि नंतर शिंदे गटात गेले तेव्हाही ती बदलली नाही. कारण पक्ष बदलू शकतो, सत्ता बदलू शकते, पण चारित्र्य बदलत नाही.आज पत्रकार परिषदेत त्यांनी जे मांडले, ते केवळ वैयक्तिक भूमिका नव्हती, तर संपूर्ण व्यवस्थेवर केलेला थेट प्रहार होता. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की जो व्यवस्था बदलू शकतो, जो पक्षविरहित सामान्यांचे प्रश्न घेऊन पुढे येतो, त्याच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा राहिलो. हे विधान आजच्या राजकारणात फार महत्त्वाचे आहे, कारण आज बहुतेक नेते पक्षाच्या आदेशापुढे मान वाकवतात, पण जनतेच्या प्रश्नांसमोर उभे राहत नाहीत.आज गरज आहे पक्षाच्या झेंड्यापेक्षा सामान्य माणसाच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याची. आज गरज आहे पक्षनिष्ठेपेक्षा न्यायनिष्ठा जपण्याची. पण वास्तव असे आहे की आज राजकारणात हाजी-हाजी करणाऱ्यांची चलती आहे. वरच्यांसमोर झुकणारे, खालच्यांवर दादागिरी करणारे आणि स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी विचार, तत्त्व आणि निष्ठा विकणारे लोक मोठे नेते बनले आहेत.पक्ष कशावर उभा राहिला होता, कोणत्या विचारधारेसाठी निर्माण झाला होता, हे कुणालाही आठवायचे नाही. संघर्ष, त्याग, बलिदान यांना किंमत उरलेली नाही. सगळे काही केराच्या टोपलीत टाकून सत्तेची मलाई कशी मिळेल, हाच एकमेव अजेंडा उरलेला आहे. तिकीट वाटप ही लोकसेवेची संधी न राहता आप्तेष्ट, नातेवाईक, खास मित्र आणि आर्थिक पाठबळ देणाऱ्यांना दिले जाणारे बक्षीस बनले आहे. जनतेला विचारले जात नाही की तुम्हाला कोण हवा आहे.याचा परिणाम आज स्पष्टपणे दिसतो आहे. जनतेचा सर्वच राजकीय पक्षांवरचा विश्वास उडालेला आहे. मतदानाबद्दल उदासीनता वाढत आहे. तरुण पिढी राजकारणाकडे संशयाने पाहते आहे, कारण तिला दिसते आहे की इथे प्रामाणिकपणाला किंमत नाही, संघर्षाला किंमत नाही आणि सामान्य माणसाच्या मताला किंमत नाही.आज सामान्य कार्यकर्ता स्वतःलाच प्रश्न विचारतो मी का झेंडा उचलला, मी का भांडलो, मी का माझं घरदार बाजूला ठेवलं. या प्रश्नांना आवाज देण्याचे धाडस आज जगदीश भाऊ गुप्ता यांनी केले आहे. त्यामुळे ही पत्रकार परिषद कुणावर टीका करण्यासाठी नव्हती, तर संपूर्ण व्यवस्थेला दिलेली थेट चेतावणी होती.आज प्रश्न इतकाच नाही की कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार आहेत. आजचा खरा प्रश्न हा आहे की राजकारण जनतेसाठी आहे की काही VIP लोकांच्या सोयीसाठी. जर सत्ता ही मर्जीवर चालणार असेल, जर तिकीटं ही मेहनतीवर नव्हे तर ओळखीवर मिळणार असतील, जर सामान्य कार्यकर्ता हा केवळ निवडणुकीपुरता उपयोगाचा घटक राहणार असेल, तर लोकशाही हा शब्द केवळ भाषणांपुरताच उरेल.जनता मूर्ख नाही. ती शांत आहे, पण अंध नाही. ती सहन करते, पण विसरत नाही. आज जे स्वतःला अपरिहार्य समजतात, उद्या तेच लोक इतिहासात 'ज्यांनी राजकारण जनतेपासून तोडले' या ओळखीने ओळखले जातील. कारण जेव्हा सामान्य माणूस उठतो, तेव्हा तो फक्त नेता बदलत नाही तो संपूर्ण खेळच उलथवून टाकतो. आणि तो दिवस लांब नाही.



✍ ॲड धनंजय देशमुख
प्रभाग १३ अंबापेठ गौरक्षण

# अशांततेचे वर्ष सरले, नववर्षाचे काय?

मावळतीला निरोप देत असताना उद्याच्या सूर्योदयाच्या आकाशाकडे जगाचे लक्ष लागून राहिलेले असले, तरी मनातील हुरहूर, भीतीचे काहूर संपलेले नाही; पण येणारे नवीन वर्ष तरी शांतता, सलोखा, सौहार्द यांची पेरणी करणारे ठरावे, अशी अपेक्षा व्यक्त करत जग या नव्या पर्वात सहभागी होणार आहे.


कालचक्र ही अव्याहत, निरंतन चालणारी क्रिया असून विश्वात घडणाऱ्या असंख्य उलथापालथींनंतरही ती सुरू असते. काळ कुणासाठी थांबत नाही. काळाच्या आकलनासाठी आपण सेकंद, मिनीट, तास, दिवस, महिने अशी परिमाणे आणली. त्यांच्या आधारे आपण फक्त जाणाऱ्या काळाची गणना करत असतो. ती करत असतानाच मर्त्यमानव विशिष्ट टप्प्यांवर सरून गेलेल्या काळातील घडामोडींचा धांडोळा घेऊन चिंतनही करत असतो. वर्षअखेरीचा दिवस हा त्यासाठीची एक संधी मानली जाते. आज माहितीच्या प्रस्फोटाच्या जगात 'इन्फर्मेशन ओव्हरलोडिंग'ची समस्या निर्माण झाली आहे; पण याच तंत्रज्ञानाच्या शब्दांत सांगायचं, तर सरत्या वर्षात घडलेल्या घटनांचा साकल्याने वेध घेतला असता जागतिक पटलावरील घडामोडींमागे काही तरी 'अल्गोरिदम' आहे की काय, अशी शक्यता निश्चितपणे वाटून जाते. विशेषतः एक बलशाली राष्ट्र म्हणून भारताचा होत असलेला प्रवास जागतिक शक्तींना खुपत चालल्यामुळे हे अल्गोरिदम नियोजनबद्धरीत्या राबवले जात असल्याचे सरत्या वर्षातील घटनांनी स्पष्ट केले आहे.

दुसरीकडे, कोरोना महामारीनंतर जगाचा सुरू झालेला जागतिकीकरणाच्या विरुद्ध दिशेचा प्रवास जानेवारी महिन्यामध्ये डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बनल्यानंतर एका नव्या वळणावर आहे. खरे पाहता गतवर्षात जागतिक पटलावर घडलेल्या जवळपास प्रत्येक ठळक घटनेच्या मुळाशी कुठे ना कुठे ट्रम्प यांचे अमेरिकेतील दुसरे पर्व कारणीभूत असल्याचे दिसून येईल. दि. २० जानेवारी २०२५ रोजी या महाशयांनी द युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिकाच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतली आणि त्यानंतर थेट जगाचे अर्थशास्त्र, व्यापारशास्त्र, भूगोल, इतिहास, सामरिक समीकरणे, सत्ता समीकरणे, तंत्रज्ञानाचे विश्व अशा प्रत्येक महत्त्वाच्या क्षेत्रावर आपल्या निर्णयांनी प्रभाव टाकण्यास सुरुवात केली. यामुळे भारतासह जगभरात प्रचंड मोठी अस्वस्थता निर्माण झाली. कारण, ज्या अमेरिकेने नव्वदीच्या दशकामध्ये जागतिकीकरणाचे गोडवे गाताना अनेक विकसनशील राष्ट्रांना प्रसंगी दबाव आणून त्यांच्या बाजारपेठा खुल्या करण्यास सांगितले, तीच अमेरिका आता आयातीवर ६० ते २०० टक्क्यांपर्यंत शुल्क आकारण्याबाबत बोलू लागली, ही बाब जगाला अचंबित करणारी होती. वर्ष सरतासरता मेक्सिकोनेही ट्रम्प यांच्या पावलावर पाऊल टाकत टॅरिफमध्ये वाढ करण्याचा कित्ता गिरवत पुढील वर्षासाठीची तरतूद करून ठेवली आहे. वास्तविक ट्रम्प यांच्या आगमनानंतर रशिया-युक्रेन युद्ध आणि इस्रायल-हमास युद्ध तत्काळ रोखले जाणार अशाप्रकारच्या सर्वांच्या अटकळी होत्या. कारण, २०२४ च्या अखेरीस जेव्हा ट्रम्प यांच्या विजयाची दुमदुमी झाली तेव्हा त्यांनीच दिलेल्या आश्वासनांमुळे जगाने २०२५ हे वर्ष युद्धाकडून शांततेकडे जगाला घेऊन जाणारे ठरेल अशी अपेक्षा ठेवली होती. तथापि, रशिया-युक्रेन युद्ध रोखण्यात आतापर्यंत तरी ट्रम्प यांना यश आलेले नाही. इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धबंदी हे ट्रम्प यांच्या धोरणांचे यश म्हणून पाहता येईलही; पण ही शांतता किती काळ टिकणार, या प्रश्नाची टांगती तलवार २०२६ च्या डोक्यावर असणारच आहे. ट्रम्प यांनी इराणची अणुकेंद्रे नष्ट केल्यामुळे अमेरिका आनंदात असली, तरी २०२६ मध्ये याचा बदला इराणकडून घेतला जाऊ शकतो.

२०२५ हे वर्ष आशिया खंडासह युरोपियन देशांसाठी घुसळणीचे आणि अस्वस्थता, अशांतता तसेच नागरी उठावांच्या हलकल्लोळाने प्रस्थापित व्यवस्थांना आत्मचिंतन करावयास भाग पाडणारे ठरले. नेपाळ, फ्रान्स ही याची ठळक उदाहरणे ठरली. हिमालयाच्या कुशीत वसलेल्या नेपाळमध्ये २०२५ मध्ये जी क्रांती झाली, ती जगभरातील समाजशास्त्रज्ञांसाठी अभ्यासाचा विषय ठरली आहे. ही क्रांती पारंपरिक राजकीय पक्षांनी नाही, तर 'झेन-जी' म्हणजेच नव्या पिढीतील तरुणांनी घडवून आणली. पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांच्या सरकारने फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉटस्अॅप आणि यूट्यूब यांसारख्या २६ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. डिजिटल युगात श्वास घेणाऱ्या पिढीसाठी हा त्यांच्या मूलभूत अधिकारांवर आणि उपजीविकेवर केलेला हल्ला होता. 'नेपोकिडस' मोहिमेद्वारे तरुणांनी राजकीय नेत्यांच्या मुलांची आणि त्यांच्या चैनीच्या आयुष्याची पोलखोल केली. भ्रष्टाचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी यामुळे संतापलेल्या तरुणांनी काठमांडूच्या रस्त्यांवर धाव घेतली. या आंदोलनादरम्यान पोलिसांनी केलेल्या गोळीबारात १९ तरुणांचा मृत्यू झाला. या हिंसाचाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून गृहमंत्री रमेश लेखक आणि त्यानंतर खुद्द के. पी. शर्मा ओली यांना पदाचा त्याग करावा लागला. नेपाळच्या इतिहासात पहिल्यांदाच सरन्यायाधीश सुशीला कार्की यांच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार स्थापन झाले असून, या सरकारची निवड ऑनलाईन मतदानाद्वारे करण्यात आली. याच जेन-झेडच्या एकजुटीने फ्रान्समध्येही उठाव झाला. या उठावाची कारणे वेगळी असली, तरी त्यामध्ये आर्थिक धोरणांचा मुद्दा सामायिक आहे.

**डॉ. योगेश प्र. जाधव**

# ध्यानातून व्यक्ती आणि समाजात जागतिक शांततेचा प्रवास



मानवजातीच्या इतिहासात शांततेचा शोध हा नेहमीच गहन, अविचलित आणि अत्यंत आवश्यक राहिला आहे. युद्ध, हिंसा, अन्याय, सामाजिक असमानता, धार्मिक व वांशिक द्वेष अशा अनेक संकटांनी भरलेल्या जगात 'शांतता' हा शब्द केवळ आदर्श ठरला आहे; प्रत्यक्ष अनुभव मात्र अनेकदा दुर्मिळ ठरतो. आजचे जग वेगवान, तणावपूर्ण, स्पर्धात्मक आणि माहितीप्रधान आहे, जिथे व्यक्ती बाह्यदृष्ट्या प्रगत होत असली तरी अंतर्मनात असुरक्षित, कलहग्रस्त आणि मानसिकदृष्ट्या थकलेली आहे. अशा परिस्थितीत, ३१ डिसेंबर रोजी साजरा होणारा 'जागतिक शांतता ध्यान दिवस' हा केवळ सांकेतिक दिवस नाही, तर तो व्यक्तीला आत्मपरीक्षण, अंतर्मुखता, मानसिक स्थैर्य आणि सामाजिक-सौहार्द साधण्याची अनन्यसाधारण संधी देणारा दिवस ठरतो.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून शांतता ही केवळ युद्धाचा अभाव नसून, ती सामाजिक समरसता, विश्वास, सहकार्य, सहिष्णुता आणि परस्पर आदर यांच्या जिवंत अनुभवाशी निगडित आहे. व्यक्तीच्या मनात द्वेष, भीती, असुरक्षितता आणि तणाव असल्यास सामाजिक संस्था, कुटुंबव्यवस्था आणि राजकीय रचना कितीही सक्षम असल्या तरी त्या अस्थिर राहतात. त्यामुळे शाश्वत शांततेचा पाया व्यक्तीच्या अंतर्मनात घातला पाहिजे. या संदर्भात ध्यानाचा सामाजिक दृष्टिकोन अत्यंत महत्वाचा ठरतो, कारण ध्यान केवळ मानसिक स्थैर्य निर्माण करण्याचे साधन नाही, तर त्याचा प्रत्यक्ष परिणाम व्यक्तीच्या वर्तनावर, समाजातील संवादावर आणि सामाजिक संरचनेवरही दिसतो.आजच्या समाजात तणावाचे स्वरूप बहुआयामी झाले आहे. बेरोजगारी, आर्थिक असुरक्षितता, कौटुंबिक कलह, शैक्षणिक स्पर्धा, शहरीकरण, सामाजिक माध्यमांचा अतिरेक, राजकीय ध्रुवीकरण आणि पर्यावरणीय संकटे यामुळे व्यक्तीच्या मनावर सातत्याने ताण निर्माण होतो. या तणावाचे रूपांतर अनेकदा हिंसा, गुन्हेगारी, कौटुंबिक कलह, व्यसनाधीनता आणि सामाजिक असहिष्णुतेत होते. अशा परिस्थितीत ध्यान व्यक्तीला स्वतःशी जोडते, मन शांत करते आणि प्रतिक्रियात्मक वर्तनाऐवजी विवेकपूर्ण प्रतिसाद देण्याची क्षमता विकसित करते.

'जागतिक शांतता ध्यान दिवस' वर्षाच्या अखेरीस येतो, ही बाबही प्रतीकात्मक आहे. संपूर्ण वर्षभराच्या धावपळीचा, संघर्षाचा, यश-अयशाचा, वेदना-आशेचा लेखाजोखा घेण्याची ही संधी असते. समाज म्हणून आपण कुठे चुकलो, कुठे द्वेष वाढवला, कुठे संवाद तुटला, कुठे मानवी मूल्ये दुर्लक्षित केली, याचे चिंतन करण्याची वेळ आहे. ध्यानाच्या माध्यमातून ही आत्मपरीक्षणाची प्रक्रिया अधिक अर्थपूर्ण, सखोल आणि स्थिर होते.जागतिक पातळीवरही परिस्थिती संवेदनशील आहे. युद्धे, दहशतवाद, धार्मिक व वांशिक संघर्ष, विस्थापन, आर्थिक विषमता आणि पर्यावरणीय संकटे यांमुळे जग अस्थिर झाले आहे. आंतरराष्ट्रीय करार, कायदे आणि संस्था यांची भूमिका महत्त्वाची आहे; परंतु फक्त बाह्य उपाययोजना शाश्वत शांतता निर्माण करू शकत नाहीत. शाश्वत शांततेसाठी मानसिक स्थैर्य, नैतिक जाणीव, सहिष्णुता आणि करुणा आवश्यक आहेत.

ध्यानाद्वारे व्यक्तीमध्ये ही मानसिक स्थैर्य आणि सहानुभूती निर्माण होते, जी सामाजिक बदलाला चालना देते.'जागतिक शांतता ध्यान दिवस' हा दिवस फक्त ध्यान करणाऱ्यांचा दिवस नाही; तो समाजातील प्रत्येक घटकासाठी आत्मचिंतन, सुधारणा आणि सामाजिक जाणीव वाढविण्याचा दिवस आहे. शिक्षकांसाठी हा विद्यार्थ्यांना मूल्याधारित शिक्षण देण्याचा दिवस आहे; पालकांसाठी मुलांशी संवाद सुधारण्याचा दिवस; राजकारण्यांसाठी सत्तेपेक्षा सेवा व संवादावर भर देण्याचा दिवस; सामान्य नागरिकांसाठी द्वेष, हिंसा आणि अफवा यांना नकार देऊन शांत संवाद स्वीकारण्याचा दिवस आहे.आजच्या डिजिटल युगात, जिथे प्रतिक्रिया वेगवान आणि संवेदनांचा अभाव असतो, तिथे थांबून श्वासाकडे लक्ष देणे, मन शांत करणे आणि दुसऱ्याच्या वेदना समजून घेणे ही क्रांतिकारी कृती ठरते. 'जागतिक शांतता ध्यान दिवस' आपल्याला ही शांत क्रांती साध्य करण्याची आठवण करून देतो, ज्यामुळे व्यक्तीपासून समाजापर्यंत सकारात्मक ऊर्जा पोहोचते आणि दीर्घकालीन सामाजिक सौहार्द व सामूहिक कल्याण घडते.शेवटी असे म्हणता येईल की शाश्वत जागतिक शांतता फक्त राष्ट्राध्यक्षांच्या बैठका, आंतरराष्ट्रीय करार किंवा कायद्यांमधून निर्माण होत नाही; ती प्रत्येक व्यक्तीच्या अंतर्मनातून जन्माला येते. ध्यान ही प्रक्रिया अंतर्मनात शांततेचे बीज रोवते, संयम निर्माण करते आणि करुणाभाव जागृत करते. जर आपण डिसेंबर हा दिवस द्वेष, तणाव आणि अस्वस्थतेचा शेवट करून शांतता, सहिष्णुता, करुणा आणि मानवी मूल्यांचा नव्या वर्षाचा आरंभ म्हणून साजरा केला, तरच जागतिक शांतता ध्यान दिवसाचा खरी अर्थपूर्ण साजरा होईल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# आता भटक्या कुत्र्यांच्या मागावर शिक्षक!

*गुरु बिन ज्ञान न मिळे, गुरु बिन मार्ग न दिसे।*
*गुरु कृपेने जीवन सरे, गुरु चरणी मस्तक ठेवसे?*
*गुरूची महती हीच खरी भारतीय संस्कृती*

निवडणूकांचा फड वाजला कीष्ठवयोवृद्ध शिक्षकांची बीपी, शुगर वाढलीच म्हणून समजा! निवडणूकीचे काम नसते तेव्हढे 'टेंशन' गुरूजी घेत असतात.आता ही 'विकृती' प्रामाणिक शिक्षक बांधवांची 'नको ती संस्कृती' होत चालली आहे. मग या भीतीपोटी काही चतुर शिक्षक नवनवे आजार झाल्याचे प्रमाणपत्र आणतातष्ठखूप खटापट करतात आणि निवडणूकीचा 'आदेश' कसा रद्द करता येईल ? याचेच 'टेंशन' घेतांना दिसतात...गुरूंच्या 'याच टेंशन'चं शाळा परिसर व कुटूंबात 'प्रदूषण' पसरत जाते आणि शिक्षकांना निवडणूकांच्या कामाचं कसं 'टेंशन' असते असं पटू लागते.काही 'करामती' शिक्षक आपण खूप 'पोहचलेले' आहोत या बडेजावात असतातष्ठ मग आम्हाला शिकवू द्याष्ठ आम्हांला 'अशैक्षणिक म्हणजेच निवडणूकांची कामे देऊ नका मुलांचे शैक्षणिक नुकसान होते.. अशी ती 'ढाल' पुढे करून शिक्षक आमदारांच्या पाठिशी लपून त्या त्या संघटनांना या मुद्द्यांवर लढावयास न चुकता सांगत सुटतात! बरे जे 'निवडून' आलेले शिक्षक आमदार असतात. ते निवडणूकीच्या कामा विरोधात बोलतील तरी कोणत्या तोंडाने! असो.मुद्दा असा आहे की अनेक अशैक्षणिक व 'हुकेल कामे' शिक्षकांना बहाल केल्या नंतर आता शासनाचा 'नवा फतवा' आला. थेट देशाच्या राजधानीत म्हणे 'भटके कुत्रे' अधिक झाले. त्यांचा बंदोबस्त कसा करावा ? यावर विचार मंथन झाले.. प्रदीर्घ विचार झाले असे की, भटक्या कुत्र्यां पासून जनतेची सुरक्षा व्हावी म्हणून सर्वोच्च न्यायालयाने ७ नोव्हेंबर २०२५ रोजी भटके कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी उपाययोजना करण्याचे सुस्पष्ट व सक्त आदेश देण्यात आलेत.त्या नुसार दिल्ली सरकारचा कित्ता गिरवत आता महाराष्ट्र शासनाने व शिक्षण संचालनालयाने या महत्वपूर्ण कामां साठी सरकारी शिक्षक असो की, खासगी शिक्षक त्यांना भटक्या कुत्र्याच्या मागे 'पाळत' ठेवण्यासाठी आदेश दिले आहेत. कुठे , कुठे कुत्रे फिरतात? ते कुठे जमा होतात? ते संख्येने 'अधिक' कुठे गोळा होतात? ते 'का' गोळा होतातष्ठ याचे 'संशोधनच' नव्हे तर 'चक्क' निरिक्षण ठेवून 'शासन दफ्तरी' कळवावे असे त्याचे स्वरूप आहे..याचा विषय देखील मजेशीर असून तो 'भटक्या कुत्र्यांचे व्यवस्थापन, नियमित देखरेख व तपासणी' असा आहे.या कामी शाळेतील एक शिक्षक नोडल अधिकारी म्हणून नेमायच असून त्याचे नाव व संपर्क क्रमांक शाळेच्या दर्शनी भागात लावायचा आहे.शासनाने व प्रशासनाने उचललेले हे 'पाऊल' आता नुकतेच शिक्षकांच्या 'मागे' लागले असूनष्ठ. गुरूंचे हे चरणस्पश कुत्र्यांच्या मागावरून पुढे पुढे जात सुटले पाहिजेष्ठ असे शासनाला वाटत असावे.जर कुत्रे चावतात म्हणून 'रेबीज' होतो. लोक बहूसंख्येने 'मृत्युमुखी' पडतात, मुले असुरक्षीत होतातष्ठ. आणि अश्या कुत्र्यांवर लक्ष ठेवणे त्यांच्या 'मागावर' जाणे, त्यांची संख्या मोजणे, कोणत्या परिसरात ते अधिक प्रमाणात 'मिळून येतात' याची इत्यंभूत माहिती प्रत्यक्ष 'चौकीदारी' करून शिक्षकांना करण्याची खास तंबी 'शिक्षक संचालनालयाने व महाराष्ट्र शासनाने ' परमआदरणीय गुरूजींना दिली असून जणू काही ते या कामा निमीत्ताने 'काम फत्ते' व्हावे 'मिशन' पूर्ण व्हावे म्हणून 'कार्यरत' झाले तर त्यांना 'धोके' होणार नाहीत, कुत्रे चावा घेणार नाहीत, त्यांना रेबीज होणार नाही, मृत्यूमुखी पडणार नाहीत, कश्या वरून?अशा प्रकारे कुत्र्यांच्या या ंग्स ेदेब्बद्दल परिपूर्ण 'धोकादायक' माहिती देणाऱ्या शिक्षकांचा 'बहूमान' व 'सन्मान' वाढविण्याचा शासनाचा (अ) प्रामाणिक हेतू असावा.प्राणीमात्रांवर दया करण्याचे 'धडे' मुलांना देणारे



गुरूजी जेव्हा 'भटके कुत्रे' पकडा व त्यांना त्या त्या परिसरातून 'उचलून' नजरे आड करून तो परिसर 'कुत्रे विरहित' करण्याचे नगर पालिका, महानगर पालिका, जिल्हा परिषद , खासगी संस्थाचालकांना 'दररोज' शाळेत, शालेय परिसरातून देत राहतील तर चिमुकल्यांनी नेमके शिक्षकांची कोणती भूमिका स्वीकारावी व त्याचे अनुकरण करावे? भटक्या कुत्र्यांच्या मागे शिक्षक हे 'शासनाचे, शिक्षण संचालनाचे व सरकारच्या आदेशाचे 'कवित्व' विद्यार्थ्यांच्या आकलना पलिकडचे आहे.

**भटके कुत्री नेमकी कुणाची डोकेदुखी ठरत आहेत?**

महाराष्ट्रात गेल्या सहा वर्षांमध्ये तीस लाखांहून अधिक लोकांना कुत्रा चावला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही चिंताजनक आकडेवारी विधानसभेत मांडली; तर भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी त्याकडे लक्ष वेधले. खुद्द उपमुख्यमंत्र्यांनीच सभागृहात माहिती दिल्याने हा प्रश्न पटलावर आला, ते बरे झाले. दरवर्षी पाच लाख लोकांना चावा, ही आकडेवारी निश्चितच सरकारी यंत्रणांच्या निष्क्रियतेकडे बोट दाखवणारी आहे. यात बळींची संख्या, उपचारासाठी रेबीज लसींची सरकारी रुग्णालयांकडील अनुपलब्धता, खासगी रुग्णालयांकडून होणारी लूट यासारखे अनेक प्रश्न अनुत्तरित राहतात, हे लक्षात घ्यावे लागेल. राज्यात सुमारे दोन लाख ३३ हजार भटक्या कुत्र्यांचे लसीकरण केले गेले. त्यात एकट्या मुंबईतील ५१ हजार कुत्र्यांच्या समावेश आहे. राज्यात सुमारे १२ लाख भटकी कुत्री आहेत. मुंबईत त्यांची संख्या ९० हजारांवर आहे. मुंबईतील हे भटके कुत्रे दर पाच मिनिटाला एका मुंबईकराचा चावा घेतात. गेल्या वर्षी तब्बल एक लाख मुंबईकरांना कुत्रा चावल्याच्या घटना घडल्या; तर महाराष्ट्रात यावर्षीच्या एक जानेवारीपासून ते ३१ जुलैपर्यंतच्या कालावधीत आठ लाख साठ हजार व्यक्तींना कुत्र्यांनी चावा घेतला, हे वास्तव भीतिदायक म्हणावे असेच आहे.भूतदया हा मानवी संस्कृतीचा महत्त्वाचा घटक असला आणि माणूस ती दाखवत असला, तरी भटक्या कुत्र्यांमुळे निर्माण झालेल्या वास्तवाकडे नागरी प्रश्न म्हणून पाहायलाच हवे. त्यामुळे त्यांचा बंदोबस्त व्हायलाच हवा.मात्र आधीच शासनाच्या निरनिराळ्या फतव्यांनी दमछाक झालेल्या शिक्षकांनीच हे इंद्रधनुष देखील का व कसं उचलावं? शासनाने त्यावर काय उपाय करावा? त्या साठी महानगरपालिके कडे प्रशिक्षीत कर्मचारी असतांना किती तरी 'एजन्सी' हे काम सहज करू शकत असतांना हा 'उफाटा' निर्णय घेऊनष्ठ.'भटक्या कुत्र्यांच्या मागे शिक्षक' अशी महाराष्ट्राची 'नवी ओळख' देशाला का करून द्यावीशी सरकारला वाटले असावे.? स्वस्थ बसतील तर ते शिक्षक कसले? घोय खोसून शिक्षक बांधवांनी या 'टेंशन' विरोधात शेवटी संघटनांच्या मार्फत 'नेहमी' सारखा आवाज उठवलाच.

आम्हांला शिकवू द्या शाळेत विद्यार्थी टिकवू द्या!

मिडियाही शिक्षकांना सहानुभूती मिळावी म्हणून या प्रकरणी म्हणा की 'वरकरणी' म्हणा चर्चा घडवून आप'आप' ला ऊंध वाढविण्याच्या कामात गुंतले आहेत. 'आप सरकार' शिक्षणां साठी आयडॉल ठरले असतांना दिल्ली सरकार देखील याला अपवाद राहिली नाही..नोकरी वाचविण्या साठी शिक्षक आता कुत्रा चावो की रेबीज होऊन 'धारातिर्थ' पडो.मात्र भटक्या कुत्र्यांच्या मागे आता शिक्षक लागल्याचे चित्र दिसणार आहे आणि कुत्र्यांवर लळा लावणारे 'चिमुकले' हे गुरूजींचे काय चालले म्हणून नक्की गोंधळून जाणार आहेत.यात तिळमात्र शंका नाही..

**महेश ठाकरे**

# अकोला महानगरपालिका निवडणूक : भाजपा–राष्ट्रवादी युतीत जागावाटप निश्चित

## भाजपाकडून ६२ जागांवर उमेदवार, ६० टक्के नव्या चेहऱ्यांना संधी

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात युती झाली असून, या युतीअंतर्गत भारतीय जनता पार्टी ६२ प्रभागांत उमेदवार उभे करणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस १४ जागांवर उमेदवार देणार असून, भाजपा मित्रपक्षांसाठी ४ जागा सोडणार असल्याची माहिती अकोला भाजपाचे निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांनी दिली.

भाजपाने उमेदवारी देताना 'गुजरात पॅटर्न'चा अवलंब करत ६० टक्के नव्या उमेदवारांना संधी दिली आहे. नवीन व जुने कार्यकर्ते यांना सर्वेक्षणाच्या आधारे तिकीट देण्यात आले असून, २०१७ मध्ये निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी ४० टक्के जणांऐवजी नव्या कार्यकर्त्यांना संधी देण्यात आली आहे.

अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपा–राष्ट्रवादी युतीमुळे राजकीय वातावरण तापले असून, नव्या चेहऱ्यांवर दिलेल्या भरामुळे निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**सामाजिक समतोल राखत उमेदवारी :** भाजपाच्या उमेदवार यादीत सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यामध्ये २८ महिला व ३४ पुरुष उमेदवारांचा समावेश आहे. अनुसूचित जातीतील ११, अनुसूचित जमातीतील १, ओबीसी प्रवर्गातील १८ तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील ३२ उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. ज्यांना तिकीट मिळाले नाही, त्यांच्या संघटनात्मक कामाचा उपयोग करून योग्य तो सन्मान करण्यात येईल, असेही पक्षाकडून स्पष्ट करण्यात आले.

भाजपा प्रदेश निवड समितीच्या मान्यतेनंतर मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण, निवडणूक प्रभारी ना. चंद्रशेखर बावनकुळे, संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, प्रदेश सरचिटणीस आ. रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री ना. आकाश फुंडकर, आमदार वसंत खंडेलवाल, महानगर अध्यक्ष जयंत मसने व निवडणूक प्रमुख विजय अग्रवाल यांच्या उपस्थितीत भाजपाचे प्रसिद्धी प्रमुख गिरीश जोशी यांनी उमेदवारांच्या नावांची घोषणा केली.

**भाजपाचे जाहीर झालेले उमेदवार (प्रभागनिहाय):**

प्रभाग १ (ब) – दिपाली राम बोंद्रे
प्रभाग २ (ब) – शरद श्रीराम तुरकर
प्रभाग २ (क) – अनिता राजेश चौधरी
प्रभाग २ (ड) – नितीन नरेश राऊत
प्रभाग ३ (अ) – शशिकला सतीश काळे
प्रभाग ३ (ब) – नितू महादेव जगताप
प्रभाग ३ (क) – सागर प्रकाशराव शेगोकार
प्रभाग ३ (ड) – प्रशांत गोविंदराव जोशी
प्रभाग ४ (अ) – संदीप रामकृष्ण शेगोकार
प्रभाग ४ (ब) – शिल्पा किशोर वरोकार
प्रभाग ४ (क) – पल्लवी शिवाजी मोरे
प्रभाग ४ (ड) – मिलिंद डिगांबर राऊत
प्रभाग ५ (अ) – विद्या सुभाष खंडारे
प्रभाग ५ (ब) – जयंत रामराव मसने
प्रभाग ५ (क) – रश्मी प्रशांत अवचार
प्रभाग ५ (ड) – विजय कमलकिशोर अग्रवाल
प्रभाग ६ (अ) – आरती प्रकाश घोगलीया
प्रभाग ६ (ब) – हर्षद प्रमोद भांबरे
प्रभाग ६ (क) – निखिता राहुल देशमुख
प्रभाग ६ (ड) – पवन मुगुटराव महल्ले
प्रभाग ८ (अ) – रंजना शाम विंचनकर
प्रभाग ८ (ब) – तुषार महेंद्र भिरड
प्रभाग ८ (क) – माधुरी सुनील क्षीरसागर
प्रभाग ८ (ड) – राजेश्वर केशव घोटे
प्रभाग ९ (ब) – ज्योती वसंत मानकर
प्रभाग ९ (ड) – हर्षल बाबुराव चौधरी
प्रभाग १० (अ) – मंजुषा संजय शेळके
प्रभाग १० (ब) – वैशाली विलास शेळके
प्रभाग १० (क) – अनिल देविदास गरड
प्रभाग १० (ड) – नितीन मुरलीधर ताकवाले
प्रभाग ११ (ड) – राहुल राजकुमार चौरसिया
प्रभाग १२ (अ) – संतोष देवराव डोंगरे
प्रभाग १२ (ब) – कल्पना संजय गोटफोडे
प्रभाग १२ (ड) – अजय रमेशचंद्र शर्मा
प्रभाग १३ (अ) – विशाल श्रावण इंगळे
प्रभाग १३ (ब) – प्राची निलेश काकड
प्रभाग १३ (क) – सुनिता विजय अग्रवाल
प्रभाग १३ (ड) – अनिल सुनील मुरूमकार
प्रभाग १४ (अ) – दिपाली प्रवीण जगताप
प्रभाग १४ (ब) – अस्मिता प्रकाश वगारे
प्रभाग १४ (क) – गोपाल रघुनाथ मुळे
प्रभाग १४ (ड) – दिलीप तुळशीराम भरणे
प्रभाग १५ (अ) – हरीश रतनलाल अलीमचंदानी
प्रभाग १५ (ब) – मनीषा रविंद्र भंसाली
प्रभाग १५ (क) – शारदा रणजीत खेडकर
प्रभाग १५ (ड) – अरविंद प्रल्हाद टाले
प्रभाग १६ (अ) – सिद्धार्थ रामदास उपर्वट
प्रभाग १६ (ब) – मुस्कान आशिष पंजवानी
प्रभाग १६ (ड) – संजय बाबूलाल बडोने
प्रभाग १७ (ब) – अमोल अवधूत मोहोकार
प्रभाग १७ (ड) – करण अशोक साहू
प्रभाग १८ (अ) – सरिता सुनील कांबळे
प्रभाग १८ (ब) – अमोल सुधाकर गोगे
प्रभाग १८ (ड) – दिलीप रामकृपाल मिश्रा
प्रभाग १९ (अ) – धनंजय गणपत धबाले
प्रभाग १९ (ब) – गजानन शाळीग्राम सोनोने
प्रभाग १९ (क) – योगिता गणेश पावसाळे
प्रभाग १९ (ड) – माधुरी संजय बडोने
प्रभाग २० (अ) – मंगेश भगवान झिने
प्रभाग २० (ब) – शारदा वैकुंठ ढोरे
प्रभाग २० (क) – सोनाली गणेश अंधारे
प्रभाग २० (ड) – विनोद मुरलीधर मापारी

### राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)

**प्रभाग १ -**
अ. अ. रहीम अ कादर पेंटर
क.शाजिया रिजवान अजीज अलिशाह
ड. शेख नाजीम शेख रमजान
**प्रभाग २ -**
अ. मानवतकर वैशाली किशोर
**प्रभाग ९ -**
अ. अजय रामदास रामटेके
ब. सौ. गायकवाड शितल मनोज
**प्रभाग ११ -**
अ. नकीर खान अहमद खान
ब. ८ मोरवाले बनोबी शेख कासम
क. समिना परविन नकीर खान
**प्रभाग १२ -**
क. सौ. संगिता मदन भारगड
**प्रभाग १६ -**
क. नर्गिस परविन फैय्याज खान
**प्रभाग १७ -**
अ. शितल संतोष डाबेराव
क.वैशाली सुधिर कहाकर
**प्रभाग १८ -**
क. कविता दीलीप देशमुख

# मनपा निवडणूक : शिवसेना (उबाठा)ची यादी जाहीर

## २० प्रभागांसाठी ५५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

■ प्रतिनिधी | अकोला ■

शिवसेना (उबाठा) ची यादी मंगळवारी अखेरच्या क्षणी जाहीर करण्यात आली असून यामध्ये २० प्रभागांसाठी तब्बल ५५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे करण्यात आले आहे. तर यंदाच्या निवडणुकीत उबाठा सेनेने अनेक नवीन चेहऱ्यांना संधी दिली आहे. त्यामुळे मनपाची निवडणूक आणखीन चुरशीची ठरणार आहे.

**शिवसेना (उबाठा) अधिकृत यादी**

**प्रभाग २ -**
अ – शारदा प्रकाश वानखड़े
क – प्रियंका प्रेम समुद्रे
ड – मनोज सुधीर बावीस्कर
**प्रभाग ३**
अ – माधुरी सतीश वानरे
ड – रमेश किसन शिंगोकार
**प्रभाग ४**
अ – प्रवीण चोपड़े
ब – शांता बळीराम कपले
क – सुरेखा राजेश वरोकार
ड – अभय अशोक खुमकर
**प्रभाग ५**
अ – भारती जयदीप पळसपगार
ब – मनीष विनायक मोहोड
क – सुनीता सूर्यकांत कापसे
ड – दीपक श्रीराम गवारे
**प्रभाग ६**
अ – दुर्गा नारायण क्षीरसागर
ब – प्रशांत महादेव मानकर
क – रोहिणी संजय पुझेलू
**प्रभाग ८**
अ – सोनाली दिनेश सरोदे
ब – मनोज अनंतराव पाटील
क – निकिता आकाश कवड़े
ड – नितीन रमेश औतकार
**प्रभाग ९**
अ – जयशन रघुनाथ गुडधे
ब – साधना सतीश येवले
क – मथुरा अशोक तायडे
**प्रभाग १०**
अ – शीतल योगेश गोतमारे
ब – माधुरी मुकेश देशमुख
क – राहुल गणेशराव वानखड़े
ड – निलेश दामोदरराव वानखड़े
**प्रभाग ११**
अ – शहनाज़बी पी. अ. बशीर
प्रभाग १२
ड – सागर भारुका
**प्रभाग १३**
अ – देवराव अहीर
ब – अक्षय नागापुरे
क – दिपाली रमण आणोरकर
ड – गोपाल परमेश्वर बिलेवार
**प्रभाग १४**
अ – ज्योति महेंद्र खिद्वारे
ब – नम्रता प्रमोद धर्माळे
क – जगदीश अवधूत मुरुमकार
ड – मंगेश रामभाऊ काळे
**प्रभाग १५**
ब – रेखा ज. विजय दुर्गिया
क – कल्पना हनुमंतराव डाहे
ड – लक्ष्मण विशानंदास पंजाबी
**प्रभाग १७**
ब – किशोर श्रीराम अकळकर
क – सुजाता राजेश चव्हाण
ड – शारदा मुरलीधर सटाके
**प्रभाग १८**
अ – वंदना लक्ष्मण कांबळे
ब – दत्ता एकनाथ बावस्कर
क – रूपाली सोमनाथ आडगांवकर
ड – आशीष सुशील तिवारी
**प्रभाग १९**
अ – प्रमोद अशोक खंडारे
ब – आजाबराव शामराव उईके
क – सारिका रामेश्वर पड़लकर
ड – प्रतिमा आश्विन पांडेय
**प्रभाग २०**
अ – विजय रामदास इंगळे
ब – सुरेखा मंगेश काळे
क – वर्षा राजेश घोगरे
ड – शंकर भाऊराव लंगोटे

# मनपा निवडणूक : शिवसेना (शिंदे) गटाची यादी जाहीर

**शिवसेना (शिंदे गट)**

**प्रभाग क्र :- १**
१)मोहम्मद उस्मान मोहम्मद युसुफ
२)सीमा विनोद धाडसे
३)संचिता विजय तळेकर
४)विजय शेषराव तळेकर
**प्रभाग क्र :- २**
१)कविता शंकर जयराज
२)शुभम दिनकर वडतकर
३)पूनम प्रदीप काशीद
४)दिनकर सूर्यभान रानबावळे
**प्रभाग क्रमांक - ३**
अ सुमित पानझाडे ब स्वानंदी पांडे
क अनंत चोपडे ड संगीता शुक्ला
**प्रभाग क्रमांक - ४**
अ तुषार इंगळे ब साक्षी पुंडकर
क सुनिता आढाव ड गणेश गिरी
**प्रभाग क्रमांक -५**
अ इंगळे ब विजय वानखडे
ड जळमकार
**प्रभाग क्रमांक -६**
ब:- चेतन सुरेश पाटील
क:- सौ सारिका रुपेश जयस्वाल
ड:- राजेश अरुण जोशी
**प्रभाग क्र :- ७**
१) राखी मनीष पाटेकर
२)विकास सीताराम रामटेके
**प्रभाग क्रमांक - ८**
अ मंगला म्हैसणे ब उज्जैनकर
क मंगेश गीते ड योगेश ढोरे
**प्रभाग क्रमांक - ९**
अ लवकेश मोहन लोखंडे
ब स्वाती अतुल एडणे क पूजा अंकुश तवर
ड किरण आनंदा शिरसाट
**प्रभाग क्र- १०**
१)अशा मनीष मालगे २) पुजा सागर पूर्णेये
३) प्रफुल गजानन देशमुख
४)पप्पू श्रीराम मोरवाल
**प्रभाग क्र- ११**
१)निशा सत्यनारायण ग्यारल
२)यशवंत पोचन्ना तुमडे
**प्रभाग - १२**
अ. गौतम नामदेव कंकाड
ब. शीतल संजय अग्रवाल
क. उषा जगजीत सिंह विर्क
ड. हितेश दलसुख भाई बगथेरिया
**प्रभाग १३**
अ पवन पवार क शैला झगडे ड दिलीप नायडू
**प्रभाग १४**
अ सोनल दुर्गे ब पूजा सागर वाघ
क प्रवीण वाहुरवाघ ड आशिष सोनोने
**प्रभाग १५**
अ भूषण चौधरी ब नंदा दीपक इंगळे
क श्वेता लक्ष्मीकांत बाजड
ड समर्थ विजय शर्मा
**प्रभाग क्रमांक १६**
अ - रेणू रवी थनजय
ब- वैजयंती राजकुमार मूलचंदानी
क - सौ राजश्री राजकुमार मिश्रा
ड - दर्शन रोशन राज
**प्रभाग क्रमांक १७**
अ - सौ सविता गजानन चव्हाण
ब - सौ अंकिता चेतन गुजर
क - श्रीमती गीता रमाशंकर मिश्रा
ड - श्री राजेश कृपाशंकर मिश्रा
**प्रभाग क्र १८**
१)सपना अश्विन नवले
२)बजरंग विकास रोडे
३)अर्चना प्रदीप मुदिराज
४)अश्विन उद्धवराव नवले
**प्रभाग क्रमांक १९**
अ अजय इंगोले ब संगीता आत्राम
क सोनाली राजपूत ड नैना निखिल ठाकूर
**प्रभाग क्रमांक २०**
अ अविनाश मोरे ब कुणाल शिंदे
क संगम मोहोळ ड गौरव अग्रवाल

# काँग्रेस - राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांची युती

**अकोला :** अकोला महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी काँग्रेस पार्टी आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांच्यात अधिकृत युती निश्चित झाली आहे. या युतीअंतर्गत एकूण ८० वॉर्डांपैकी २४ वॉर्डांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) आपले उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवणार असून, उर्वरित ५६ वॉर्डांमध्ये काँग्रेस पार्टीचे उमेदवार असतील, अशी माहिती पक्षाकडून देण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) तर्फे २४ वॉर्डांतील अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली असून, या उमेदवारांना महानगराध्यक्ष रफीक सिद्दीकी आणि कार्याध्यक्ष देवानंद ताले यांच्या हस्ते पक्षाचे अधिकृत फॉर्म 'ए' आणि फॉर्म 'बी' प्रदान करण्यात आले आहेत. दरम्यान, काँग्रेस पक्षासोबत सुरू असलेल्या समन्वय चर्चेनंतर युतीच्या अंतिम धोरणानुसार २ ते ३ उमेदवारांचे नामांकन मागे (विड्रॉल) घेतले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. ही माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) चे प्रदेश संघटन सचिव जावेद जकरिया यांनी दिली.

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यादी

**प्रभाग क्र. २**
रमेश दीपक नाईक
**प्रभाग क्र. ६**
बुंदले गीताबाई ओमप्रकाश
पाटोले मकरंद शशिकांत
**प्रभाग क्र. ८**
रविंद्र बालासाहेब नापाडे
रुपाली महेश इंगळे
अल्ताफ खान अब्दुल्ला खान
**प्रभाग क्र. ९**
राजेश रतन नेचाने
सुनीता अरविंद मूर्ती
सानिया राजिक खान
सुनील वासुदेव वानखडे
**प्रभाग क्र. ११**
साहिदा बी. शेख मेहबूब मंतवाले
**प्रभाग क्र. १२**
संदीप दुर्गादास तायडे
**प्रभाग क्र. १५**
संगीता आनंद वानखडे
बुशरा जवीद तौसीफुद्दीन
**प्रभाग क्र. १६**
इशरत हुसेन शाकिर प्रवीण
अमरीन सदाफ सैयद नाझिम
मोहम्मद रफीक मोहम्मद सिद्दीकी
**प्रभाग क्र. १७**
बाबा साहेब भुमरे
**प्रभाग क्र. १८**
उमेश सुरेश इंगळे
अविनाश चौहान
**प्रभाग क्र. १९**
अमोल उत्तमराव इंगळे
नंदकिशोर विठ्ठल ठाकरे
श्रद्धा प्रफुल्ल कोल्हे
पूजा पंकज गावंडे

# मनपा निवडणूक : काँग्रेसच्या उमेदवारांची यादी

**प्रभाग क्र. १ -**
अ. अबदुल्ला
ब. अजरा नसीन मक्सूद खान
क. निलोफर सोहील खान
ड. अबदुल सलाम अबदूल करीम
**प्रभाग क्र. २ -**
अ. सौ. अर्चना पराग कांबळे
ब. नुर अफजा बी शेख युनूस
क. चांदनी रवी शिंदे
ड. ॲड. इकबाल सिद्दीकी
**प्रभाग क्र. ३ -**
ब. रुपाली जर्नाधन बुटे
क. काजल दिनेश खोब्रागडे
**प्रभाक क्र. ६**
ब आकोश श्रीराम सायखेडे
ड. रवी पाटने
**प्रभाग क्र. ७**
अ. सुर्वनरेखा विजय जाधव
ब. मो. ईर्फान अब्दुल रहमान
क. जमिला बी शेख सलीम चौधरी
ड शेख फरीद शेख करीम
**प्रभाग क्र. ८**
अ. अर्शिया अंजूम शेख जाकिर
ब. अफसर अहमद अब्दुल गफ्फार कुरेशी
क. मो. एजाज अ रज्जाक,
ड. सविता सोमेश डिगे
**प्रभाग क्र. ९**
अ. प्रिया अश्विन शिरसाट
ब. निखत शाहिन अफसर अहेमद कुरेशी
क. कनीज खातून मै. ईलियास
ड. मै. फाजील अब्दुल करीम
**प्रभाग क्र. १०**
अ. ज्योती संतोष गोळे
ब. महफूजा बेगम मोहम्मद अफसर
क. राहुल विजय सारवान
ड. विलास गोतमारे
**प्रभाग क्र. ११**
अ.जैनब बी शेख इब्राहिम
ब. शाहिन अंजूम मैहबूब खान
क. फिरदोस परविन आरीफ खान
ड. डॉ. झिशान अजहर हुसैन
**प्रभाग क्र. १२**
अ. दिपक गवई ब. नैना सुरज लोणारे
क. सरोज उदयसिंह चौहान
ड. विजय परमार
**प्रभाग क्र. १४**
ब. ओम खंडारे
क. संदेशस वानखेडे
**प्रभाग क्र. १५**
ड. प्रशांत मधूकर प्रधान
**प्रभाग क्र. १६**
रिया हरीष कटारीया
**प्रभाग क्र. १७**
अ.जया विनोद गेडाम
ब. अम्रीन तब्बसूम सै. खूर्रम
क. रफीया बि. नईम खान (याकुब पहेलमान)
ड. आजाद खान अलिया खान
**प्रभाग क्र. १८**
अ. फिरोज खान अलियार खान
ब. अर्शीया परविन मो. शारीक
क. अ. रऊफ गुबरे
ड. स्मिता गजानन कांबळे


## जाहीर नोटीस

### वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. २११७/२०२५ — प्रोसेस नं.१९२७३/२०२५
चौ.ता. ०७/०१/२०२६ — दिनांक : २४/११/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती रामप्यारीबाई अमरचंद कासट २. ओमप्रकाश अमरचंद कासट दोघेही रा. एमआयडीसी फेस २, प्लॉट नं. डी - ४६, अकोला, ता. जि. अकोला. ३. सौ. सरस्वती श्यामलाल झनवार रा. बीड, ता. जि. बीड ४. सौ. रश्मी राजेशकुमार नावल रा. साबजी मंदिर, बालाजी चौक, गुलाबपुरा, ता. जि. भिलवारा, राजस्थान. ५. सौ. संतोष संजयकुमार लाहोटी रा. हैद्राबाद, तेलंगाना. ६. शिवप्रकाश अमरचंद कासट रा. एमआयडीसी फेस २, प्लॉट नं. डी - ४७, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अमरचंद भोदुलाल कासट
**पत्ता :-** रा. एमआयडीसी फेस २, प्लॉट नं. डी - ४७, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अमरचंद भोदुलाल कासट यांचे दि. २५/१२/२०१७ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/११/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

### वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. २३३५/२०२५ — प्रोसेस नं.२१०५५/२०२५
चौ.ता. २७/०१/२०२६ — दिनांक : २६/१२/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती रूखमाबाई शामराव चव्हाण २. लक्ष्मी प्रतापसिंग सोलंकी रा. मु. पो. सोमनाथ, पो. ता. मुल जि. चंद्रपुर ३. संतोष शामराव चव्हाण ४. दिलीप शामराव चव्हाण ५. श्रीमती दुर्गा प्रकाश पवार अ. क्र. १, ३, ४ व ५ रा. मु. पो. देवळी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शामराव नामदेव चव्हाण
**पत्ता :-** रा. मु. पो. देवळी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की मयत शामराव नामदेव चव्हाण यांचे दि. २३/०६/२०२५ रोजी मु. पो. देवळी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २६/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


# वंचित बहुजन आघाडी उमेदवार यादी

**प्रभाग क्रमांक १**
अ - जाकीरखान बिस्मिल्ला खान
ब - सुल्तान बी सय्यद मक़सूद
क - भुरी बहुउद्दीन गोरवे
**प्रभाग क्रमांक २**
अ - वंदना वासनिक
ब - शफीक शहा
क - हिना कौसर मोहम्मद आसिफ
ड - बुद्धरत्न इंगोले
**प्रभाग क्रमांक ३**
अ - सौ संगीता मोरे
ब - प्रियंका माणिक शेळके
क - प्रविण हिवराळे
ड - निलेश देव
**प्रभाग क्रमांक ४**
अ - नितेश किर्तक
ब - आशा सुरेश गावंडे
क - सरला अशोक मेश्राम
ड - दिलीप सदाशिवराव कनखर
**प्रभाग क्रमांक ५**
ब - विलास रमेश आगरकर
ड - शुद्धोधन वासुदेव पळसपगार
**प्रभाग क्रमांक ७**
अ - किरण महेंद्र डोंगरे
ब - मोहन येवले
क - ताहेरा बी महेबुब
ड - महेंद्र डोंगरे
**प्रभाग क्रमांक ८**
अ - मंतोषताई मोहोड
ब - रमेश महादेव उबे
क - रईसाबी सय्यद मोहसिन
ड - मनोज शंकर शिरसाट
**प्रभाग क्रमांक ९**
अ - चंदू श्रावण शिरसाट
ब - नाज परवीन शेख वसीम
क - शमीम परवीन कलीम खान पठाण
ड - अजहर हुसेन शायजाद हुसेन
**प्रभाग क्रमांक १०**
ब - रिहान परवीन मोहम्मद इजाज
**प्रभाग क्रमांक १२**
अ - आकाश संजय गवई
क - जगदीश कौर सुखवंत सिंग घुमन
ड - रितेश शांताराम मोरे
**प्रभाग क्रमांक १३**
अ - जय रामा तायडे
ब - वर्षा प्रकाश धनभर
क - सौ मेघा सुनील शिराळे
ड - पंकज देशमुख
**प्रभाग क्रमांक १४**
अ - उज्ज्वला प्रवीण पातोडे
ब - शेख शमसु शेख साबीर
क - जयश्री महेंद्र बहादुरकर
ड - पराग रामकृष्ण गवई
**प्रभाग क्रमांक १६**
अ - मिलिंद आकोडे
क - पुजा छगन जयस्वाल
ड - सुरेखा मधुकर इंगळे (वाहणे)
**प्रभाग क्रमांक १७**
ब - देवा दशरथ गावंडे
ड - गणेश श्रीराम कदम
**प्रभाग क्रमांक १८**
अ - सौ शितल सीमांत तायडे
ब - सुरेश नारायण कलोरे
क - सौ सुरेखा पुरुषोत्तम अहीर
ड - शेख कासम शेख शेखजी
**प्रभाग क्रमांक १९**
अ - राहुल श्रावण म्हस्के
ब - धनश्री रमेश सोने
ड - रुक्खीमी सुधाकर पवार

### शब्दांच्या उजेडात उजळलेले वर्धा

# नेतृत्व संमेलने आणि नव्या साहित्यनिर्मितीने २०२५ ठरले संस्मरणीय

**वर्धा । रवींद्र लाखे**

राजकारण, बाजार आणि सोशल मीडियाच्या गोंगाटात साहित्य हरवत चालले आहे, अशी सार्वत्रिक बोलले जात असतानाच २०२५ या वर्षाने मात्र वर्धा आणि विदर्भात शब्दांची तलवार पुन्हा एकदा ताठ उभी केली. हे वर्ष साहित्याच्या मूक अस्तित्वाचे नव्हे, तर आक्रमक आत्मघोषणेचे ठरले. वाचन, लेखन आणि वैचारिक लढ्याने साहित्याने आपली ताकद दाखवून दिली.



प्रदीप दाते | डॉ. गजानन कोठेवार | डॉ. राजेंद्र मुंडे | संजय इंगळे तिगावकर

विदर्भ साहित्य संघाचे नेतृत्व करणारे प्रदीप दाते यांची अखिल भारतीय साहित्य महामंडळावर पुनश्च निवड ही काही साधी घटना नव्हे. हा विदर्भाच्या साहित्यिक अस्तित्वाचा दिल्ली-दरबारात घुमलेला ठणठणीत आवाज आहे. वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिलेल्या विदर्भाच्या साहित्यिक प्रश्नांना राष्ट्रीय व्यासपीठावर मांडण्याची संधी पुन्हा एकदा मिळाली आहे. ही निवड म्हणजे विदर्भाच्या शब्दांना मिळालेला न्याय आहे.

त्याचवेळी राज्यातील ग्रंथालय चळवळीचा कणा मानल्या जाणाऱ्या राज्य ग्रंथालय संघाच्या अध्यक्षपदी डॉ. गजानन कोटेवार यांची दुसऱ्यांदा वर्णी लागली. 'वाचन संस्कृती मरण पावली' असे म्हणणाऱ्यांच्या थोबाडीत बसणारा हा वास्तवाचा चपराक ठरली. ग्रंथालये ही फक्त पुस्तकांची गोदामे नसून ती विचारांची शस्त्रागारे आहेत, हे त्यांनी कृतीतून दाखवले.

वर्ध्याने मात्र याच वर्षात थांबण्याचे नाकारले. दोन वर्षांपूर्वी ९७ वे मराठी साहित्य संमेलन यशस्वीपणे पेलल्यानंतर, यंदा थेट पहिले वाचन संस्कृती साहित्य संमेलन भरवून वर्ध्याने साहित्यिक राजधानी असल्याचा दावा ठासून मांडला. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने हा मान वर्ध्याला दिला आणि अध्यक्षपदाची धुरा कवी, समीक्षक व संपादक डॉ. राजेंद्र मुंढे यांच्याकडे सोपवली. वाचन म्हणजे छंद नव्हे, तर सामाजिक बंड आहे, हा स्पष्ट संदेश या संमेलनातून दिला गेला.

राष्ट्रीय साहित्यिक व्यासपीठावरही वर्ध्याचा झेंडा फडकला. सातारा येथे होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनातील कवी संमेलनासाठी कवी प्रशांत पनवेलकर यांची निवड ही विदर्भातील नव्या कवितेच्या आक्रमक उपस्थितीची नोंद आहे. त्यांच्या शब्दांतला अंधार, अस्वस्थता आणि वास्तवाचे दर्शन हे आजच्या काळाचे आरसे आहेत. या संमेलनाच्या आयोजनात प्रदीप दाते यांची भूमिका निर्णायक असून गझल कट्ट्याचे संयोजन गझलकार संजय इंगळे तिगावकर करीत आहेत.

वर्ध्याची साहित्यिक आग सीमारेषा ओलांडून परदेशातही पोहोचली. वर्धेकर पत्रकार मनोज भोयर आणि प्रवीण धोपटे यांनी दुबई येथे झालेल्या आठव्या शब्द साहित्य संमेलनात उद्घाटक व वक्ता म्हणून हजेरी लावून विदर्भाच्या वैचारिक परंपरेचा झेंडा जागतिक व्यासपीठावर रोवला.

साहित्यानिर्मितीच्या पातळीवरही हे वर्ष स्फोटक ठरले. प्रशांत पनवेलकर यांचा 'गडद संदर्भाचा अन्वयार्थ' आणि डॉ. राजेंद्र मुंढे यांचा 'मी कविता लिहीन' हे कवितासंग्रह म्हणजे सत्तेला प्रश्न विचारणारी, समाजाला आरसा दाखवणारी साहित्यिक शस्त्रे ठरली. ग्रामीण कथाकार आशीष वरघने यांची वाटचालही सत्ताकेंद्रांना अस्वस्थ करणारी आहे.

विदर्भ साहित्य संघ, लोकसाहित्य परिषद, संकल्प साहित्य मंडळ, परिवर्तन व प्रगतिशील साहित्य संघ आणि सत्यशोधक कट्टा यांची वर्षभर चाललेली साहित्यजागर म्हणजे व्यवस्थेच्या उदासीनतेविरोधात उभा राहिलेला शब्दांचा लढा आहे.

२०२५ हे वर्ष सांगून गेले. साहित्य संपत नाही, ते केवळ नव्या रूपात व्यक्त होते. वर्ध्याने हेच सिद्ध केले की शब्द आजही जिवंत आहेत, विचार अजूनही अस्वस्थ आहेत आणि वाचन ही समाजाला अंतर्मुख करणारी सर्वात मोठी शक्ती आहे.

### वाघाची नाही, माकडांचीच दहशत

# दहशत माकडांची, जबाबदारी कोणाची : सिंदीकरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

### नागरिक घरात कैद, प्रशासन बेपत्ता

**सिंदी रेल्वे /जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यात वाघाच्या दहशतीच्या बातम्या झळकत असतानाच, सिंदी शहरात मात्र माकडांच्या कळपाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. दररोज शहरातील कोणत्या ना कोणत्या प्रभागात माकडांचा उच्छाद सुरू असून, नागरिकांचे सुरक्षित जीवन धोक्यात आले आहे. घराबाहेर पडणे तर दूरच, दिवसा देखील घरांची दारे बंद ठेवण्याची वेळ सिंदीकरांवर आली आहे.

लोकवस्तीत माकडांचा वावर नवीन नाही, मात्र सध्याचा कळप अत्यंत आक्रमक, बेधडक आणि जीवघेणा ठरत आहे. घरातील गॅलरी, पोर्च, किचनमध्ये जबरदस्तीने शिरकाव करून नासधूस करणे, खाण्याच्या वस्तू उचलून पळ काढणे, अंगणातील पेरू, डाळिंब, पपई, बोर, फुलझाडे पूर्णपणे उद्ध्वस्त करणे, हा रोजचाच प्रकार झाला आहे. खाण्यापेक्षा तोडफोडीवरच अधिक भर असल्याने नागरिकांचे आर्थिक नुकसानही वाढत आहे.



माकडांच्या या कळपाला कोणी विरोध करण्याचा प्रयत्न केला, तर ते थेट चवताळून अंगावर धावून येत आहेत. अनेक नागरिकांना चावा घेण्याच्या, झडपा मारून जखमी करण्याच्या घटना घडल्या असून, शहरात भीतीचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे, कुत्र्यांची भीती न बाळगता ही माकडे उलट कुत्र्यांवरच हल्ला करत असल्याने त्यांची आक्रमकता अधिकच वाढली आहे.

लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिक घराबाहेर पडण्यास घाबरत आहेत. शाळकरी मुले, कामावर जाणारे कर्मचारी, व्यापारी वर्ग सर्वांनाच माकडांच्या दहशतीचा सामना करावा लागत आहे. वाघ जंगलात आणि माकडे शहरात अशी उपरोधिक चर्चा शहरात सुरू असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेवर नागरिक संताप व्यक्त करत आहेत.

इतकी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही नगरपालिका आणि वनविभागाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. केवळ पाहणी, आश्वासने आणि कागदी कारवाईपुरतीच प्रशासनाची भूमिका मर्यादित राहिली असून, प्रत्यक्षात माकडांचा बंदोबस्त करण्यासाठी कोणतीही ठोस योजना राबवली जात नसल्याचे चित्र आहे.

# वैष्णवी कुऱ्हाडेचे नेत्रदीपक यश; एम.एस्सी. कॉम्प्युटर सायन्समध्ये विद्यापीठात प्रथम



**आर्वी । जनमाध्यम**

आर्वी येथील नगर परिषद गांधी विद्यालयाची माजी विद्यार्थिनी वैष्णवी कैलास कुऱ्हाडे हिने संत गाडगे महाराज विद्यापीठ, अमरावती येथून एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) परीक्षेत मेरिटमध्ये प्रथम क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. तिच्या या नेत्रदीपक कामगिरीमुळे आर्वी शहरात सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

वैष्णवी हिचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, आर्वी येथे झाले. त्यानंतर तिने नगर परिषद माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, आर्वी येथून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुढे तिने शिवाजी सायन्स कॉलेज, अमरावती येथून बी.एस्सी. पदवी प्राप्त केली. सातत्यपूर्ण मेहनत, शिस्तबद्ध अभ्यास आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश मिळाल्याचे वैष्णवीने नमूद केले. सामान्य कुटुंबातील विद्यार्थिनीने मिळवलेले हे यश अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. वैष्णवीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य विश्वेश्वर पायले, तसेच विजय जवादे, विजय शेंडे, सचिन कांबळे, दत्तात्रय खंदारे, अमोल उगे, राजेश अहिव (से.नी.), बी. डी. चौकोने, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले. शैक्षणिक क्षेत्रात आर्वी शहराचा नावलौकिक वाढवणाऱ्या वैष्णवीच्या यशामुळे विद्यार्थी व पालकांमध्येही नवचैतन्य निर्माण झाले असून, तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## संक्षिप्त

### पैशांच्या वादातून युवकास मारहाण

**देवळी :** शहरातील इंदिरानगर परिसरात पैशांच्या कारणावरून एका युवकास मारहाण झाल्याची घटना घडली. या प्रकरणी देवळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. किशोर मरगाडे हे घरी जात असताना करण पालथे याने त्यांच्याकडे पैशांची मागणी केली. पैसे नसल्याचे सांगितल्यावर करण पालथे याने त्यांना मारहाण करून जखमी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणाचा पुढील तपास देवळी पोलीस करीत आहेत.

### शस्त्र बाळगून दहशत; एकास अटक



**वर्धा :** सार्वजनिक ठिकाणी शस्त्र बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या एका इसमास पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली. ही कारवाई इतवारा बाजार परिसरात करण्यात आली. अमोल गेडाम हा सार्वजनिक रस्त्यावर चाकू बाळगून नागरिकांमध्ये भीती निर्माण करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलीस पथकाने घटनास्थळी जाऊन त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून कोयता जप्त करण्यात आला असून वर्धा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जुगारप्रकरणी पाच जणांवर कारवाई

**आर्वी :** शहरात जुगार खेळत असल्याप्रकरणी पोलिसांनी पाच जणांवर गुन्हा दाखल केला आहे. आठवडी बाजार परिसरात छापा टाकून पोलिसांनी आकडे लिहिलेले कागद, रोख रक्कम असा एकूण ११ हजार ३५६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आर्वी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### दुचाकीवरून पडून एकाचा मृत्यू

**वर्धा :** सेवाग्राम-करंजी (भोगे) मार्गावर दुचाकीवरून पडल्याने एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. रमेश तानबा नेहारे (वय ५८), रा. करंजी (भोगे) असे मृताचे नाव आहे. रस्त्याच्या कडेला दुचाकीसह पडलेले आढळून आल्यानंतर त्यांना तातडीने सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना मृत घोषित करण्यात आले.

### उपचारादरम्यान वयोवृद्धाचा मृत्यू

**वर्धा :** सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना एका वयोवृद्ध व्यक्तीचा मृत्यू झाला. याप्रकरणी खरांगणा (मो.) पोलिसांनी नोंद घेतली आहे. श्यामराव मिठूजी पवार (वय ९५), रा. पिंपळगाव (भोसले), ता. आर्वी असे मृताचे नाव आहे. उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले.

### विहिरीत पडून तरुणाचा मृत्यू

**कारंजा (घाडगे):** तालुक्यातील लादगड येथे विहिरीत पडून एका तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. गौरव शांताराम मसराम (वय २५), रा. लादगड असे मृताचे नाव आहे. विहिरीत पडल्याचे लक्षात येताच नागरिकांनी त्यास जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले; मात्र तपासणीनंतर डॉक्टरांनी मृत घोषित केले. या प्रकरणी खरांगणा (मो.) पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली आहे.

# वेगाचा हव्यास ठरतो जीवघेणा

### 'घाई नकोष्ठ मानवजन्म पुन्हा नाही' : स. फौ. रियाज खान

**वर्धा । जनमाध्यम**

वाहन चालवताना क्षणाची घाई आयुष्यभराचा पश्चात्ताप ठरू शकते. जो वाहतूक नियम चुकवतो, तो थेट जीवन गमावतो. मानवजन्म पुन्हा मिळत नाही, त्यामुळे वेगावर नियंत्रण ठेवा, असा थेट, परखड आणि अंगावर शहारे आणणारा संदेश सहाय्यक फौजदार रियाज खान यांनी दिला.



वर्धा येथील केसरीमल कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वर्धा येथे परिवहन समितीच्या वतीने वाहतूक जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत शालेय बस, ऑटो व व्हॅन चालक-मालकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन का आवश्यक आहे, याची सखोल व वास्तववादी माहिती देण्यात आली.

शालेय वाहनांमध्ये निष्काळजीपणा म्हणजे थेट विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ आहे. नियम तोडणाऱ्यांवर कारवाई अटळ आहे, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला. वाहतूक नियम म्हणजे दंडापासून वाचण्याचे साधन नसून जीवन वाचविण्याची सुरक्षा कवच आहे, असे त्यांनी ठामपणे अधोरेखित केले.

ही कार्यशाळा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, व अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, यांच्या मार्गदर्शनाखाली, वाहतूक पोलीस निरीक्षक विलास पाटील यांच्या आदेशाने आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी घनिष्ठाताई बोरुटकर होत्या. यावेळी पोलीस हवालदार भोळे, शाळेतील शिक्षिका भिमटे, तसेच वाहन चालक–मालक मानेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# कडाक्याच्या थंडीतही मिर्झापूरकर पेटले

### रात्रीच्या अंधारात श्रमदानाची मशाल; समृद्ध पंचायतराज अभियानातून लोकचळवळीचा उद्रेक स्मशानभूमीच्या रस्त्यासाठी ग्रामवासीयांची ऐतिहासिक एकजूट

**आर्वी मिर्झापूर (नेरी) । जनमाध्यम**

कडाक्याची थंडी, रात्रीचा अंधार आणि अंग गोठवणारा गारवा पण तरीही विकासाची आस घेऊन मिर्झापूर-नेरी गावातील ग्रामस्थांनी कंबर कसली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत सुरू झालेल्या श्रमदानामुळे संपूर्ण गावात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून, हा उपक्रम आता केवळ कामापुरता न राहता लोकचळवळीचे रूप धारण करीत आहे.

ग्रामपंचायत मिर्झापूर-नेरी अंतर्गत सरपंच बाळा सोनटक्के यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम उत्सव समितीची बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत श्रमदानाच्या



माध्यमातून गावातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. त्यानंतर ग्रामउत्सव समितीच्या पुढाकारातून सुरू झालेल्या श्रमदानाला आज भव्य आणि प्रेरणादायी स्वरूप प्राप्त झाले आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचा मूळ उद्देश लोकसहभागातून विकास आणि श्रमदानातून लोकचळवळ उभारणे हाच आहे. याच धर्तीवर उपसरपंच सिद्धार्थ काळपांडे यांच्या सक्रिय सहभागातून विविध उपक्रम राबविले जात असून, त्याला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

सध्या मिर्झापूर-नेरी येथील स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचे मातीकाम व खडीकरणाचे काम पूर्णतः श्रमदानाच्या माध्यमातून सुरू आहे. विशेष म्हणजे हे श्रमदान दररोज रात्री आठ ते दहा या वेळेत, कडाक्याच्या थंडीत सुरू असते. सरपंच बाळा सोनटक्के यांनी केलेल्या भावनिक आवाहनाला प्रतिसाद देत लहानांपासून मोठ्यांपर्यंत, महिला, पुरुष, तरुण सर्वजण हातात फावडे-घमेले घेऊन कामाला लागले आहेत.

२५ डिसेंबरपासून सुरू झालेल्या या महाश्रमदानामुळे तब्बल ५०० मीटर लांबीच्या रस्त्याचे काम पूर्णत्वास जात असल्याची माहिती ग्रामपंचायत अधिकारी संजय यावले यांनी दिली आहे. विशेष म्हणजे अधिकारी यावले स्वतः दररोज या श्रमदानात सहभागी होत असून, प्रशासन आणि जनता यांच्यातील दरी मिटत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

**रोजमजुरी करूनही रात्री श्रमदान : बाळा सोनटक्के**

मिर्झापूर-नेरी हे पुनर्वसित गाव असून येथे बहुतांश कुटुंबांकडे शेती नाही. त्यामुळे गावातील नागरिक उदरनिर्वाहासाठी दिवसभर मोलमजुरी करतात. मात्र दिवसभराचा थकवा बाजूला ठेवून, रात्री आठ ते दहा या वेळेत स्मशानभूमी परिसरात श्रमदानासाठी एकत्र येणाऱ्या ग्रामस्थांचे दृश्य कोणाच्याही डोळ्यांत पाणी आणणारे आहे.

दिवसभर काम करूनही ग्रामस्थ जेव्हा रात्री श्रमदानासाठी येतात, तेव्हा अंगात नवी ऊर्जा संचारते. हा उत्साह पाहून डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहतात. हाच खरा समृद्ध पंचायतराज अभियानाचा आत्मा आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया सरपंच बाळा सोनटक्के यांनी दिली.

आज मिर्झापूर-नेरीत सुरू असलेले हे श्रमदान केवळ रस्ता बांधणीपुरते मर्यादित नसून, स्वाभिमान, एकजूट आणि विकासाची नवी वाट दाखवणारे आंदोलन बनले आहे. संपूर्ण विदर्भात या महाश्रमदानाची जोरदार चर्चा सुरू असून, मिर्झापूर-नेरी ग्रामस्थांनी इतर गावांसमोर एक आदर्श उभा केला आहे.

### मृतकाच्या टाळूवर हात साफ

# बंधन बँकेत विम्याची लूट ९ महिने मृत महिलेच्या कुटुंबाची फरफट

**सेलू । जनमाध्यम**

सामान्य कर्जदारांच्या घामाच्या पैशावर डल्ला मारणारा आणि मृत्यूशीही सौदा करणारा धक्कादायक प्रकार सेलू येथील बंधन बँकेच्या शाखेत उघडकीस आला आहे. कर्जासोबत सक्तीने उतरवलेल्या विम्याचा लाभ देण्यास तब्बल नऊ महिन्यांपासून टाळाटाळ करण्यात येत असल्याने मृत महिलेच्या नातलगांची अक्षरशः फरफट सुरू आहे. हा प्रकार म्हणजे मृतकाच्या टाळूवरील लोणी खाण्याचा नाही तर काय, असा संतप्त सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.



सेलू येथील मेघा बडे यांनी १५ जानेवारी रोजी बंधन बँकेकडून ६५ हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्ज देताना बँकेने नियमानुसार कर्जदाराचा विमा उतरवून घेतला. विमा हप्त्यापोटी १,४५० रुपये तसेच प्रोसेसिंग फी कर्जाच्या रकमेतूनच कपात करण्यात आली. उर्वरित रक्कम त्यांच्या हाती देण्यात आली होती. विशेष म्हणजे, मेघा बडे या कर्जाचे नियमित हप्तेही वेळेवर भरत होत्या.

मात्र एप्रिल महिन्यात त्यांचे आकस्मिक निधन झाले. कर्ज देताना बँकेनेच विमा उतरवून घेतल्याने मृत्यूनंतर विम्याचा लाभ मिळणे हा कायदेशीर हक्क आहे. नियमानुसार ९० दिवसांच्या आत विम्याची रक्कम लाभार्थ्यांना देणे बंधनकारक असताना प्रत्यक्षात नऊ महिने उलटून गेले तरी बँकेने एक पैसाही अदा केलेला नाही.

मृत्यूनंतर सहकार्य करण्याऐवजी बँकेने नातलगांना वाऱ्यावर सोडल्याचा आरोप करण्यात येत आहे. कधी कागदपत्रांची कमतरता, तर कधी प्रकरण प्रलंबित असल्याची सबब देत केवळ वेळकाढूपणा सुरू आहे. बँकेत 'कोणाचा जोडा कोणाच्या पायात नाही' अशी अवस्था असून, कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणा आणि बेफिकिरीमुळे कुटुंबीयांना भीषण मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

दरम्यान, बँक कर्मचारी विम्याचा लाभ देण्यास का टाळाटाळ करीत आहेत, याबाबत संशयाची सुई थेट बँकेकडे वळली आहे. विम्याची रक्कम आधीच हडपण्यात आली आहे काय, असा गंभीर प्रश्न उपस्थित होत असून, त्यामुळे बंधन बँकेचा कारभार संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. मृत महिलेच्या नावावर विमा उतरवून प्रीमियम वसूल केला आणि मृत्यूनंतर लाभ देण्यास नकार हा सरळसरळ आर्थिक लूट असल्याचा आरोप होत आहे.

या प्रकारामुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. बँक गरीब कर्जदारांसाठी आहे की त्यांची पिळवणूक करण्यासाठी, असा सवाल उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने याकडे डोळेझाक केली तर हा प्रकार इतर कर्जदारांच्या बाबतीतही घडू शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे.



**व्यवस्थापकांची उडवाउडवी, गोंधळाचा कारभार**

या प्रकरणी बँकेच्या व्यवस्थापकांनी मृतकाच्या भावाला विम्याच्या प्रक्रियेसाठी नव्याने खाते उघडण्यास सांगितले. त्यानुसार संबंधिताने खाते उघडलेही. विशेष म्हणजे ही संपूर्ण प्रक्रिया स्वतः व्यवस्थापकांनी पार पाडली. मात्र आश्चर्य म्हणजे, दोन महिने उलटून गेले तरी ते खाते अद्याप बँकेकडून सुरूच करण्यात आलेले नाही. यावरून बँकेच्या कारभारातील अराजकता आणि हलगर्जीपणा ठळकपणे समोर आला आहे.

या गंभीर प्रकाराची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच मृतकाच्या कुटुंबीयांना त्वरित विम्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे. अन्यथा बंधन बँकेविरोधात सर्व बंधने तोडत रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नातलगांनी दिला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक ३६**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# महापालिका निवडणुकीत काँग्रेस-उबाठाची आघाडी

## -राष्ट्रवारी शरद पवार गट वेगळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात युती झाली आहे. सर्वच पक्षांनी आपले उमेदवार घोषित केले आहे. काही प्रभागांमध्ये त्यांच्यामध्ये आघाडी झाली आहे. पण राष्ट्रवादी शरद पवार गट आघाडीच्या बाहेर दिसत आहे. पक्षाच्या वतीने अजून पर्यंत कोणत्याही हालचाली दिसलेल्या नाही. एकीकडे महायुतीमध्ये जागा वाटपाचा तिढा न सुटल्याने भाजपा शिंदे-सेना आणि राष्ट्रवादी वेगवेगळे निवडणूक लढत आहे. राष्ट्रवादी खोडके गटाने ८५ जागेवर उमेदवार दिले आहे. शिंदे सेनेने ७० पेक्षा अधिक जागेवर उमेदवार उभे केले आहे, तर भाजपाने युवा स्वाभिमान पार्टीला ९ जागा देऊन इतर ठिकाणी उमेदवार दिले आहे. पण या निवडणुकीत आघाडीमध्ये काँग्रेस आणि शिवसेना उबाठा एकत्र दिसत आहे. शरद पवार गटाला यामध्ये सहभागी करण्यात आले नाही. यामुळे वेगळी चर्चा रंगली आहे. माजी मंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी सांगितले की, महाआघाडीमध्ये काहीही वाद नाहा. व्यक्तिगत कारणामुळे जागा वाटपावर झालेल्या चर्चे नुसार आम्ही कार्य करत आहोत. शिवसेना उबाठाला १२ जागी देण्यात आलेल्या आहे. काही प्रभागांमध्ये आम्ही मित्रपक्ष म्हणून लढत आहो. काँग्रेस ७५ जागेवर निवडणूक लढत आहे. एक जागा संयुक्त रिपब्लिकन पार्टीला देण्यात आलेली आहे. प्रभाग क्रमांक २९ सूतगिरणी मध्ये ४ उमेदवार उबाठा ने दिले आहे. तिथे काँग्रेस त्यांना पाठिंबा देत आहे. तसेच प्रभाग क्रमांक १३ अंबापेट, प्रभाग १८ राजापेठ, प्रभाग १९ साईनगर, प्रभाग २२, नवी वस्ती बनडेरा येथे दोन्ही पक्षात २-२ जागा वाटण्यात आल्या आहे. प्रभाग ६ विलासनगर मोरबाग, प्रभाग २१ जुनी वस्ती बडनेरा मध्ये ३-३ जागेवर काँग्रेस आणि एका जागेवर शिवसेनेने उमेदवार दिले आहे. आघाडी सोबत ताकदीने आम्ही निवडणूक रिंगणात उतरलो आहोत. शरद पवार गटासोबत युतीसाठी अनिल देशमुख आणि रमेश बंग यांच्या सोबत चर्चा झाली होती. आघाडीचा प्रस्तावही होता पण स्थानिक स्तरावर उमेदवारांची यादी वेळेवर न आल्याने सहमती झाली नाही. यामुळे दोन्ही पक्षांचे उमेदवार घोषित करण्यात आले आहे, असेही डॉ.देशमुख यांनी सांगीतले.

# डॉ.भरत एन.बस्तेवाड यांची मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय, पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रियेवर प्रभावी देखरेख ठेवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने मुख्य निवडणूक निरीक्षकांच्या नेमणुकीबाबत तसेच त्यांच्या कार्यकक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दि. २९ डिसेंबर, २०२५ रोजी आदेशान्वये निर्गमित केल्या आहेत.

आगामी अमरावती महानगरपालिकेची निवडणूक अत्यंत चुरशीची होण्याची दाट शक्यता लक्षात घेऊन, निवडणूक प्रक्रियेवर काटेकोर नियंत्रण व प्रभावी देखरेख राहावी यासाठी डॉ.भरत एन. बस्तेवाड (भा.प्र.से.), आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा), नागपूर यांची अमरावती महानगरपालिकेसाठी मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भ्रमणध्वनी क्रमांक ९०८२६७००३५ असा आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २९ डिसेंबर, २०२५ च्या आदेशात नमूद केलेल्या सर्व बाबींची अंमलबजावणी करण्याबरोबरच, विशेषत्वाने आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी, निवडणूक खर्चावर नियंत्रण, आर्थिक बळाचा गैरवापर रोखणे, तसेच मतदारांवर थेट अथवा अप्रत्यक्ष प्रभाव टाकणाऱ्या वस्तू, सवलती किंवा प्रलोभनांचे वाटप रोखणे या महत्त्वाच्या बाबींवर मुख्य निवडणूक निरीक्षक विशेष लक्ष देणार आहेत. तसेच निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार, नियमभंग अथवा आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही, यासाठी संबंधित सर्व यंत्रणा, अधिकारी व कर्मचारी यांनी सतर्क राहून राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# एस.बी.खोबरागडे यांना भारतीय संविधान सम्मान राष्ट्रीय गौरव पुरस्कार

**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय संविधान वर्ष २०२५ साजरे करण्यासाठी भारतभर विविध कार्यक्रम आणि जनजागृतीच्या उपक्रमांची मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणी केली जात आहे. या उपक्रमांच्या माध्यमातून संविधानाची महती आणि त्याचे महत्व समाजात पोहोचवले जात आहे. अशाच एका कार्यक्रमाचे आयोजन भारतीय संविधान सम्मान समारोह, मौलिक अधिकार संघर्ष समिती आणि ह्युमन राईट्स असोसिएशन ऑफ इंडिया यांनी सुमठाणा, भद्रावती, जिल्हा चंद्रपूर, महाराष्ट्र येथे केले होते.

या खास कार्यक्रमात एस. बी. खोब्रागडे यांना निमंत्रित करून, २८ डिसेंबर २०२५ रोजी त्यांना भारतीय संविधान सम्मान राष्ट्रीय गौरव पुरस्कार २०२५ दिला गेला. यावेळी त्यांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



या कार्यक्रमासाठी अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते, ज्यांनी एस. बी. खोबरागडे यांच्या कार्याची आणि योगदानाची प्रशंसा केली. हा पुरस्कार भारतातील संविधानिक मूल्यांची जाणीव आणि जनजागृती करण्यासाठी असलेल्या योगदानाची दखल घेत दिला जातो. एस. बी. खोबरागडे यांचे कार्य समाजाला संविधानाच्या मूलभूत तत्त्वांचा आदर आणि पालन करण्यासाठी प्रेरणा देते.

# आपले सरकार सेवा केंद्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील रिक्त ठिकाणी आधार नोंदणी केंद्रांचे वाटप जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती मार्फत करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मान्यता प्राप्त व सुरू असलेल्या आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी यासाठी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज स्वीकृतीची तारीख दि. ३१ डिसेंबर २०२५ ते ०९ जानेवारी २०२६ ही आहे.

वलगांव, तालुका अमरावती-१, आसरा, तालुका भातकुली -१, मंगरूळ चव्हाळा, तालुका नांदगाव खंडेश्वर-१, लोणी, तालुका नांदगाव खंडेश्वर-१, घुईखेड, तालुका चांदुर रेल्वे-१, जुना धामणगांव, तालुका धामणगाव-१, वऱ्हा, तालुका तिवसा-१, हिवरखेड, तालुका मोर्शी-१, लोणी, तालुका वरूड-१, पुसला, ता. वरूड-१, बेलोरा, ता. चांदुर बाजार-१, रासेगांव, ता. अचलपूर-१, वडनेर गंगाई, ता. दर्यापूर-१, भंडारज, ता. अंजनगांव सुर्जी-१, धुलघाट, ता. धारणी-१, हरिसाल, ता. धारणी-१, गौलखेडा, ता. चिखलदरा-१, टेंब्रुसोंडा, ता. चिखलदरा-१, असे एकुण १८ नवीन आधार केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

## जाहीर नोटीस

**जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख, अमरावती**

क्रमांक/न.भू-१/अपील अर्ज क्र.२६५०/२०२४.

अमरावती
दिनांक ०४/११/२०२५

प्रति,
१. विजय माधवरावजी घोरमाडे
२. संगिता विजय घोरमाडे
रा.एकलविहीर पो.लिंगा, ता.वरुड, जि.अमरावती — अपिलार्थी

विरुध्द

१. चंद्रकला अंबादास मरसकोल्हे
२. पंचफुला सुखदेव कवडेती
३. कौसल्या रामदास धुर्वे
४. मिरा मनोहर तिडगाम
५. कांचन पंचम धुर्वे
६. अर्चना महादेव तिडगाम
७. अरुण मनोहर तिडगाम
८.सुमन विश्वनाथ सहारे
९. विजय सदाशिव ढोके
१०. राजेंद्र सदाशिव ढोके
११. विमल महादेवराव पाटील
अनु. क्र.१ ते ११ रा. एकलविहीर पो.लिंगा ता.वरुड, जि.अमरावती
१२. उपअधिक्षक भूमि अभिलेख वरुड
१३. कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, वरुड,जि.अमरावती — उत्तरार्थी

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम कलम १९६६ अंतर्गत मौजे-जेवड,ता.जि.अमरावती, शिट नं.३०, प्लॉट नं. १८१९, चे बाबत उत्तरवादी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरार्थी क्र.१ हे सुनावणी वेळी व त्यांचा संपूर्ण पत्ता नसल्यामुळे उपस्थित राहिले नाही, त्यामुळे उत्तरार्थी क्र.१ यांना याव्दारे कळविण्यात येते की, दिनांक ०२/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर राहावे. आपण वरील तारखेस सदर अपिल कामी न्यायालयासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २२/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

शिक्का

सही/-
( महेशकुमार शिंदे)
जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख, अमरावती

## जाहीर नोटीस

**जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख, अमरावती**

क्रमांक/न.भू-१/अपील अर्ज क्र.२७०५/२०२५.

अमरावती
दिनांक २२/११/२०२५

प्रति,
१. रविंद्र मारोतराव (घारड) घारपुरे
२. निलेश मारोतराव (घारड) घारपुरे
३. शांताबाई गुलाबराव घारड
अनु. क्र.१ ते ३ रा. पोरगव्हाण, पो.गणेशपुर, ता.वरुड, जि.अमरावती- ४४४९०६
४. विमल विनायक आखरे
रा.खामली,पो. सोनोली, ता.काटोल, जि.नागपूर
५. संगिता अशोक ढवंगाळे,
रा.गजानन मंदिर, डायमंड नगर, रमना मारोती जवळ, नागपूर — अपिलार्थी

विरुध्द

१. उपअधिक्षक भूमि अभिलेख वरुड,जि.अमरावती
२. मोना संजय कराळे, ३. जय राजेश कराळे
अनु. क्र.२ व ३ रा.वार्ड क्र.१६, स्टेट बॅंक ऑफ इंडिया जवळ नरखेड, ता.नरखेड, जि.नागपूर- ४४१३०४
४. राहुल मधुकरराव कराळे, ५. हर्षल मधुकरराव कराळे
६. प्रभाताई मधुकरराव कराळे
अनु. क्र.४ ते ६ रा. पोष्ट ऑफिस रोड, मोठा आरोपी देवस्थान जवळ नरखेड, ता.नरखेड, जि.नागपूर- ४४१३०४ — उत्तरार्थी

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम कलम १९६६ अंतर्गत मौजे-जेवड,ता.जि.अमरावती, शिट नं.३०, प्लॉट नं. १८१९, चे बाबत उत्तरवादी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरार्थी क्र.१ हे सुनावणी वेळी व त्यांचा संपूर्ण पत्ता नसल्यामुळे उपस्थित राहिले नाही, त्यामुळे उत्तरार्थी क्र.१ यांना याव्दारे कळविण्यात येते की, दिनांक ०२/०४/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर राहावे. आपण वरील तारखेस सदर अपिल कामी न्यायालयासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक २२/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

शिक्का

सही/-
( महेशकुमार शिंदे)
जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख, अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९३६/२०२५
**शेख -वि- निरंक**
पुढील ता.२८.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. Shaikh Anis Shaikh Mubarak, Age 55 Yrs. Occu.: Labour
2. Sharifa Bi Sheikh Ais, Age 57 Yrs. Occu.: Household
Both R/o Chilam Chavani, Sindi Bk., Amravati.
3. Firdous Jaha Shaikh Sohel, Age 31 Yrs. Occu.: Household
4. Sana Sadaf Shaikh Sohel, Age 10 Yrs. Occu.: Education
5. Shaikh Hasnain Shaikh Sohel, Age 07 Yrs. Occu.: Education
(Appli.No.3 for herself and as a natural guardian mother for Appli.No.4 & 5)
Applicant No.3 to 5 R/o University Road, Near Rehebr Kirana Chamanshahwall Camp, Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **शेख सोहेल शेख अनिस** हे दिनांक 01.04.2021 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **शेख व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शेख व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२२.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ११३
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
**वि.श्री.आर.आर.खामतकर ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - २८८४/२०२५
श्री.नंदकिशोर अधिक दोन विरुध्द निरंक
पुढील तारीख २०.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Nandkishor Namdeorao Tikhile,** Age 57 yrs., Occu.- Service
R/o. Near Express Bypass, Mangaldham Colony, Amravati
Tq. & Dist. Amravati
2. **Vimal Namdeorao Tikhile,** Age 79 yrs., Occu.- Household
R/o. Near Express Bypass, Mangaldham Colony, Amravati
Tq. & Dist. Amravati
3. **Sushama Rajeev Rathod ,** Age 48 yrs., Occu.- Household,
R/o. Behind Rathi Hostel, Gadge Nagar, Amravati
Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः- निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत नामदेवराव सुर्यभानजी तिखिले हे दि.३०.०७.२०११** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार नंदकिशोर अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री.नंदकिशोर अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १९.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जाहीर सुचना

सर्व लोकांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार **१) सौ.ललिता प्रशांतराव देशमुख, २) महेश प्रशांतराव देशमुख, ३) ऋतुजा प्रशांतराव देशमुख** नं.१ ते ३ यांचे पत्ता - प्लॉट नं.५, केशर कॉलनी नं.१, नवीन अमरावती रेल्वे स्टेशनजवळ, अमरावती, ता.जि.अमरावती, **४) सौ.पल्लवी गौरव देशमुख,** पत्ता - चांदूरबाजार, ता.चांदूर बाजार जि.अमरावती यांनी **सौ.कविता भिमराव भेंडारकर** रा.नांदगांव खंडेश्वर, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती विरुध्द वि.३ रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अमरावती येथे न्यायालयीन प्रकरण **विशेष दिवाणी दावा क.१८/२०२५** खालील वर्णन केलेली मालमत्ताबाबत दाखल केलेले असून त्या संपूर्ण मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मालमत्तेचे वर्णन** - मौजा मुंडगांव, ता.नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती येथे असलेले शेती गट नं./सर्व्हे नं.६/३, एकुण जमीन ०.७५ + ०.१२ हेक्टर, जमिनीचा कर रु.१०.०४ खालीलप्रमाणे क्षेत्र आणि वर्णनानुसार सीमा असलेले- पुर्वेला - श्री.वैद्य यांचे शेत, पश्चिमेला - तमीज भाई यांचे शेत, दक्षिणेला - उडबंगले यांचे शेत, उत्तरेला - रस्ता.

सदर वर्णन केलेल्या मालमत्तेबद्दल कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार यांच्यासोबत किंवा त्यांच्यातर्फे कोणीही हक्क, अधिकार सांगणाऱ्या सोबत करु नये व तसे केल्यास सदर व्यवहार न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून ते प्रलंबित वाद (Lis-Pendense) तत्वाच्या अधिन राहील व ते मालमत्ता हस्तांतरण अधिनियम, १८८२ च्या कलम ५२ प्रमाणे आरंभतः शून्य राहून माझे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक २६.१२.२०२५

**(ॲड.प्रशांत विजयराव देशमुख)**
खापर्डे बगीचा, अमरावती
मो.नं.९३७०१०७९०५

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२९८१/२०२५
**प्रमिला व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०५.०२.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. Pramila Rameshrao Wankhade, Age 59 Yrs. Occu.: Business
2. Nitesh Rameshrao Wankhade, Age 35 Yrs. Occu.: Job
3. Ankush Rameshrao Wankhade, Age 31 Yrs. Occu.: Job
Above 1 to 3 R/o Rail Nagar, Durgapur Road, Navi Vasti Badnera
4. Vrushali Rameshrao Wankhade (Vrushali Pravin Kirakte)
Age 33 Yrs. Occu.: Household
R/o Ward No.3, Po.Chincholi Kale, Tq.Chandur Bazar, Dist.Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **रमेशराव डोमाजी वानखडे** हे दिनांक 04.07.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **प्रमिला व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रमिला व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२२.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## DHAMANGAON EDUCATION SOCIETY'S

**SAU. DHAPUDEVI BHATTAD ENGLISH MEDIUM PRE-PRIMARY SCHOOL & ENGLISH MEDIUM PRIMARY SCHOOL, DHAMANGAON RLY DIST. AMRAVATI**

**REQUIRED**

| S. No. | Post | No. of Post | Edu. Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary School Teacher | 2 | HSC, Montessori Trained, who can speak & write English Fluently & Correctly |

Candidate should appear for the interview with application and all necessary documents on **Dt. 03/01/2026 at 3.30 P.M. at Ramchand Bhagchand Sanskrit Vidyalaya, Shastri Chowk, Dhamangaon Rly** at their own cost.
Salary will be no bar for deserving candidate.

s/d
Head Master
English Medium Primary School
Dhamangaon Rly

## जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जाचा नमुना

**प्रति,**
निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत **घाटलाडकी,**
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**विषय** - **जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**अर्जदाराचे नांव** - नियाज खॉं, रा.घाटलाडकी
मोबाईल नंबर - ९९६०७०३५२४

मा.महोदय,

वरील विषयान्वचये सविनय अर्ज सादर करतो/करते की, माझा नामे **नांव स्वतः नियाजखॉं उस्मानखॉं** यांचा जन्म ग्रामपंचायत **घाटलाडकी** कार्यक्षेत्रातील **घाटलाडकी** या गावी दिनांक **१६.०५.१९७४** रोजी झालेला आहे.

सदरील जन्म घटनेची नोंद आपल्या ग्रामपंचायतीला झालेली नाही. तसेच इतर कुठल्याही निबंधकाकडे केलेली नाही. सदरील जन्म विलंब नोंदणी करण्यासाठीचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून आणण्यासाठी मला जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दि.१२ मार्च २०२५ नुसार आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सादर जोडलेले आहेत. जोडण्यात आलेले कागदपत्रे व माहिती सत्य असल्याबाबत मी खात्री देत असून चुकीचे आढळून आल्यास माझ्यावर कायदेशीर कार्यवाही होण्यास मी पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

करीता मला जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, ही विनंती.

शिक्का

अर्जदाराची स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा
(**नियाजखॉं उस्मानखॉं**)

## जाहीर सुचना

सर्वत्र लोकांचा सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे **संदीप पांडुरंग ताटेवार व अनुज अनिल तुंडुलवार दोघेही रा. अमरावती** यांनी **श्री प्रदीप पुंडलिकराव किर्तकार, रा.राठी नगर मागे, श्रीराम नगर, अमरावती व श्री श्रीकांत श्रावणजी मकेश्वर,रा.शिवमंदिर जवळ, संमती कॉलनी अमरावती** यांच्याशी त्यांनी दिनांक २७/०५/२०२४ रोजी दस्त क्र.१८१०/२०२४ नुसार खरेदी केलेली व त्यांच्या सामाईक मालकीची व ताब्यातील खालील वर्णित स्थावर मालमत्ता (शेतजमीन) विकत घेण्याचा सौदा कायम करीत आहे. स्थावर मालमत्ता (शेतजमीनीचे) वर्णन ः- नोंदणी पोट तुकडी व पोट तुकडी चांदूरबाजार ग्रामीण विभाग कचेरीचे कक्षेतील व अमरावती जिप चे हददीतील मौजे वाठोंडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील भूमापन क्र. उपविभाग क्र.१३/२, एकुण क्षेत्र.१ हे.६३ आर शेतजमिन यापैकी सामाईक मालकीची व ताब्यातील शेतजमीन क्षेत्रफळ ० हे.८१ आर, भो.वर्ग-१, खाते क्र.४६७, आकारणी रु. ५.०९ पै.आहे व यातील इतर झाडाझुडपांसह व तदंगभूत वस्तूंसह, **सदर शेतजमीनीची चर्तुःसिमा - पुर्वेस - ज्ञानदेव गोमाजी बैले यांचे शेत, पश्चिमेस - जावरकर यांचे शेत, उत्तरेस -शिव रस्ता, दक्षिणेस -यशवंतराव गोमाजी बेले यांचे शेत.**

त्याअर्थी वरील वर्णित मालमत्तेबाबत कोणाचाही गहाण,बोजा, तारण, सावकारी व्यवहार, वारसाहक्क व इतर अधिकार जे कायदेशिररित्या अडथळा करतील असे व्यवहार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यासह कळवावे, अन्यथा कोणालाही कुठल्याही प्रकारची हरकत/तक्रार नाही असे समजून सौदा करण्यात येईल व त्यानंतर वरील सर्व प्रकारचे व्यवहार आमच्यावर बंधनकारक राहणार नाही. तथा आमचे पक्षकार सदर मिळकतीचे खरेदीखत करुन घेतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा कसलाही उजर/अधिकार/हक्क/तक्रार इत्यादी चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

करिता हि नोटीस जाहीर करत आहे.

**दिनांक - ३०.१२.२०२५**
**ठिकाण - अमरावती**

**सही/-**
**ॲड.निलेश ज.पुंड**
**१०२ गजानन अपार्टमेंट, मोहन कॉलनी, अर्जुन नगर, अमरावती.**

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १५.१२.२०२५

आज दि.१५.१२.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **साजेदा परवीन उस्मान खॉं** अर्जात नमूद जन्म दिनांक **१०.०७.१९८५** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत घाटलाडकी**

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १५.१२.२०२५

आज दि.१५.१२.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **तमिजा बी शे.फारुक** अर्जात नमूद जन्म दिनांक **०९.०७.१९७२** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत घाटलाडकी**

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक १५.१२.२०२५

आज दि.१५.१२.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **युसूफखॉं उस्मानखॉं** अर्जात नमूद जन्म दिनांक **११.०७.१९६५** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत घाटलाडकी**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
**वि.श्री.आर.आर.खामतकर ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज - २९२९/२०२५
श्रीमती आशा अधिक दोन विरुध्द निरंक
पुढील तारीख २२.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :
1. **Asha Ashok Telang,** Age 63 yrs., Occu.- Housewife
2. **Dattaraj Ashok Telang,** Age 40 yrs., Occu.- Service
Applicant No.1 & 2 both
R/o. Hanuman Mandir Jawal, Ravi Nagar, Amravati,
Tq. & Dist. Amravati
3. **Shraddha Prasad Baporikar ,** Age 36 yrs., Occu.- Housewife
R/o. Shubhankar Durva Flat No. 604. Viman Building Javal, Munjabawasti, Po. Dighi Camp, Pune City, Pune (M.S.)

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः- निरंक

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत अशोक केशवराव तेलंग हे दि.०४.११.२०२५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार आशा अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती आशा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २३.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## संक्षिप्त



### संकल्पसखी परिवारातर्फे महीला उद्योजक प्रदर्शनाचे आयोजन

**अमरावती :** संकल्पसखी परिवारातर्फे कायम महीला उद्योजक सखींना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी म्हणून प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. नविन वर्ष व संक्रांत निमित्ताने रंगोली लॉन्स कठोरा नाका अमरावती येथे २,३ आणि ४ जानेवारीला संकल्पसखी परिवारातर्फे प्रदर्शनीचं आयोजन करण्यात येत आहे. वैविध्यपूर्ण स्टॉल असलेली ही प्रदर्शनी कायम अमरावतीकरांच्या आकर्षनाचे केंद्र ठरते आहे. घरासाठी लागणारे विविध वस्तूंचे प्रदर्शन एकाच छताखाली पहायला मिळत असल्याने ही प्रदर्शनी विशेष ठरते. विविध स्पर्धा, प्रशिक्षणाचे पण आयोजन ईथे सखीं साठी करण्यात येते. लकी ड्रॉ व प्रत्येक व्हीजीटर्स ला हमखास आकर्षक भेटवस्तू ही येथे देण्यात येणार आहे. महीला उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी शहरवासीयांनी या प्रदर्शनी ला अवश्य भेट द्यावी म्हणून संकल्पसखी च्या संचालिका सौ. पूनम अमोल पाटील गोमासे यांनी शहरवासीयांना आवाहन केले आहे. तसेच अधिक माहिती साठी ९८६०३४२६३५ या नंबरवर संपर्क करावा.

### विभागस्तरीय वाद्यवादन स्पर्धेत प्रशांत दुधे प्रथम

**अमरावती** -राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,



पुणेच्या वतीने शिक्षकांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात तीन स्तरावर विविध स्पर्धा घेण्यात येत आहे. त्यामध्ये विभागीय स्तरावरील वाद्यवादन स्पर्धा संचालक शिक्षण व प्रशिक्षण केंद्र, अमरावती येथे झाली. त्यात पाचही जिल्ह्यांतील स्वर व ताल वादकांनी सहभाग घेतला. डाएटचे प्राचार्य पवन मानकर यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आलेल्या वाद्यवादन स्पर्धेत गांधी विद्यालय, बडनेरा येथील शिक्षक प्रशांत दुधे यांना उत्कृष्ट तबला वादन सादर करून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. त्यांना लहरा संगत राहुल बलखंडे यांनी दिली. द्वितीय क्रमांक जितेश रापर्तीवार, दर्यापूर यांना तर तृतीय प्रमोद भगत, वाशिम यांना प्राप्त झाला. स्पर्धेचे परीक्षण संगीत विशारद श्रीकांत काळे, सारंग पेंडसे व गोकुळदास मेहरे यांनी केले. या स्पर्धेत प्रथम आलेल्या प्रशांत दुधे यांची जानेवारी २०२६ मध्ये सांगली येथे होणाऱ्या राज्यस्तरीय संगीत वाद्य स्पर्धेकरिता निवड करण्यात आली आहे. न्यू एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉक्टर हेमंत देव, उपाध्यक्ष राजेश टारपे, उपाध्यक्ष ॲड. आनंदराव इंगोले, सभापती रामेश्वर लाड, गांधी विद्यालयाच्या प्राचार्या सौ. वंदना टिक्कस, पर्यवेक्षक दिगंबर करडे तसेच सर्व शिक्षक-शिक्षिकांनी प्रशांत दुधे यांचे अभिनंदन केले असून राज्यस्तरीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्यात.

### मंगेश चव्हाण यांचे नेत्रदान

**अमरावती** -मु. सावंगा (मेध), ता. मूर्तिजापूर, जिल्हा अकोला येथील रहिवासी मंगेश दशरथ चव्हाण (वय ३७) यांचे निधन झाले. कुटूंबातील व्यक्तीच्या निधनामुळे कुटूंबियांना दुःख होणे स्वाभाविक असते. चव्हाण परिवारावर सुद्धा दुःखाचा डोंगर कोसळले परंतु अशाही परिस्तितीत गरजूंना या जगातील रंग पाहता येतील या उद्दात भावनेने चव्हाण परिवाराच्या सदस्यांनी स्व. श्री. मंगेश दशरथ चव्हाण यांचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. यासाठी त्यांनी अमरावती मधील दिशा ग्रुप व दिशा एज्युकेशन फाऊंडेशन द्वारा संचालित दिशा इंटरनॅशनल आय बँक या धर्मदाय नेत्रपेढीला संपर्क केला. दिशा ग्रुपचे सचिव स्वप्निल गावंडे, डॉ. अंकित हरवानी, हिमांशू बंड, अनिल देशमुख यांनी प्रक्रिया पूर्ण केली.

## संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**चांदुर रेल्वे**-स्थानिक राजर्षी शाहू सायन्स कॉलेज मधील कला, संगीत व सांस्कृतिक समितीद्वारे महान समाजसुधारक संत गाडगे बाबा यांच्या ६९ व्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. सदर समितीच्या वतीने संत गाडगेबाबा यांचे विचार तसेच समाजासाठी केलेले महत्त्वपूर्ण कार्य यांचे धडे विद्यार्थ्यांना कळावे यासाठी या अनुषंगाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. राजर्षी शाहू विज्ञान व अतुल जगताप कला कनिष्ठ महाविद्यालय व स्वर्गीय अतुल जगताप माध्यमिक महाविद्यालय मधील विद्यार्थ्यांसाठी संत गाडगेबाबा यांच्या जीवनावर व तसेच त्यांच्या कार्यावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यक्रमाद्वारे प्रत्येकाच्या मनात थोर महान पुरुष संत गाडगेबाबा यांच्या जीवनाचे महत्त्व पोहोचले पाहिजे या उद्देशाने निबंध व वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय डॉ. पराग वडनेरकर, तसेच स्वर्गीय अतुल जगताप माध्यमिक महाविद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा. प्रदीप तळोकार तसेच राजश्री शाहू इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका भगत, आयक्यूएसी समन्वयक प्रा. एस. ए. वाणी तसेच कला संगीत व सांस्कृतिक समितीच्या समन्वयक प्रा.डॉ.एम जे. केचे उपस्थित होते. अध्यक्षांनी आपल्या भाषणात गाडगेबाबांनी त्यांच्या जीवनात केलेल्या सामाजिक कार्याचे सखोल आणि अनमोल अशी माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच वेशभूषा स्पर्धेला परिषद म्हणून प्रा. डॉ.भगत आणि प्रा. ममता पळसपगार परीक्षक म्हणून लाभल्या. सदर कार्यक्रमाला डॉ. केचे, सह समन्वयक डॉ. पाचकवडे यांनी परिश्रम घेतले.

## उबाठाचे पश्चिम विदर्भाचे संपर्कप्रमुख सागर देशमुखांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

# जमिनीवर संघटनात्मक जाळे असलेल्या कार्यकर्त्यांची फळी घेऊन पक्षाची आगेकूच

**अमरावती/का.प्र.**

मुंबईसह राज्यातील २९ महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय चित्र अधिक गुंतागुंतीचे होत चाललेले आहे. शहर नियोजनासाठी सक्षम असणारा पक्ष अशी ओळख निर्माण करीत आमदार -सुलभा खोडके व आमदार - संजय खोडके यांनी विजयासाठी संघटनेचा पाया मजबूत असावा लागतो ही बाब लक्षात घेऊन सक्षम यंत्रणा, जमिनीवर संघटनात्मक जाळे असलेली कार्यकर्त्यांची फळी उभारीत मतदारांना विकासाबद्दल खरा विश्वास देत आपले लक्ष सर्वासामान्यांचे हीत जोपासण्यावर अधिकाधिक भर दिल्याचे चित्र दिसून येत आहे. लोकशाही, धर्मानिरपेक्षता, सामाजिक न्याय आणि समानतेची मूल्ये बळकट करीत सर्व घटकांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत जोडून आता लढायचे ते जिंकण्यासाठीच हा संकल्प घेऊन आमदार - सुलभा संजय खोडके यांनी संघर्षाची दिशा स्पष्ट केली आहे. अशातच सोमवार २९ डिसेंबर रोजी प्रभाग क्रमांक - १९ साईनगर - अकोली येथील जयप्रभा कॉलनी परिसर स्थित शिवसेना (उबाठा) प्रणित पश्चिम विदर्भाचे संपर्क प्रमुख -सागर



प्रमोद देशमुख यांनी आपल्या असंख्य सहकारी कार्यकर्त्यांसोबत आमदार-सुलभा संजय खोडके यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. आमदार - सुलभा खोडके यांचा कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य माणसासोबत असलेला ताळमेळ आणि सामंजस्य यासोबतच आमदार-सुलभा खोडके व आमदार-संजय खोडके यांनी आपापल्या भूमिका वाटून घेत त्या कामाला पूर्णवेळ जुम्पून घेण्याची क्षमता आणि सातत्य, संघटनशक्तीच्या जोरावर' सर्वांनाच समान संधी - समान न्याय' ही भूमिका अवलंबील्याने आपण प्रभावीत होऊन आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला आहे. या शब्दसुमनांनी सागर प्रमोद देशमुख यांनी आपल्या भावना व्यक्त केल्यात. यावेळी आमदार - सुलभा खोडके व यश खोडके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दुपट्टा देऊन सागर प्रमोद देशमुख यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेश क्षणी स्वागत केले. याप्रसंगी यश खोडके यांच्या समवेत अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात कार्यकर्त्यांना लाभणारी सन्मानजनक वागणूक, जनकल्याणाचा ध्यास, दररोज नवनवीन घडामोडी होत असताना ज्येष्ठ नागरिकांचे ऊर्जादायी आशीर्वाद, महिला भगिनींची अखंडित साथ, युवक - युवतींची समर्थ साथ,कार्यकर्त्यांचे एकसंध जाळे,वंचित व दिव्यांग घटकांच्या हीतसंरक्षण सदैव जोपासण्याची कटीबद्धता,निर्णयक्षमतेतून लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी याकरिता आमदार - सुलभा खोडके यांची जागरूक भूमिका व कार्यप्रणाली लक्षात घेता, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात इनकमिंगची ही मालिका अखंडित सुरु राहणार हे मात्र नक्कीच दिसून येत आहे.

## शेंदुरर्जना माहोरा येथे क्रिकेट सामन्यांचा थरार सुरू

**कुऱ्हा/का.प्र.**

शेंदूर्जना माहोरा येथे शिव जयंती उत्सव समिती आणि विजयतीलक क्रिकेट क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने स्व.गौरव दि. माहोरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ भव्य प्लास्टिक बॉल क्रिकेटच्या खुल्या सामन्यांना वीजयतिलक क्रिकेट ग्राऊंडवर आजपासून सुरुवात झाली.



खेळवल्या जाणाऱ्या या टुर्नामेंटच्या अंती एक विजेत्या आणि दोन उपविजेत्या संघांना अनुक्रमे २१,०००, १५,००० आणि १०,००० अशी भरघोस बक्षिसे मिळणार असून वयक्तिक पुरस्कार सुद्धा यात असणार आहेत. प्रथम बक्षिस हे मंत्री तथा तिवसा तालुक्याच्या यशस्वी आणि कार्य सम्राट माजी आमदार यशोमती ठाकूर यांच्या तर्फे द्वितीय बक्षिस शिवसेनेच्या विभागीय महिला संघटक असावरी देशमुख व शिवसेना तिवसा तालुका प्रमुख दिलीप केणे यांचे संयुक्तपणे तर तृतीय बक्षिस हे शिवसेना तिवसा विधानसभा संघटक आणि पं.स. सभापती विलास माहूरे यांच्या वतीने दिली जाणार आहेत कालांतराने या गावातील क्रिकेटची परंपरा लोप पावत चालली होती पण विलास माहूरे यांच्या पुढाकाराने क्रिकेट परत गावात खेळवल जात आहे आणि याच संपूर्ण परिसरातून स्वागत होत आहे. या सामन्यांच्या उद्घाटन प्रसंगी आसावरी देशमुख, विलास माहूरे, दिलीप केने, क्रिकेट क्लबचे अध्यक्ष आदित्य माहुरे, सरपंच आशिष माहुरे, सरपंच कल्पना पाचघरे, सर्कल प्रमुख शरद इंगळे, उपसरपंच देवेंद्र आमले, जानरावजी मनवरे, आकाश माहुरे संचालक खविस. तिवासा, ग्रा. प. सदस्य रवी माहुरे, धनराज मनवरे, तुषार मोरे, मोहित मंजुरकर, मोहन देवतारे, तेजस मोरे, चैतन्य भोयर, विशाल स्वर्गे, अक्षय उरकडे, नितीन मनवरे, सम्यक मनवरे, मोहित मोरे, भूषण मोरे, प्लेअर निलेश माहुरे, प्रज्वल माहुरे शुभम माहुरे, अमोल कुबळे, प्रणय भोयर, गौरव हरणे, सोबतच मंडळाचे कार्यकर्ते व मोठ्या संख्येने गावातील क्रिकेट प्रेमी मंडळी उपस्थित होत.

## पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात माजी विद्यार्थी संमेलन



**अमरावती**-पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, अमरावती येथे नुकतेच माजी विद्यार्थी संमेलन २०२५ मोठ्या उत्साहात पार पडले. या संमेलनास अभियांत्रिकी, एमबीए व एमसीए विभागातील विविध वर्षातील नामांकित कंपन्यांमध्ये कार्यरत असणारे माजी विद्यार्थी, व्यावसायिक तसेच उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष श्रेयशदादा पोटे पाटील होते. प्रमुख पाहुणे म्हणून संचालक डॉ. पी. एम. खोडके तर प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत, त्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचे असलेले मोलाचे योगदान अधोरेखित केले. संमेलनादरम्यान माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या विविध विभागांना भेटी दिल्या.

# कै.सुरेंद्र देशमुख विद्यालयात माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

**लेहेगाव/वार्ताहर**

कै. सुरेंद्र देशमुख विद्यालय विचोरी ता. मोर्शी येथे २८ वर्षानंतर पुन्हा शाळा भरवण्यात आली १९९६-६७ च्या सर्व वर्ग दहाच्या विद्यार्थी विद्यार्थिनी २८ डिसेंबर रोजी स्नेह-संमेलनाचा कर्यक्रम आयोजित केला होता याप्रसंगी प्रसंगी सर्वप्रथम कै.सुरेंद्र देशमुख विद्यालय विचोरीचे मुख्याध्यापक राऊत, आर. एम. भस्मे व समीक्षा ठाकरे, श्रीमती गिरकुणजे व सर्व विद्यमान शिक्षक वृंदांनी माजी विद्यार्थ्यांचे औक्षण करून बँड पथकाने स्वागत करत



कार्यक्रम स्थळी नेले तर नंतर दीप प्रज्वलन व सरस्वती पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली तर नंतर स्वर्गवासी गुरुजनांना व वर्ग मित्रांना श्रद्धांजली देऊन मौन पाडण्यात आले. याप्रसंगी शाळेचे विद्यमान मुख्याध्यापक श्री. राऊत यांनी अध्यक्षस्थान भूषविले कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून सेवानिवृत्त. शिक्षक आसोलकर, आर. एम. भस्मे शिक्षक हे उपस्थित होते तसेच मेश्राम, गिरीकुंदे, समीक्षा ठाकरे शिक्षक, अखिल भारतीय मोर्शी ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष-कैलास ठाकूर, मोर्शी तालुका प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष : निलेश टारपे, संजय जावरकर पत्रकार हे प्रमुख पाहुणे उपस्थित होते. तदनंतर माजी विद्यार्थ्यांनी शाळेसोबत आपल्या मित्र परिवार सोबत असलेल्या जुन्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केल. अध्यक्ष भाषणाने मार्गदर्शनचा कार्यक्रम आटपून सर्वांनी स्नेह भोजनाचा आनंद घेतला खूपच खेळीमेळीचे वातावरणात गुरुजनांसोबत स्नेहभोजन करतान विद्यार्थी वेगळाच आनंद अनुभवत होते. भोजना नंतर आपल्या जुन्या वर्ग खोलीत बसून विद्यार्थी असल्याचा अनुभव घेतला तसेच आपसात चर्चा करून ज्या शाळेने आपल्याला घडविले जीवनाचे धडे गिरवण्यास मदत केली अशा शाळेपती कृतज्ञ होऊन आपल्याला काहीतरी शाळेचे दिने लागते म्हणून मान्य मुख्याध्यापकांना काहीतरी शाळेप्रती करण्याची अभिलाषा व्यक्त केली हे सगळं करत असताना विद्यार्थ्यांचा तोच निरागस चेहरा बघण्यास मिळाला नंतर आभार प्रदर्शन करून राष्ट्रवंदना ने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन हे निलेश ग. वांगे, शे. आरिफ. शे. सौदागर, शितल ठाकरे राऊत, निलिमा ढोंगे, प्रफुल धामणकर, महेंद शिनकर, भूपेश भाजीखाये, शे. मुस्ताक सौदागर, अमित तायवाडे, योगेश शेंडे, नंदकिशोर भट्टड, प्रशांत ढोंगे, सुभाष बागडे, सचिन खरबडे, विजय गोंडेकर तसेच सर्व वर्ग दहावीचे मित्र-मैत्रिणीनी केले होते.

## तालुकास्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव शुक्रवारपासून

### ३०० विद्यार्थ्यासह अनेक खेळाडू, क्रीडा शिक्षक सहभागी होणार

**अमरावती/का.प्र.**

शालेय जीवनात विद्यार्थ्यांमधील खेळ व कला गुणांना वाव मिळावा या हेतूने पंचायत समिती, भातकुली अंतर्गत तालुका स्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन २ व ३ जानेवारी, २०२६ रोजी जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक उर्दू शाळा, भातकुली येथे करण्यात आले आहे. या शालेय प्राथमिक क्रीडा महोत्सवात तालुक्यातील भातकुली,खारतळेगाव आणि टाकरखेडा बिट मधिल ३००विद्यार्थी,क्रीडा शिक्षक सहभागी होणार आहे.

या क्रीडा महोत्सवाचे उद् घाटन शुक्रवार २जानेवारीला सकाळी ११ वाजता बडनेरा मतदार संघाचे आमदार रविभाऊ राणा यांच्या हस्ते होणार असुन कार्यक्रमाचे अध्यक्ष तिवसा मतदार संघाचे आमदार राजेश वानखडे राहणार आहे. विशेष अतिथी भातकुली नगर पंचायतच्या नगराध्यक्षा योगिता कोलटेके, उपनगराध्यक्ष प्रतिक



कांडलकर,गटविकास अधिकारी तुषार दांडगे, तहसिलदार अक्षय मंडवे, सहा.गटविकास अधिकारी प्रविण वानखडे, गटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे, प्रमुख अतिथी शिक्षण विस्तार अधिकारी संतोष घुगे, पंजाबराव पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मो.सादिक अख्तर अ.रशिद, दिनेश खेडकर, पल्लवी काळे, उमेश आळे उपस्थित राहणार आहे.

या दोन दिवसीय क्रीडा महोत्सवात प्राथमिक विभागामध्ये विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले आहे.

भातकुली तालुका स्तरीय प्राथमिक शालेय क्रीडा महोत्सवाचा बक्षिस वितरण व समारोप समारंभ शनिवार ३जानेवारीला दुपारी ३ वाजता भातकुली पंचायत समितीचे गटविकास अधिकारी तुषार दांडगे यांच्या अध्यक्षेत बक्षिस वितरक गटशिक्षणाधिकारी रामेश्वर माळवे यांच्या हस्ते प्रमुख अतिथी प्राचार्या श्रीमती अर्चना चेचरे, श्रीमती मिनाक्षी वाचासुंदर, अधिक्षक मुरलीधर लांडे, मुख्याध्यापक प्रविण जायदे, रज्जब शाह रहमान शाह यांच्या उपस्थितीत होणार आहे. विद्यार्थी खेळाडू व सहभागी स्पर्धकांचा आनंद व्दिगुणित करण्याकरीता उपस्थितीत राहण्याचे आवाहन केंद्रप्रमुख राजेंद्र नकाशे,जानराव सुलताने,श्रीमती निता सोमवंशी,मिलिंद रघुवंशी,उमेश चुनकीकर,नरेंद्र धनस्कर, रविद्र धरमठोक, शैलेंद्र दहातोंडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, यदस्य, तालुका शिक्षक संघटना पदाधिकारी, सर्व मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका विशेष शिक्षक व विषय साधन व्यक्ती शिक्षण विभाग पंचायत समिती भातकुली यांनी केले आहे.

## अतुल ठाकरे यांना आचार्य पदवी

**चांदूर रेल्वे** - शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथील प्राचार्य अतुल ठाकरे यांना विद्यापीठाने जाहीर केलेल्या अधिसूचनेनुसार आचार्य (पीएचडी) ही मान्यताप्राप्त पदवी प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशामुळे शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक तसेच बौद्धिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या संशोधनाचा विषय 'महाराष्ट्रातील माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत डिजिटल शिक्षण आणि कृतियुक्त शिक्षण यातील परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास' असा होता. या उत्तुंग यशाबद्दल शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन



देशमुख, उपाध्यक्ष गजानन पुंडकर, कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी, शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, संस्थेतील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, नातेवाईक व मित्रपरिवार यांनी अभिनंदन केले आहे. या यशामागे आई नलिनी भुजंगराव ठाकरे, सासरे मनोहरराव इंगोले, पत्नी अर्चना ठाकरे तसेच मार्गदर्शक प्रा. संजय खडसे व डॉ. सिकंदर मनवरे यांचे प्रेरणादायी सहकार्य व मोलाचे मार्गदर्शन लाभले असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# मधमाशी पालन प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांना उद्योजकतेचा मंत्र

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथे खादी आणि ग्रामोद्योग आयोग व केंद्रीय मधमाशी प्रशिक्षण व संशोधन संस्थेच्या वतीने ५ दिवसीय मधुमक्षिका पालन प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. संस्थेचे तज्ञ प्रशिक्षक प्रा. हेमंतकुमार तुकाराम डुंबरे यांनी प्रशिक्षणार्थीना मधमाशांची ओळख, त्यांच्या प्रजाती, मधमाशांच्या पेट्यांचे निरीक्षण करणे, पेट्या हाताळताना घ्यावयाची काळजी, पेट्यांची संख्या वाढवणे, मधमाशी पालन व्यवसाय सुरू करण्यासाठी चे विविध टप्पे इत्यादी विषयांवर विविध सत्रांमध्ये विस्तृत माहिती देऊन सातेरी मधमाशी व डंखरहित मधमाशी हाताळण्याचे प्रात्यक्षिक देखील घेण्यात आले.

पेटीमध्ये नवीन मेणाचे शीट बनवून लावणे, हंगामानुसार पेट्यांचे नियोजन, मध काढणे, शुद्ध आणि अशुद्ध मध ओळखणे, मधाव्यतिरिक्त मिळणारी उत्पादने, मेण, परागकण, रॉयल जेली,





मधमाशीचे विष, प्रोपोलीस इ. गोळा करण्याची पद्धत या बाबी प्रात्यक्षिकांसह विद्यार्थ्यांना दाखविण्यात आल्या. मधमाशांना आवश्यक फुलांचे अर्थात बी पार्कचे शेतामध्ये नियोजन करणे मधमाशी पालनामध्ये याबाबत देखील प्रा. डुंबरे यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी व युवा उद्योजिका अनुजा भगत हिने सुद्धा आपल्या योगिक ब्रांड या मध उत्पादन व्यवसायाबद्दल विद्यार्थ्यांसोबत अनुभवकथन केले. शेतीला जोडधंदा म्हणून मधमाशी पालन उद्योग सुरु करण्यासाठी असलेल्या संधी, सरकारच्या विविध योजना, कर्जाची उपलब्धता आदी विषयही समजावून देण्यात आला. प्रशिक्षणात सहभागी ९५ विद्यार्थ्यांना व १५ शेतकरी बांधवाना केंद्रीय मधमाशी संशोधन संस्था, पुणे च्या वतीने परीक्षा घेऊन प्रमाणपत्रे देण्यात आली यावेळी सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी मधमाशी संवर्धन करण्याची प्रतिज्ञा घेतली.सदर प्रशिक्षणाचे आयोजन व व्यवस्थापनाची जबाबदारी कीटकशास्त्र विभागाच्या प्रा.प्राप्ती दंदे यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल ठाकरे व उपप्राचार्य प्रा.नितेश चौधरी यांच्या मार्गदर्शनात पार पाडली.

बुधवार ३१ डिसेंबर २०२५
E-paper - www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# ८७ जागांसाठी ७१५ उमेदवारांनी दाखल केले नामांकन

## शेवटच्या दिवशी अर्ज भरण्यासाठी उसळली गर्दी





**नामांकनाची स्थिती**

उत्तर झोन १ रामपुरी कॅम्प-१२७
नवी तहसील २ कार्यालय -१०४
मध्य झोन ३ राजापेठ-९०
पूर्व झोन ४ दस्तूर नगर-१४९
शिक्षण विभाग अंबापेठ-९२
जुनीं तहसील कार्यालय-४३
दक्षिण झोन बडनेरा-११०
एकूण -७१५




**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. नामांकन दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी आज मंगळवार ३० डिसेंबरच्या सायंकाळपर्यंत ७१५ उमेदवारांनी अर्ज दाखल केले. शेवटच्या दिवशी नामांकन दाखल करण्यासाठी ☞(पान २ वर)

# भाजप, शिवसेना, काँग्रेसने घोषित केले उमेदवार

## महानगरपालिका निवडणुकीसाठी राजकीय पक्षांची मोर्चे बांधणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगर पालिकेसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी राजकीय पक्ष सज्ज झाल आहे. नामांकन दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी आज जवळपास सर्वच पक्षांच्या वतीने उमेदवारांची नावे घोषित केली आहे. त्यामुळे आता निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. ज्यांना तिकीट नाही मिळाली त्यांनी बंडखोरी करत दुसऱ्या पक्षाचा हाथ पकडला आहे. निवडणुकीची प्रतीक्षा करणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी निवडणुकीत उतरण्यासाठी भरपूर प्रयत्न केले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज सोमवार ३० डिसेंबर रोजी भाजपा, शिंदे सेना, काँग्रेस व राष्ट्रवादीच्या वतीने उमेदवारांची अधिकृत यादि घोषित केली आहे. सर्वच पक्षांनी माजी नवसेवकांना पुन्हा संधी दिली आहे. तसेच युवा मतदार व नवीन उमेदवारांना पण संधी देण्यात आली आहे. उमेदवारांची यादी घोषित झाल्यावर आता निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. भाजपाने या निवडणुकीत २७ माजी नगरसेवकांना पुन्हा संधी दिली आहे.

**शिंदे सेनेचे ७० उमेदवार रिंगणात-**

प्रभाग क्रमांक १ शेगांव-रहाटगांव- रेणुका प्रमोद खंडारे, नंदा किशोर वाट, पूजा मुले, अंकूश कडू.

प्रभाग क्रमांक २ संत गाडगेबाबा पीडीएमसी- सचिन गणेशराव ☞(पान २ वर)

# शिंदे सेनेत तिकीट वाटपावरून गोंधळ

## एबी फॉर्म न मिळाल्याने कार्यकर्त्यांमध्ये धक्काबुक्की



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावतीमध्ये भाजपा-सेना युती तुटली आहे. जागा वाटपाचा तिढा न सुटल्याने शिंदे सेनेने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला. पक्षाच्यावतीने ७० पेक्षा अधिक जागेवर उमेदवार दिलेले आहे, तर भाजपा ,युवा स्वाभिमान सोबत रिंगणात आहे. स्वाभिमानला ९ जागा भाजपाच्या वतीने देण्यात आल्या आहे.अशात पक्षाची उमेदवारी मिळण्यासाठी शिंदे सेनेच्या पदाधिकाऱ्यांची हॉटेल मैफिल मध्ये मोठी गर्दी केली होती. तिकीट वाटपाच्या वेळी निष्ठावंताना डावलून इतर पक्षातील कार्यकर्त्यांना उमेदवारी दिली जात असल्याचा आरोप करत काही कार्यकर्त्यांनी तेथे गोंधळ घातला. आज मंगळवारीं ३० डिसेंबरच्या सकाळपासून शहरात नाट्यमय घडामोडी पहायला मिळाल्या. शिंदे सेनेच ☞(पान २ वर)

# 'नायडू गँग'चा सराईत अमरावतीत गजाआड

## चारचाकी वाहन चोरी प्रकरणी आंतरराज्यीय टोळीचा भंडाफोड



**अमरावती/प्रतिनिधीः-** चारचाकी वाहनांची काच फोडून त्यातील मौल्यवान वस्तू लंपास करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीवर अमरावती शहर गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत नंदुरबार जिल्ह्यातील कुख्यात 'नायडू गँग'मधील एका सराईत चोराला (दि.३०) अटक केली आहे. या अटकेमुळे आयुक्तालय हद्दीतील चार गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

२१ डिसेंबर २०२५ रोजी राजापेठ व सिटी कोतवाली पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सलग चार ते पाच वाहनफोडींच्या घटना घडल्याने शहरात खळबळ उडाली होती. चारचाकी वाहनांची काच फोडून आत ठेवलेली नगदी रक्कम व लॅपटॉप चोरणे, ही या गुन्ह्यांची ठरावीक पद्धत होती. या प्रकरणी संबंधित पोलीस ठाण्यांत स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले होते. घटनांची पद्धत समान असल्याने हे गुन्हे एका टोळीचे असल्याचा संशय बळावला. त्यानुसार शहर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी स्वतः ☞(पान २ वर)

# प्रतिबंधित चायना मांजाचा काळाबाजार उघड

## १२ चक्रांसह आरोपी ताब्यात




**अमरावती/प्रतिनिधीः-** शासनाने जीवघेण्या ठरलेल्या प्रतिबंधित चायना मांजावर बंदी घातलेली असतानाही शहरात त्याची खुलेआम विक्री सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार अमरावती शहर गुन्हे शाखेने उघडकीस आणला आहे. शिलांगण रोडवरील बाकलेवाडी परिसरात चायना मांजाची विक्री करणाऱ्या आरोपीला रंगेहात अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून १२ चक्र (रिल) चायना मांजा जप्त करण्यात आला आहे. या मुद्देमालाची किंमत सुमारे १२ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव भूषण ऊर्फ पिंटू मनोहरराव चांदेकर (वय ४०, रा. बाकलेवाडी, शिलांगण रोड) असे आहे. आरोपी आपल्या घरासमोरच शासनाने बंदी घातलेला, ☞(पान २ वर)

# घोटा शेत शिवारामध्ये बिबट्याचा वावर


## वासराचा पाडला पाडशा



**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** तिवसा तालुक्यातील मौजा घोटा शेत शिवारामध्ये गेल्या १५ दिवसांपासून बिबट्याने मोठ्या प्रमाणात घुमाकुळ घातला आहे. २९ डिसेंबरच्या रात्री वऱ्हा येथील शेतकरी रमेश केचे यांच्या मौजा घोटा शिवारात सर्वे नं. १६२ मधील ६ एकर शेती असून येथे जनावरांचा गोठा आहे. त्या गोठ्यामध्ये २० जनावरे असून त्या मधील १ वर्षाचे वासरू बिबट्याने बाजुला नेऊन त्याचा फडशा पाडला. त्या वासराच्या पोटामधील ☞(पान २ वर)

# भातकुलीतील कापूस जिनिंगला भीषण आग

## ८ हजार क्विंटल कापूस जळून खाक



**अमरावती/प्रतिनिधीः-** भातकुली पोलीस ठाणे हद्दीतील महालक्ष्मी कापूस जिनिंगमध्ये मंगळवारी दुपारी अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत सुमारे ८ हजार क्विंटल कापूस व ५०० गाठी जळून खाक झाल्याची प्राथमिक माहिती आहे. आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी दर्यापूर व अमरावती अग्निशमन विभागाच्या अनेक गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. सुमारे चार ते साडेचार तासांच्या कष्टानंतर अखेर आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

माहितीनुसार, महालक्ष्मी कापूस जिनिंगमध्ये नेहमीप्रमाणे कामकाज सुरू असताना दुपारी साडेबाराच्या सुमारास स्पार्किंगमुळे कापसाच्या ढिगाऱ्याला अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केल्याने जिनिंग परिसरात एकच खळबळ उडाली. ☞(पान २ वर)

# 'फुले-आंबेडकरांनी शोधलेली मिथके परिवर्तनवाद्यांनी आता पुढे नेली पाहिजेत'

## साहित्यरत्न फाउंडेशनच्या कार्यक्रमात पुरोगामी विचारवंत डॉ. राणा यांचे प्रतिपादन

### लहुजी साळवे, मुक्ता साळवे यांच्या कार्याला उजाळा



**यवतमाळ/प्रतिनिधीः-** महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ब्राह्मणी व्यवस्थेविरुद्ध उभी केलेली मिथके शोधण्याची प्रक्रिया आजच्या बहुजन समाजातील परिवर्तनवादी व पुरोगामी लोकांनी पुढे नेली पाहिजे, असे स्पष्ट मत पुरोगामी विचारवंत प्रा. डॉ. अशोक राणा यांनी व्यक्त केले. ही प्रक्रिया पुढे नेण्याचा आपला प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले.

साहित्यरत्न कला व सांस्कृतिक विकास फाउंडेशन, यवतमाळच्या वतीने आयोजित 'फुले आंबेडकरी शैक्षणिक विचार आणि लहुजी ☞(पान २ वर)

# जगदीश गुप्ता यांनी दिला शिवसेनेचा राजीनामा

## आश्वासनाची पूर्ती न केल्याने नाराज



**अमरावती/प्रतिनिधीः-** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्ती न केल्याने शिवसेना शिंदे गटाचे पश्चिम विदर्भ संघटन प्रमुख जगदीश गुप्ता यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. आज मंगळवार ३० डिसेंबर रोजी पत्रकार परिषदेत जगदीश गुप्ता यांनी आपली भूमिका स्पष्ट मांडली. जगदीश गुप्ता यांनी आपली व्यथा मांडताना सांगितले की, सर्व राजकीय पक्ष एकाच माळेचे मनी आहे.मागच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना जनतेने भरभरून प्रेम दिले. हिंदुत्ववादी विचारधारा कायम ठेवून त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला होता, परंतु नेत्यांसमोर मुजरा करणे जमले नसल्याने त्यांनी शिवसेना सोडण्याचा निर्णय घेतला.या महानगरपालिका निवडणुकीत कुठल्याही पक्षाचा जिगरबाज उमेदवार असेल तर त्याला ते मतदान करतील. गुप्तांनी सांगितले की १९९० ते २००० या दशकात ते राजकीय सक्रिय होते. त्यावेळेस राजकीय पक्षात येऊ पाहणा-या व्हीआयपी कल्चरला त्यांनी मोडीत काढले होते, परंतु जेव्हा त्यांनी राजकारणातून अलिप्त धोरण ☞(पान २ वर)

**जगदीश गुप्तांनी सांगितले की, कदाचित ते आउटडेट राजकारणी झाल्यामुळे त्यांचे विचार आणि वर्तमान नेत्यांचे विचार जुळत नाही. यापुढे राजकारणाला रामराम करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. त्यांनी हे ही सांगितले की जनतेने त्यांच्यावर भरपूर प्रेम केले. २३ व्या वर्षी त्यांनी भगवा धारण केला. ३१ व्या वर्षी जनतेने त्यांना आमदार बनवले आणि ३६ व्या वर्षी ते मंत्री झाले. राजकारणाने त्यांना भरपूर दिले आहे, त्याबद्दल ऋणी असल्याचे ते म्हणाले.**

# थर्टी फर्स्टच्या रात्री उडान पुलावर नो एन्ट्री

## -पोलीस विभागाने जारी केली अधिसूचना

**अमरावती/प्रतिनिधीः-** सरते वर्षला निरोप आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी आनंदोत्सव साजरा केला जातो. या दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासह कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून यासाठी पोलीस विभागाच्या वतीने ३१ डिसेंबरच्या रात्री १० वाजेपासून १ जानेवारी सकाळी ६ वाजेपर्यंत शहरातील उडान पुलावर प्रवेश बंदी केलेली आहे. वाहतूक विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय खताळे यांनी यासंदर्भात अधिसूचना जारी केली आहे.

नव वर्षाचे स्वागत करण्यासाठी नागरिक बियरबार, धाबे ,हॉटेल इत्यादी ठिकाणी मधप्राशन करून रात्रीचे वेळी रस्त्याने मोटरसायकलवर दोन किंवा दोन पेक्षा जास्त व्यक्ती बसून भरधाव वेगाने वाहन चालवितात. अशा स्थितीत वाहन चालवताना वाहन चालकाचे संतुलन राहत नाही. त्यामुळे गंभीर स्वरूपाचे अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे मद्यप्राशनानंतर वाहन चालकांकडून वाद-विवाद घातल्यास गंभीर स्वरूपाचे गुन्हे घडू शकतात.☞(पान २ वर)






# सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यापक मतदार जनजागृतीचे निर्देश

## मनपा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांची बैठक



**अमरावती/प्रतिनिधीः-** आगामी सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ पारदर्शक, निर्भय व लोकसहभागातून यशस्वीरीत्या पार पाडण्याच्या दृष्टीने अमरावती महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी आज ३० डिसेंबर, २०२५ रोजी स्विप कार्यक्रमाबाबत सविस्तर आढावा बैठक घेतली. ही बैठक अमरावती महानगरपालिका मुख्यालयातील कॉन्फरन्स हॉल येथे पार पडली.

या बैठकीत मतदार जनजागृतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. निवडणूक प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविणे, मतदानाची टक्केवारी उंचावणे तसेच लोकशाही प्रक्रियेबाबत जनतेमध्ये विश्वास निर्माण करणे, हा स्विप कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे आयुक्त तथा निवडणूक अधिकारा☞(पान २ वर)